साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास..........................८४

Six monthly......... 3 ...... ... ...
Single copy ................ .........

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ...........८१ ८६
दुसरे खेपेस ...........८१

Advertisement.
Below 10 lines ... 2
Per line over 10 ... 4 a
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

YOL XXXI | AKOLA MONDAY I MARCH 1897 | NO 9

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख १ माहे मार्च सन १८९७ इ० | अंक ९

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवाअधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken Agent

---

नोटीस.

राजमान्य राजश्री विठोबा वल्लद परशराम चांदुरकार राहाणार कारल तालुके अकोट. यांसी

दुलंबी मर्द विठोबा तर्फे मुखत्यार सखाराम विठल राहणार अडगांव इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजला तारीख ८ माहे एप्रील सन १८९६ रोजी लिहून दिलेले रजिष्टर करारनाम्या प्रमाणें माझ्याशी गंधर्व केला परंतु त्याच दस्तऐवजात लिहिल्या इतर शरती प्रमाणें वागले नाहीं. तें असें कीं गंधर्व झाल्या पासून माझे आंगावर तीनशे रुपयाचे डागीनें आपण ठेवण्याचे कबूल केल्या प्रमाणें जे आपण ठेविले होते ते आपण जबरदस्तीनें हिसकून घेतले. व माझे मना प्रमाणें मजला वागविण्याचे कबूल केले होते त्या प्रमाणें न वागवितां आपण तिसरी बायको माझ्यावर केली. करारनाम्यांत आपण असेही कबूल केले आहे कीं, त्यातील शरती आपण मोडल्या तर ती फारकत समजावी त्या प्रमाणें मी समजल्यास आपली काय हरकत आहे या. जबद्दल आजपासून आठ दिवसांत जबाब द्यावा. जबाब न दिल्यास आपली फारकत आहे असे समजून दुसरा घरठाव करीन. जबाब दिल्यास त्याचा विचार करून आपले ह्मणणें रास्त असेल तर ठीक. नाहीपेक्षां त्याही पक्षी दुसरा नवरा करीन कळावे तारीख २९ माहे फेब्रवारी सन १८९७ इसवी.

सही
दुलंबी मर्द विठोबा तर्फे
कुलमुखत्यार सखाराम
विठल अडगांव दस्तूर खुद्द.

---

नोटीस

राजमान्य रा० झाबाजी वल्लद दर्याजी तावळे राहाणार कानसनी तालुके अकोले यांस.

नोटीस देणार भुलाई मर्द झाबाजी सावळे हल्ली राहाणार हैसपूर तालुके अकोले नोटीसीनें असे कळविते कीं तुमचे बरोबर माझे लग्न होऊन अदमासे बारा वर्षे झाली. मी शाणी होऊन तीन (३) वर्षे जाहाली मी शाणी झालेवर एक दोन वेळा मिळून आदमासे १० महिने तुमचे पाशी राहिले त्यावेळांत तुमचे पासून मजला काडी इतके सुख झाले नाहीं व शिवाय तुह्मास मोठी व्यथा आहे व इतर कारणामुळें मजला तुमचे पाशी कोणच्याही प्रकारानें राहून घर संसार होणें व मुलबाळ वगैरे होऊन संवसार करीन असे कोणच्याही प्रकारानें खात्री नाहीं व माझी व माझ्या जातभाई पंचाची कोणचीच खात्री नाहीं. याजमुळें तुह्मी सोडचिठी द्यावी तुह्मी सोडचिठी देणें बद्दल आजपावेतों पांच चार वेळा सांगितले परंतु तसे जाहाले नाहीं. याजकरितां ही नोटीस देणें भाग जाहालें तर नोटीस पावल्या पासून आठ दिवसात फारकती द्यावी असे जाहाले नाहीं तर मी हीच फारकती समजून जातभाई पंचा मार्फत दुसरा घरठाव करीन, व सर्व प्रकारची नुकसान व ह्या नोटीसीचा खर्च वगैरे सर्व भरून घेतले जाईल. ह्मणून दिल्ही नोटीस सही तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १८९७ इसवी.

सही
सहीची निशाणी बांगडी भुलाई
मर्द झाबाजी इच्या
हातची बांगडी
असे०

---

नोटीस

रा. रा. बाळकृष्ण गोविंद पटवर्धन जळगांव यांस

नोटीस देण्यांत येते कीं आह्मी जे तुह्मास जनरल मुकत्यार पत्र दिले आहे ते आज पासून रद्द केले आहे तर आमचे कांणतेच काम तुह्मी आता करू नये. व आमचे जे कागदपत्र वगैरे तुमचे जवळ आहेत ते आह्मास द्यावे कळावे तारीख २२।२।९७ दस्तूर शेषराव नागोराव

सही
लक्ष्मीबाई जवजे गणपतलाल
वैद्य निशाणी खुद्द

---

जाहिरात

तमाम लोकास कळविण्यांत येतें कीं बाळकृष्ण गोविंद याजला जे मी मुकत्यारपत्र दिले आहे ते रद्द केले आहे सबब माझे संबंधाचा कोणताच व्यवहार सदर्हू बाळकृष्ण गोविंदें यासी करू नये केल्यास मी जबाबदार नाहीं कळावे तारीख २२।२।९७ दस्तूर शेषराव नागोराव

सही
लक्ष्मीबाई जवजे गणपतलाल
वैद्य जळगांव निशाणी
खुद्द

---

नमुना [ जी ]

नादारी मुकदमा नंबर ६ सन १८९७

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे आकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येतें कीं, सैयद अलाउदीन वा सैयद इमामुद्दीन मुसलमान राहणार पंचगव्हान तालुके आकोट हा नादारी आहे असा आज तारिख २० माहे २ सन १८९७ इसवी रोजी ठराव झाला आहे आणि तारीख १३ माहे ३ सन १८९७ हा दिवस नादारीचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्याकरितां नेमला आहे.

नादारा या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तकरार सांगणें असेल ते त्याबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केला पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्याबद्दचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशीअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील कळावें तारीख २३।२।१८९७ इसवी.

| धनकोचें नांव. | रक्कम रुपये |
|---|---|
| १ बागलाल रामुलाल आगरवाला राहणार पंचगव्हान | ७०० |
| २ बागलाल पडमल मारवाडी राहणार पंचगव्हान. | १६९ |
| ३ गणेश नारायण मारवाडी राहणार पंचगव्हान. | ४२ |
| ४ रामुलाल हिरालाल आगरवाला राहणार पंचगव्हान | ८८ |
| ५ ब्याहारीलाल हिरालाल आगरवाला राहणार पंचगव्हान | ९९ |
| ६ चत्रु मारवाडी राहणार पंचगव्हान | ६२ |
| ७ रावजी वारकरी निसबत बुटी राहणार पंचगव्हाण | ३० |
| ८ गोपाळ ब्याहारीलाल राहणार आकोला | ७६ |
| | १२९८ |

V. N. Dandekar
Judge
Bankruptcy Court
Akola District

---

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य १३ शके १८१८

---

## उत्तम शिक्षक व यशस्वी शिक्षक.

( रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सीपाल, ट्रेनिंग कॉलेज, आकोला यांनीं लिहिलेला. ) नंबर ९

वरील विवेचनावरून चांगलें शिकविणें आणि पुष्कळ मुलें पास करणें हीं दोन्ही भिन्न आहेत असें दिसून येईल. आतां अखेरीस cramming किंवा घोकंपट्टी ज्यास ह्मणतात त्या विषयीं चार शब्द लिहून हा निबंध संपवितों.

Cram याचा अर्थ Webster साहेबांनीं दिला आहे तो- रूढार्थ:—To fill with food beyond satiety योगिकार्थ:— To make preparation for an examination by a hasty review of studies. Candy साहेब दपटून भरणें आणि अभ्यासासंबंधानें कल्हईची तयारी करणें असे शब्द देतात. तयारी हा योग्य शब्द दिसतो. ह्मणजे आंतील भाग मळकट असून ते बाहेरून चकचकीत दाखविणें. घोकंपट्टी ही याहून भिन्न होय आणि यामुळेंच cramming च्या संबंधानें हल्लीं थोडेसें अनर्थकत्व होत आहे असें दिसतें. हल्लीं विद्यार्थ्यांनीं कांहीं घोकून पाठ केलेलें दिसलें ह्मणजे ते cramming मध्यें मोडतें. परंतु तें मोडावें किंवा नाहीं याबद्दल आह्मांस शंका आहे. वेदपठणास कोणी cramming ह्मणतात पण वेदपठण हें जर पुस्तकाच्या आधारावांचून वेदरक्षणाचा उपाय आहे तर तें cramming नव्हे. Cramming चा अर्थ असा दिसतो कीं जी गोष्ट समजण्याची आहे ती वस्तुतः समजली नसून ती समजली आहे असें दाखविणारे दुसऱ्यांचे शब्द पाठ करून तें बोलून किंवा लिहून दाखविणें, ह्मणजे

अज्ञान असून बाह्यात्कारी ज्ञानाचा आविर्भाव. घोकंपट्टी ही नेहमींच cramming होणार नाहीं. एकाला कांहीं एक गोष्ट समजली आहे ती लवकर सांगता यावी ह्मणून तो तिचा अर्थ पाठ करून बोलून दाखवितो. हें cramming खालीं न यावें असें वाटतें. आतां दुसरा ती गोष्ट समजली नसून तेच शब्द बोलतो हें मात्र cramming होय. कांहीं वर्षांमागें एका बैठकींत या विषया संबंधानें चर्चा निघाली असतां एका विद्वान गृहस्थानें हा अभिप्राय दिला. ते ह्मणाले नें चांगलें समजलें आहे तें आणि त्याचा अर्थ पाठ करण्यास हरकत नाहीं. मात्र अर्थ समजला नसून कांहीं पाठ करणें हें केवळ cramming होय. आतां असा प्रश्न उद्भवतो कीं समजलें असून पाठ करण्याचें प्रयोजन काय? याची कारणें दोन आहेत. एक प्रश्नाचें उत्तर थोडक्या वेळांत चटदिशी देतां यावें आणि दुसरें गोष्ट समजली असूनही भाषेचा अधिकार नसल्यामुळें तें खुलासेवार सांगतां येत नाहीं तें दुसऱ्याचे शब्द घेऊन व त्यांचा अर्थ समजून दुसऱ्यास समजेल असें सांगणें. पहिल्याचें उदाहरण, गणितांतील एखाद्या विषयाची उपपत्ति, सांगणें. इतिहासांतील प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें सांगणें किंवा लढाईचीं कारणें किंवा तहाचीं कलमें सांगणें. शास्त्रीय विषयांत ऋतु कसे होतात, पृथ्वी गोल असण्याची कारणें, पृथ्वी सूर्या भोंवती फिरते इत्यादि गोष्टींचीं कारणें हे विषय समजले असले तरी लेखी परीक्षेच्या नियमित वेळांत तें सांगतां येण्यासाठीं पाठ करणें सोईचें पडतें. दुसऱ्याचें उदाहरण ज्या मुलांची बुद्धि प्रगल्भ झालेली नसते त्यां मुलांस एखादी गोष्ट समजली असून खुलासेवार लवकर सांगतां येत नाहीं या मुळें तोंडीं परीक्षेंत ते ट, फ, ट, फ, करीत सांगतात आणि परीक्षक त्यांस ती गोष्ट समजली आहे असें जाणतो पण लेखी परीक्षेंत लिहिण्यास वेळ लागतो आणि लिहिणें ही खुलासेवार येत नाहीं त्यास भाषा लिहिण्याची अनभिज्ञता आणि क्रोती समज हीं दोन कारणें होत. ही गोष्ट अधिक स्पष्ट करण्यास एका प्रौढ वयस्क अशिक्षित पुरुषाचें उदाहरण घेऊं. अशा पुरुषास मराठी किंवा इंग्रजी दहा पांच कविता समजवून दिल्या आणि त्यास त्यास त्या एकदां चांगल्या समजल्या ह्मणजे तो हवें तसें पांडित्य करून आपण समजलों आहों हें परीक्षकास दाखवूं शकेल. हवें तसें पांडित्य करण्याचा अधिकार वयाच्या प्रौढते मुळें येतो. विशेष विद्येच्या कारणानें येतो असें नाहीं. ह्याच कविता लहान मुलांस समजवून सांगितल्या तर त्यांस त्या पोटांत कितीही जरी समजल्या तरी बाहेर खुलासेवार बोलतां येत नाहीं. तो मुलाला धरून थोडें थोडें बोलतो पण "ह्मणजे काय? तुला काय समजलें? उदाहरण देऊन सांग" असे आपण त्यास प्रश्न विचारले तर त्याच्या तोंडातून खुलासेवार उत्तरें बाहेर पडत नाहींत, यामुळें अर्थ पाठ करणें परीक्षेच्या सोयी साठीं जरूर होतें. प्रौढवय, भाषेचा अधिकार आणि चांगलें समजणें या तीन्ही गोष्टी असल्या ह्मणजे पाठ करण्याची जरूर नाहीं.

इंग्रजी भाषे संबंधानें म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षे पर्यंत मुलांची स्थिति अशाच तऱ्हेची असते. यामुळें त्यांनाहि बऱ्याच गोष्टी शक्षकाची भाषा घेऊन पाठ करणे सोयस्कर होतें, पण मुळाचा वास्तवीक अर्थ आणि पाठ केलेल्या भाषेचा अर्थ जर त्यांस समजत असला तर त्याचे पाठ करणें cromming न व्हावें असें वाटतें. cramming ची व्याख्या ज्या विद्वान गृहस्थानें सांगितली ह्मणून लिहिलें आहे ते गृहस्थ परीक्षकाचें काम करीत असून त्यांच्या तोंडच्या परीक्षेच्या वेळीं आह्मी असें पाहिलें कीं पाठ केलेली गोष्ट कोणी विद्यार्थ्यानें सांगितली ह्मणजे "हा कशाचा अर्थ, इतक्याच शब्दांचाच किंवा वाक्याचा अर्थ सांग" इत्यादि प्रश्न करून विद्यार्थ्यांस समजलें आहे किंवा नाहीं हें पाहून त्यांनीं त्याच्या उत्तराची किंमत मांडावी. असें केल्या वांचून समजलें आहे कीं नाहीं हें पाहण्यास मार्ग नहीं. सर्व जितकें पाठ तितकें cramming असें ह्मणणें निर्णायक होणार नाहीं. उत्तम सोन्याच्या दागिन्यालाही उजळा देतात व हीण सोन्याच्या दागिन्याला लाही उजळा दिलेले सर्व दागिने हीण सोन्याचे ह्मणतां येणार नाहीं. गिऱ्हाइकांस दाखविण्याची जिन्नस लकलकीत ठेवावी असें वाटणें साहजीक आहे. परंतु हुशार गिऱ्हाईक ती जिन्नस तावून सुलाखून जसें तिचें खरें स्वरूप जाणतो तद्वत् या पाठ करण्याच्या संबंधानें केलें पाहिजे. विषय नेमलेले, पुस्तकें नेमलेलीं, त्यांतील प्रकरणें नेमलेलीं अशा या शिक्षण पद्धतींत थोडें बहूत पाठ करणें हें अपरिहार्य आहे. याच्या बाहेर सर्वथैव परीक्षा तर होऊं शकत नहीं तेव्हां त्याचे त्यांत परीक्षा होऊन हीण सोन्यास उत्तम सोन्याची किंमत न मिळणें आणि उत्तम सोन्यास उजळा दिला आहे ह्मणून त्याची गणना हीणांत विनाकारण न होणें आणि खरें ज्ञान आणि ज्ञानाभास हें एकंदरीनें निवडणें या सर्व गोष्टी परीक्षणाच्या कुशलत्वाच्या आहेत. परीक्षण हें एकंदर शिक्षणाचें नियामक आहे आणि त्यावर भर्तृहरीच्या खालिल चरणांत सांगितलेली जबाबदारी आहे.

कुत्स्याःस्युः कुपरीक्षका न मणयो यैरर्घतः पातिताः

इतक्यांतच या चरणार्थांची अर्थपूर्ति होत नाहीं ह्मणून "यैरर्घतो वर्धिताः" हे शब्द आह्मी जोडून या निबंधाची परिसमाप्ति करितों.

---

सारा वसूल करण्यासंबंधानें सक्ती किंवा तगादा करूं नये असा अलिशान रेसिडेंट साहेबांचा हुकूम आहे. प्रभुवराची आज्ञा सज्जन चाकर मोडीत नसतात ही गोष्ट सर्वश्रुत आहे. तथापि सरकारि अधिकाऱ्यांच्या हातीं रयतेचें सर्वस्व असतें तेव्हां लहान मोठ अधिकारी आपापल्या हद्दी प्रमाणें साऱ्याच्या मागणी संबंधानें रयतेची चांगली समजूत घालतील आणि प्रत्येक कुळाला झालेलें पीक व त्याची भावी गरज हीं लक्ष्यांत घेऊन सरकारी साऱ्याची तहकुबी किंवा माफी ज्या कुळास खरोखर पाहिजे असेल त्यास ती सरकारांत मागण्या विषयीं सूचना करावी. रयतेला पीडा होऊं नये आणि ती दुष्काळांतून पार पडावी अशी महाराणी सरकारची इच्छा आहे आणि ती यथाशास्त्र पूर्ण करण्याविषयीं सर्वजण मनोभावें झटतील व अडाणी नाडलेल्या कुळास सुपथ दाखवितील अशी आह्मास उमेद आहे.

---

इंग्रजी राज्याची मोठी प्रौढी ह्मणजे विद्यादानाची होय. इंडियावर एवढा राज्यकर्त्यांचा उपकार असूनही सर्व राष्ट्रामध्यें हा देश अक्षरशत्रु आहे. इतर सुधारलेल्या राष्ट्रांच्या मानानें विद्येच्या कामात हा देश पुष्कळ मागसलेला आहे. ही सध्याची स्थिती अत्यंत खेदप्रद होय. प्राचीन काळीं आशिया खंडाला विद्येचें मूळपीठ समजत असत आणि ही उन्नत स्थिती आशिआ खंडांत या देशाविषयीं विशेषें करून संस्मरणीय होती. या देशाला सर्व अनादि विद्यांचें व कलाचें माहेरघर मानतात पण कालचक्राच्या विचित्र फेऱ्या मुळें या देशाचें सर्व विद्यावैभव लयास गेलें. तथापि दुःखांत सुख इतकेंच कीं हा देश पाश्चिमात्य विद्येच्या संस्कारानें पुन्हा उर्जित दशेला येत चालला आहे आणि या देशाची सर्व भावी आशा पाश्चिमात्य विद्येच्या अभिवृद्धीवर सर्वतोपरी अवलंबून आहे.

गेल्या पांच वर्षांत विद्याखात्याची अभिवृद्धी कशी कशी होत गेली या विषयीं सरकारि निराळा रिपोर्ट पुढील सालीं प्रसिद्ध होणार आहे तेव्हां विशेष खुलासवारीनें लिहिण्यास सांपडेल. परंतु हल्लीं गेल्या १८९५।९६ साऊची त्रोटक माहिती इंडिया सरकारानें दिली आहे त्यांतलि मुख्य मुख्य गोष्टी आह्मी खाली देत आहो. या देशांत विद्येचा प्रसार समाधानकारक होण्या साठीं सरकारानें जो खर्च केला पाहिजे तो खर्च प्रस्तुतच्या चालू खर्चा पेक्षां मोठा आहे आणि तो खर्च करण्यास आमचें सरकार तयार नाहीं हें उघड आहे. इतर राष्ट्रामध्यें विद्यादानाकडे खर्च जंगी होत असता पण ती योग्यता आमच्या देशाला आली नाहीं अशी राज्यकर्त्यांची समजूत दिसते. इतर सुधारलेलीं राष्ट्रें इतकीं पुढें सरसावलीं आहेत त्यांच्य बरोबरीनें सामना देणें या राष्ट्राला शक्यच नाहीं असें अनुमान निघतें. प्राथमिक शिक्षण आणि धंदेशिक्षण हीं दोन्हीं नीटशा स्थितींत नाहींत. हल्लीं पेक्षां या उभय शाखांचा प्रसार फार मोठा झाला पाहिजे.

सध्या सरकारि व खासगी शाळा मिळून एकंदर १,९२,८४१ आहेत. मुलांच्या शाळा १,४५,१९९ असून ७६४६ मुलींच्या शाळा आहेत. प्राथमिक शिक्षणाच्या शाळा बऱ्याच वाढल्या आहेत आणि त्या हल्लीं १,०२,०३६ आहेत. मध्यम प्रतीच्या शिक्षणाच्या शाळा ५१७८ असून १५८ कालेजें आहेत. आर्ट शाळेकडील ११९ विद्यालयें असून धंद्यांच्या शाळेचीं कालेजें ३९ आहेत. खासगी शाळा ४४९३२ आहेत त्यापैकीं ३८०६८ शाळांतून प्राथमिक शिक्षण दिलें जातें. आणि ५७४१ शाळांतून उच्च प्रतीचें शिक्षण दिलें जातें. मुलीच्या शाळा एकंदरीनें १० कमी झाल्या ही गोष्ट इंडिया सरकारास मोठी असमाधानकारक वाटते.

एकंदर शाळांतून शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सालोसाल वाढत आहे. यंदा ही संख्या ४३,०३,१०९ आहे. एकंदर लोकसंख्ये पैकीं शेंकडा १९ इसम विद्यार्थिदशेंत असतात असें ठोकळ मान धरलें तर अशा शाळेला जाण्याला योग्य शंभर माणसा मागें फक्त १२.०५ इसम विद्या शिकतात असें प्रमाण निघतें. हें प्रमाण फार अल्प आहे आणि हें हल्लींच्या पांच सहा पटीनें वाढे पर्यंत कोणतीच गोष्ट आपल्या मनासारखी होणार नाहीं. राष्ट्राची स्थिती विद्येच्या प्रसारावरून चांगली ताडता येते पण हा देश मात्र इतर राष्ट्रांच्या मानानें कनिष्ठ पायरीचा आहे ह्मणून वाईट वाटतें. भावी स्थिती चांगली येईल अशा हल्लीं आशातंतू मात्र आह्मा जवळ आनंद मानण्याचें साधन आहे. १०० विद्यार्थ्यां पैकीं ६७ हिंदु, २२ मुसलमान, इतर धर्मवाले ७, व युरोपियन, युरेशिअन व नेटिव ख्रिश्चियन मिळून ३ असतात. जात व धर्म या संबंधाचें हें प्रमाण ध्यानांत ठेवण्या जोगें आहे.

विद्याखात्याचा खर्च प्राव्हीनशिअल, लोकल व मुनसिपल अशा तीन फंडांतून होत असतो. या शिवाय फीचें, आणि वर्गण्या, देणग्या वगैरेचें जें उत्पन्न होतें तेंही त्या खर्चाच्या रकमेंत जमतें. या खर्चाच्या कमीपणा बद्दल आमची नेहमी तक्रार असते ह्मणून त्याचे सन १८९५–९६ सालचे नक्की आंकडे सरकारी रिपोर्टवरून आह्मी, खालीं तपशीलवार देतों:—

| उत्पन्नाची बाब | रक्कम रुपये |
|---|---|
| प्राव्हिनशिअल | ९४,०६,१३३ |
| लोकल फंड | ९८,७९,५०५ |
| मुनसिपल फंड | १४९७,७३२ |
| फी | १,०४,९८,०५२ |
| इतर बाबी | ७७,८२,९६० |
| एकूण | ३,९०,६५,३०२ |

या वरून लक्ष्यांत येईल कीं फीचें उत्पन्न फार मोठें आहे आणि त्यामुळ लोकांवर विद्यादाना निमित्त फीचा बोजा मोठा आहे हें उघड आहे. सरकारी खजिन्यांतून या पेक्षां अधीक रक्कम बाहेर निघाली पाहिजे पण आमच्या राज्यकर्त्यांच्या इतर अनावश्यक व अवाढव्य खर्चामुळें सर्व खजिना रिकामा होत आहे तेव्हां अशा स्थितींत विद्यादानाची परोपकाराची बाब राज्यकर्ते लक्षांत घेणार नाहींत हें निराळें शब्दांनीं व्यक्त करून दाखविण्याची जरूर नाहीं.

---

हल्लीं दुष्काळा निमित्त जीं नवीन कामें निघालीं आहेत तीं सध्यांच्या मजूरदार लोकांच्या गरजेला पुरेशीं नाहींत. दुष्काळा मुळें लोक हवालदील होत चालले आहेत आणि ही कष्टमय स्थिती आकोला जिल्ह्यांत विशेषें करून दिसून येते. पुष्कळ लोक अद्याप मजूरी शिवाय आहेत आणि त्यांचें प्राणरक्षण सरकारनें केलें पाहिजे हें खरें तथापि त्यांच्या प्राणरक्षणाला जरूर इतकीं नवीं कामें सरकारानें अद्याप सुरूं केलीं नाहींत. तेव्हां त्यांचें लोकलफंडा कडील काम फंड पुरेसा नसल्या मुळें बंद करण्यांत आलें आहे हें वाईट झालें. नवीन सुरूं झालेल्या कामावर लोकांची गर्दी पुष्कळ होत आहे. आणि त्या कामा शिवाय आणखी

कांहीं जास्त कामांची मोठीं जरूर आहे असें दिसतें सरकार या वेळीं व्यवस्थेशीर मदत करील तर मोटी कृपा होईल.

The Berar Samachar

MONDAY MARCH 1 1897

## "IS COLOUR—CURE OR CROMOPATHY POSSIBLE"

( From a friend )

I do not claim myself to be either a physicist or a physician, nor do I presume myself to be a student of careful application and experimental research, when I say something touching "colour cure." While studying the physical sciences during my college course, idle curiosity led me many a time to suppose that solar and lunar rays might be successfully utilised in curing diseases internal as well external I had made a few experiments with blue and green rays upon my own person in cases of headache and slight fever and luckily I was not disappointed. I did not disclose those experiments to any body for fear of ridicule. nor do I intend to disclose them even now. Because if I venture to reveal them, it would go to reflect a dangerous presumptuousness on my part So I perfectly confine them into the inaccessible chamber of secrecy. For some reason or other I gave up continuing my experiments. I cannot, however, but congratulate myself upon finding that two persons in the art of medicine, viz. Mr. Jawalaprasad of Benares—who has just published a pamphlet on cromopathy—and Mr. Tookaram Tatya of Bombay, have been already working and experimenting in the same line and that they have been able to state that solar rays treatment or colour cure or in one word cromopathy is not a mere fiction but a reality. The idle yet sweeping and irresponsible critic may well laugh at such a notion. But it would be a direct insult to nature to gainsay that. It is extremely strange to note that men of reasoning should reject and ridicule such things. To say with Bacon—"We commonly see the levity and, unconstancy of mens judgments, which, till a matter be done, wonder that it can be done; and as soon as it is done, wonder again that it was no sooner done." Nature never works without influences. Physical science teaches us that the rays emanating from the Sun—the splendid luminary—are not elementary. They are highly composite *i. e.* they are composed of "vibgyor" (violet, indigo, blue, green yellow, orange and red ) rays. These rays of various colours are markedly visible in the rain—bow. It is also known that there are some invisible rays beyond the violet and the red rays called "ultra—violet and ultra—red." The former posses some chemical properties while the latter have some calorific ones. Students of Natural Science have further discovered that all these species of visible elementary rays display chemical, electical, thermal, electro—chemical potencies. It is common knowledge that sun light is the very life of animals and plants. The green coloring matter in the leaves of common plants absorbs particular rays and thus charged goes to nourish the plants. Likewise leaves and flowers of variagated colours absorb such rays as peculiarly suit their constitution. Any displacement in this nature's order is ruinous. Now what is the action of coloured transparent and opaque glasses They absurb rays that are dissimilar in colour and allow either to pass through or to reflect those that are similar in colour. Thus a blue glass would allow blue rays to pass through if it is transparent or to reflect if it is opaque, and absorb the rest. It is popularly known that blue or ash—coloured glasses are recommended for sore—eyes, becouse they particularly suit such eyes. Shortsighted persons are required to use, as a rule, spectacles having double—concave lenses, to assist the sight. Because the ocular lenses, in their case, are convex more than normal and thus displacing the focus of the rays issuing from an external object prevents the retina to receive a vivid image upon it. Double—concave lenses correct the displacement and thus enable the retina to exhibit the right and bright image. Therefore it naturally follows that the different kinds of rays possessing diverse efficacies will transmit them to water if it is charged with them. Such water is surely to produce some medical effects. It appears that blue and green rays have a sort of cooling capacity. So if water is charged with them and is taken in by doses, it would possibly lower down the temperature of fever. Mr. Tookaram Tatya of Bombay is actually prescribing such doses in bubonic fever cases. He tells us that he has been completely successful therein. The recent discovery of Rontgen or x' rays— a crowning success in the field of science—well corroborates the above theory—viz—solar rays treatment or colour cure. It has been declared by eminent scientists in the Western continent that X' rays possess some curative qualities and that they would possibly cure consumption. With such glaring facts the "colour cure" theory conclusively asserts itself. I hope, the giving expression to my views upon "colour cure"—a matter relating to science—at this juncture when famine and plague are conjointly committing a violent havoc in the Aryan soil would not savour some thing of Nero's playing upon his fiddle when the city of Rome was in conflagration.

## वऱ्हाड

हवामान—थोडीशी थंडी अधिक आहे. उन्हें चांगलें तपतें. हवा निरोगी वाटते. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे. पण उपासमारमुळें गोरगरीब जेरीस आले आहेत.

गेल्या शुक्रवारीं आकोल्यास मे. कमिशनर साहेब यांच्या अध्यक्षतेखालीं आकोल्याच्या सुखवस्तु लोकांची सभा भरणार होती पण सभेच्या वेळेच्या सुमारास अलिशान रेसिडेंट साहेबांकडून विद्युत्संदेश आला कीं सध्यां सभा न भरविता मागाहून येणाऱ्या पत्रांतील सूचना प्रमाणें व्यवस्था करावी. सभा तहकूब राहिली आणि सध्यां अकोल्यास 'अनाथगृह' स्थापण्या विषयींचा विचार लांबणीवर पडला आहे.

वऱ्हाड प्रांताला सांथीच्या रोगाचा कायदा लागू केला आहे. या कायद्याच्या अंमलबारासाठीं कांहीं निराळी योजना होऊन एक निराळा कामदार त्यावर नेमला जाईल असें कळतें.

हल्लीं जो सांथीचा ताप उद्भवला आहे त्यामुळें सर्व देश घाबरून गेला आहे इतकेंच नाहीं तर बाह्य राष्ट्रीं देखील त्याची दहशत बसली आहे. हेडजाझच्या मक्केच्या यात्रेला यात्रेकरूंस जाण्याची मनाई हिंदुस्थान सरकारानें केली आहे.

यंदा हायस्कूल–माजी–विद्यार्थी–समाज उमरावतीस पुढील पंधरवाड्यांत भरणार आहे तेव्हां सर्व सभासदानीं वर्गण्या पाठविण्याची त्वरा करावी.

खालील कामदारांच्या बदल्या करण्याविषयीं मे. कमिशनर साहेबांच्या मार्फतीनें अलिशान रेसिडेंट साहेबांकडे सूचना गेल्या आहेत:—

| मिस्टर | बदलींचें ठिकाण |
|---|---|
| विश्वनाथ नारायण दांडेकर, ए. अ. कं. | बदनेरा. |
| ओग्रेडी ए अ. क. | बुलडाणा |
| माणिकशा रतनजी ए. अ. क. | शिकंदराबाद |
| पंडित सुरज नारायण असि. कमि. | इलिचपूर |

आणि इलिचपूरास हल्लीं असलेले रा. रा. गोविंद राजअय्या एक्स्ट्रा असि. कमिशनर हे एप्रिल महिन्याच्या प्रारंभा पासून पेनशन घेणार आहेत.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८९ रुपये |
| जवारी | ९५ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११२॥ रु० |
| ,,( बनशी ) | १३० रु० |
| चणे | १०९ रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ६॥।= मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८७॥ |

## राष्ट्रीय सभा.

[ फटक्याच्या चालीवर ]

सभा ह्मणविते परी नभांतुनि
भूवरि आली तराया ॥
गणा जनानों इच्या आगगा
अकराव्या अवतारा या ॥ ध्रु० ॥
ग्लानी निजधर्मीतें तेव्हां
हांक देउनी प्रभु धांवे ॥
गीतेमाजी दिलें तेधवां
तें वच सत्यचि जाणावें ॥
"राष्ट्रीय सभा" खास भासते
मूर्ति प्रभूची अजि आली ॥
भजा जाणुनी इला जनांनों
कामधेनु ती हीच भली ॥
दुष्काळांनें या काळाची बहुत
काळजी जरी मनीं ॥
धीर धरोनी स्वागत करणें
मातेचें: कर्तव्य जनीं ॥
"एकी" देवी दासी हीची
पहा हिच्या घरिं काम करी॥
चार विचारां करा थोरवी
मग येइल हिचि मनीं बरी ॥
पंजाबी भेटतो जाउनी मराठ्यास
हा दुजा तसा ॥
बंगाल्याशीं करी "शेक् हॅन्ड"
तोही करितो मद्राशा ॥
धन्य असा देखावा
केव्हां कां दिसला आर्यभूवरी ।
सभा भामिनी परी भारुनी
सकलांतें हें असें करी ॥
अमरावतितें येतां तीतें
सार्थ करोनी दाविल ही ॥
एका मुक्कामांतच तिजला
करील जणुं कीं दुजी मही ॥
स्वातंत्र्याचें गरेल वारें
सारे होतिल शक्त अती ॥
कशास बोला अशा सारिख्या
तिच्या असंख्या सौख्यकृती ॥
धरा खरा दृढभाव तिजवरी
रिकामे नका जरा बसूं ।
वरा तिच्या घ्या शिरावरी
मग सर्व काळजी दूर असूं ॥
अगम्य, सुखकर कृति ऐशा
या अवतारी, दीवके यांची ।
भजा भजा या अशा देवते
"अज्ञ कवी" तुह्मां याची ॥
असो सदा सुखदा या महिते
राष्ट्र देवता शिवराया ।
गणा जनांनों इच्या आगमा
अकराव्या भवताराया ॥
सभा ह्मणविते परी नभांतुनि
भूवरिं आली ताराया ॥ ध्रु ॥

वि. ह.

## नोटीस.

राजमान्य राजश्री भाई देवकर्ण गिरधारीलालजी साहू दुकान पिंपळगांव काळ्याचे तालुके जळगांव जिल्हा अकोला मालक गीरधारीलालजी देवकर्ण यासी

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे कडेस आमचे खातेबाकीची रकम रुपये २२४१८=॥ अखेरी बावीसशे एकेचाळीस रुपये, साडेतीन आणे संमत १९५३ चे मिती कार्तिक शुद्ध १ पावेतो येणें निघाली त्याजबद्दल तुह्मास हिशेब पाठवून तुह्मी सदरहू रकम जमाखर्च केल्याबद्दल चिठीही आह्माला लिहून दिली परंतु सदरहू रकमेबद्दल आह्मी समक्ष तुह्मास वरचेवर मागणें केलें तुह्मी देतो देतो ह्मणता परंतु आजपावेतो रकम तुह्मी पाठविली नाहीं आतां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे खामगांवचे जसराज श्रीराम ह्या दुकानावर अगर गलकापूर येथें आमचे दुकानावर आमची रकम वरील प्रमाणें ऐनें व व्याजासुद्धा आणून देऊन पावती घेऊन जावी. नाहीं पेक्षा तुमचेवर दिवाणी कोर्टात दावा करून सर्व ह्या नोटीसीचे खर्चासुद्धां सर्व रकम भरून घेतली जाईल. कळावे. मिती माघ वद्य ११ संमत १९५३ तारीख २७ माहे २ सन १८९७ इसवी मुक्काम खामगांव.

सही
श्रीराम शंकरलाल भागीदार
आईदानं प्रेमचंद दस्तुर
खुद्द.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा, व स्टेशन धर्म शाळेचा कर वसूल करण्याचा सन १८९७।९८ सालचे हक्कांचा लिलाव तारीख २३ माहे मार्च सन १८९७ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केलों जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टौनहालांत हजर राहावें कळावे तारीख २७ माहे २ सन १८९७ इ०

Shankar Govind
Secretary
Akola M. Committee.

## वर्तमानसार.

युरोपांतील राजकीय खटपटी.

अमेरिकेंतील कालिफोर्निया येथील धान्य एका सरकारी गलबतांत भरून हिंदुस्थानात पाठविण्याचें ठरलें.

ब्रह्मदेशच्या सरहद्दीबद्दलचा तह पुरा झाला. व ४ महिन्यांनीं, अंमलांत येणार.

हिंदुस्थानच्या दुष्काळामुळें जो कापडाचा खप कमी झाला त्यामुळें म्यांचेस्टर चे एक हजार माग बंद झाले व त्यामुळें लोकांत चळवळ सुरू झाली आहे.

हिंदुस्थानच्या दुष्काळफंडाची बेरीज २,९७,००० पौंड झाली.

क्रीठ बेटाचें प्रकरण जास्त जोरावत चाललें.

कांडिया येथील टर्कीच्या फौजेवर ग्रीक फौजेनें गोळ्या घालून माघारें हटविलें.

ख्रिस्ती बंडखोर कानिया किल्यावर गोळ्या घालीत आहेत.

कानिया, रेटियो व कांडिया हीं ठिकाणें तेथील मुसलमानांच्या रक्षणार्थ बड्या राजांनीं आपल्या ताब्यांत घ्यावीं असें टर्कीच्या दरबारच्या बड्या राजांच्या वकिलाचें ह्मणणें आहे.

ग्रीस व दंगेखोर यांस दाबींत ठेवावें असें बड्या राजांचें ह्मणणें आहे.

या क्रीट बेटांत हलिफा ह्मणून एक ठिकाण असून त्यांतील लोकांनीं, तिऱ्हाईत राहण्याचें ठरविलें.

४० तासांची नोटिस देवून ग्रीक फौज क़ानियावर तोफांचा भडिमार करणार.

ग्रीकची टॉर्पेडो लढाऊ गलबतें कानिया येथें आली.

टर्की आपली फौज थिसली हद्दीवर जमा करीत असून ग्रीक फौजही सरहद्दीवर जात आहे.

ग्रीकच्या करण्याबद्दल रशिया कानाडोळा करीत आहे ह्मणतात.

मालटा येथील इंग्रजांच्या चार लढाऊ गलबतांस क्रीट येथें जाण्याचा हुकूम झाला.

क्रीट बेटावर जाण्याकरतां ग्रीक फौजेच्या तीन अगबोटी ता० १४ रोजीं रवाना झाल्या व त्या फौजेची प्रथम क्रौन प्रिन्सनें तपासणी केली. ही फौज कानिया जवळ उतरली.

ग्रीक सरकारानें आपल्या शिलकी फौजेस लौकर कामावर बोलावलें.

ग्रीकराजपुत्र निकोलास हा या फौजेबरोबर मुख्य ह्मणून जात आहे.

क्रीटवर आह्मी जी स्वारी करीत आहों, त्याबद्दल आमच्यावर किती जबाबदारी आहे हें आह्मी जाणून आहों असें बड्या राजांच्या विचारण्यास ग्रीस सरकारानें उत्तर दिलें.

बंडखोर, ख्रिस्तीलोक कानिया किल्यावर तोफांचा भडिमार करीत असून किल्यांतली टर्कीश फौज उलट मारा करीत आहे.

ख्रिस्ती गव्हरनर व इतर राजकीय वकील यांनीं भिवून पळ काढला व परकीय लढाऊ गलबतांचा आश्रय केला आहे.

टर्कीनें मासेडोनिया येथील आपल्या फौजेच्या मदतीस आणखी १ लाख फौज पाठविली.

कानिया येथील टर्कीफौजेनें शनवारीं ख्रिस्त्यावर एक छापा घातला. सगळा दिवस लढाई चालू होता.

क्रीटनमधील शहरें बड्या राजांनीं मिळून ताब्यांत घ्यावीं असें रशियाचें ह्मणणें असून इतर राजे त्याचा विचार करीत आहेत. फ्रान्स व इंग्लंड यांचें तसेंच मत आहे.

क्या० वासस हा ग्रीक फौजेचा मुख्य असून कानिया आमच्या स्वाधीन करा असा क्रोटन लोकांस हूकूम केला.

क्रीट बेट ताब्यांत घेण्याकरतां इतर राजांची फौजही बंदरावर उतरली.

ग्रीकसरकार बड्या राजास नादीं लावीत आहे व आपली फौज बेटांत येण्याचें चालूं राहील असें सांगत आहे.

ग्रीकनें आपली राखून ठेवलेली सर्व फौज बलावली.

ग्रीकच्या २ आगबोटी आफीसरांस घेऊन आथेन्स येथून क्रीट येथें गेल्या.

इंग्रज, फ्रेंच, रशियन व इटालियन फौजेनें कानियाचा कबजा केला. रेटिमो व काडिया येथेंही फौज उतरली.

क्या वासस यास बेटाचा कबजा घेण्याचा ग्रीसचा हुकूम आहे.

कानिया जवळचा आग्या किल्ला आंतल्या ४०० मुसलमान शिपायासह ग्रीकफौजेनें घेतला.

तुह्मी क्रीटबंदरांतून निघून जा अशी ग्रीक यास बड्या राजांनीं नोटीस दिली, पण ग्रीकनें उत्तर दिलें नाहीं.

टर्कीसरकार आपल्या एका पाद्रास हायक मिशनर ह्मणून क्रीटबेटांत पाठवीत आहे.

मुंबईस हल्ली सांथीचा प्रलय जेथें जेथें आहे तेथें तेथें घर वगैरे जाळण्याचा तडाका सुरू आहे. डा. कीर्तिकर यांचें ह्मणणें असें आहे कीं, सांथीच्या शमनार्थ घरांना चुना वगैरे लावण्याचे यत्न व्यर्थ आहेत, मुंबईची वस्ती पातळ झाली तरच ही सांथ कमी होईल. घरें जाळण्याचा जो प्रकार चालूं आहे त्यास आगीचे विमे उतरणाऱ्या मंडळीची हरकत आहे. मरीन लैनीवरील लष्करी लोकांच्या छपऱ्या व अधिकाऱ्यांचे बंगले व सामानसुमान दरोबस्त जाळून टाकण्याचा सपाटा चालला आहे. पुण्यांत लष्करी लोकांना शहरांत किंवा लष्करांत मुळींच पसरूं देत नाहींत. तसेंच कोणी लोक आपल्या गोटांतून निघून शहरांत वगैरे जातील तर त्यांस ताबडतोब कैद करून त्यांचे गेटांत पाठविण्याचे सक्त हुकूम लष्करी अधिकाऱ्यांकडून सुटले आहेत असें समजतें. ह्याप्रमाणें ह्या प्लेगनें चोहोंकडे मोठी चळवळ उडवून दिली आहे.

सिग्नलर्स असोसिएशन या नांवाची जी. आय. पी. रेलवेच्या तारखात्यांतील लोकांची एक सभा स्थापन होत आहे. इची अवश्यकता, उद्देश, वगैरे विषयीं. पुढें माहिती देऊं.

हैद्राबादचे निजामांनीं व कोल्हापूर, सांगली, मिरज येथील संस्थानिकांनींही पुणें मुंबईकडील लोक आपल्या हद्दींत न येऊं देण्याचा ठराव केला आहे.

मुंबईंतील तापसराई बंद करण्या करितां मुंबई म्युनिसिपालिटीचे आजपर्यंत पांच लाख रुपये खर्च होऊन गेले असें सांगतात.

ज्ञानोदयकर्त्यांनीं आपलें मुंबईचें मुख्य आफिस बंद करून क्षेत्र वाई येथें उघडलें.

प्लेगमुळें पुण्याचे नेटिव्ह इन्स्टिटयूशन आणि फर्ग्यूसन व महारप्ट्र कॉलेज हीं बंद झालीं.

गेल्याचे मागील मंगळवारी पेणेस व गेले रविवारी राणोबिन्नुराकडे धरणीकंपाचे धक्के बसल्याचें कळतें.

ब्युबॉनिकच्या भीतीमुळें मुंबईच्या मरीन लाईन मधील झोंपड्या व बंगले जाळून टाकले.

इंग्लंडची तयारी--लंडन शहराच्या सभोंवार किल्ले उभारण्याकरितां व इतर लष्करी सिद्धतेकरितां ५।६ कोटी रुपये खर्च करण्याची पार्लमेंटची मंजुरी लढाई खात्याचे सेक्रेटरींनीं मिळविली आहे.

लार्ड मार्च या नांवाच्या एका जगप्रसिद्ध क्रिकेटियरनें एके दिवशीं एका आपल्या खेळगड्याशीं अशी पैज मारली कीं, "मी एका तासांत कमींत कमी एकशें वीस मैलपर्यंत पत्र पोहोंचवितो." हें ऐकून त्यास पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. हें कधीं न होणारें कृत्य जेव्हां लार्ड मार्च यांनीं करण्याचें पत्करलें, तेव्हां त्यांनीं क्रिकेटमध्यें अत्यंत निपुण व त्या धंद्यांत पूर्ण वस्ताद असें क्रिकेटखेळाड् लोक जमा केले. व ज्याक्षेत्राचें वर्तुळ एकशें वीस मैल आहे अशा एका विस्तीर्ण पटांगणांत ते सर्व वर्तुळाकार उभे केले. नंतर चेंडूला पत्र बांधून तो चेंडू त्यांनीं इतक्या जोरानें मारला कीं एकानें दुसऱ्याकडे, दुसऱ्यानें तिसऱ्याकडे अशा रीतीनें तो चेंडू एका तासांत शेवटच्या गड्याकडे हां हां ह्मणता गेला. त्यानें शेवटीं त्याला इतक्या जोरानें ठोकरला कीं तो चेंडू वायुगतीनें जमिनीवरून चाललेला दिसला. ज्या ठिकाणीं तो थांबला त्या ठिकाणीं जाऊन सर्वांनीं ज्या जागेपसून चेंडू सोडला तेथपर्यंत मोजणी केली. आणि पाहतात तो पत्र घेऊन वर ह्मटल्या प्रमाणें १२० मैलांचें अंतर एका तासांत त्या चेंडूनें तोडलें. ही लार्ड मार्चसाहेबांची अजब युक्ती बघून सर्वांनीं त्यांच्या क्रिकेटपटुत्वाची मोठी तारीफ केली.

व्हेनेज्युऐला देशांतले लोक आपली मेंढरें राखण्याचे किंवा वळविण्याचें काम "कामिक" नांवाच्या पक्ष्याकडून करवून घेतात. ते इतक्या लवकर माणसाळले जातात कीं त्यांच्या सारखी मनुष्याच्या सहवासाची गोडी दुसऱ्या कोणत्याही जातीच्या पक्ष्यांना नाहीं असें ह्मणतात. त्यांना जसे शिकवून तयार करावेत तसे ते होतात. मेंढ्यांच्या कळपावर हा पक्षी असतो. तो कळप कोठेही असला तरी तो त्या ठिकाणीं एका झाडावर बसून त्यांची राखण करीत असतो. एकादा गुराख्याचा पोर तरी क्षणभर आपलीं गुरें विसंबेल, पण हा पक्षी कांहीं केल्या कळपापासून हालत नाहीं. या पक्षाच्या ताब्यांत तेथील शेतकरी लोक आपल्या गुरांमेंढरांचे कळपच्या कळप हवाला करून खुशाल ते आपलीं शेतकामें करीत बसतात कळपाबरोबर एक शिकारी कुत्रा असतो तोही त्या पक्ष्याच्या ताब्यांत असतो. एखाद वेळेस जर दुरून एकादा लांडगा अगर वाघ मेंढरांच्या वासानें येत आहे असें दिसलें तर तो पक्षी लागलींच त्या कुत्र्याला इशारा करितो व सर्व मेंढरें एकत्र गोळा करून ताबडतोब त्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं घेऊन जातो. याप्रमाणें धनगराचे काम तो पक्षी अगदीं उत्तम तऱ्हेनें बजावतो.

करमणूक

पुण्यांतलि वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालू सालचा भाषण समारंभ तारीख २ माहे मे सन १८९७ पासून सुरूं होईल विषय खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत.

विषय

१ ला.—हल्लीं सर्वत्र दुष्काळ पडला असल्या कारणानें गरीब व अनाथ लोकांचे हाल कसे होतात, याचें यथार्थ स्वरूप श्रोत्यांच्या मनावर ठसवून, सरकारचें व ज्यास देवाच्या दयेनें अनूकूलता आहे त्यांचें असल्या प्रसंगीं कर्तव्य कर्म काय आहे? पूर्वीच्या दुष्काळाची हकीकत देऊन, त्या वेळीं व्यवस्था काय केल्या होत्या? व हल्लींच्या तजविजी काय आहेत? दुष्काळाचे प्रसंग येऊं नयेत व ते आलेंच असतां त्यांच्या निवारणार्थ काय उपाय योजावे? बाक्षिस ३५ व २० रुपये.

२ रा.—दुष्काळ, सांथीचे रोग किंवा अधिभौतिक उपद्रव उत्पन्न होतात, व असे प्रसंग मनुष्यांच्या पापामुळें शासनाकरितां ईश्वर आणितो असें धर्मशील लोक ह्मणतात या ह्मणण्यांत तथ्यांश किती आहे, व अज्ञानामुळें व अव्यवस्थेमुळें असे प्रसंग येतात, ईश्वरी क्षोभाचे हे प्रसंग नव्हेत, असें जें उलट मत आहे, त्यांत ग्राह्य भाग कितपत आहे याविषयीं दोन्ही मतांचें यथार्थ विवेचन करून, दोन्हीं पक्षांची एकवाक्यता होण्यास कांहीं प्रकार असल्यास तो सुचविणें. बाक्षिस ३५ व २० रुपये.

३ रा.—भगवद्गीता अध्याय ९ श्लोक २२—

अनन्याश्चिंतयंतो मां ये जनः पर्युपासते ॥
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

४ था—In English (इंग्रजींत)

POVERTY OF INDIA

It is asserted by some political thinkers that the Poverty of India has been on the increase during the present century, and that the increasing impoverishment of the country has already become a grave question of great political significance. If these observations are well founded, what are the causes of the evil and means to remedy it in good time? बाक्षिस ५० रुपये.

Candidates are supposed to address the British Tax Payers on the subject.

या चार विषयावर भाषण करणारांनीं कोणत्याहि व्यक्तीस प्रत्यक्ष अथवा परोक्ष रीतीनें अनुलक्षून बोलूं नये.

कृष्णराव बापूजी मांडे,
विनायकराव रामचंद्र जालनापरकर,
पुण्यांतील वक्तृत्व मंडळीचे चिटणीस.

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८२
साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास.......................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .........८१ ८६
दुसरे खेपेस ............८१

Annual in arrears 7 „ 1 Rs.
Six monthly......... 3 ......
Single copy ...............

Advertisement.
Below 10 lines ... 2
Per line over 10 ... 4
Repetition Per line ...3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

YOL XXXI — AKOLA MONDAY 8 MARCH 1897 — NO 10

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख ८ माहे मार्च सन १८९७ इ० — अंक १०

### जाहिरात

**मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.**

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken
Agent

---

### जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यात येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा, व स्टेशन धर्म शाळेचा कर वसूल करण्याचा सन १८९७।९८ सालचे हक्कांचा लिलाव तारीख २३ माहे मार्च सन १८९७ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टौन हालांत हजर राहावें कळावे तारीख २७ माहे २ सन १८९७ इ०

Shankar Govind
Secretary
Akola M. Committee.

---

### जाहिरात.

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येते कीं इंडियन फ्यामीन च्यारीटेबल रिलीफ फंडाचे संबंधानें दुष्काळ पिडीत लोकांचे मदतीस्तव धर्मार्थ प्रांतिक फंड जमा करण्याकरितां व त्याची व्यवस्था ठेवण्यास सेनट्रल कमिटी नेमण्या करितां उमरावती क्यांप येथें डिस्ट्रीक्ट बोर्डाचे कचेरींत तारीख १२ माहे मार्च सन १८९७ रोज शुक्रवार इसवी रोजी सकाळचे ९ वाजतां सभा भरविण्याचें ठरविलें आहे. सबब ज्यांस अंतःकरणपूर्वक वऱ्हाडची कळकळ असेल त्यांनीं सदरहू सभेस येऊन वर्गणी द्यावी अशी सविनय प्रार्थना आहे कळावें तारीख १ माहे मार्च सन १८९७ इसवी. मुक्काम उमरावती.

F. S. Bullock
कमिशनर मुलुक अमानी
हैद्राबाद.

### NOICE

A meeting will be held at the District Board's Office at Amraoti Camp at 9 A. M. on Friday the 12th instant for the purpose of organizing a Provincial Charitable Famine Relief Fund and appointing a Central Committee for its administration, in connection with the Indian Famine Charitable Relief Fund. All who have the interests of Berar at heart are earnestly desired to attend and subscribe.

Dated
1st March
1897 } F. S. Bullock
Commissioner
H. A. Districts.

### NOTICE

Wanted a temporary Sub over-seer on Rupees 40 per month for Famine Relief works. Passed and experienced candidates will have preference. Applications with copies of testimonials to be sent to the Chairman District Board Bassim Berar.

Rustomji Faridonji.
Chairman Bassim District
Board.

---

### नोटीस

तिर्थ स्वरूप वालंबी मर्द बापूजी पाटलीण कुलट राहाणार पुंडे तालुके अकोट जिल्हे अकोले. ईस.

नोटीस देणार तुकाराम व सिवराम वल्लद रामाजी पाटील कुलट राहाणार पुंडे तालुके अकोट जिल्हे अकोले हे उभयता असे कळवितात कीं तूं आमची वडलि भावजय आहेस व आमचे बंधु बापुजी ह्यास गेल्या भाद्रपद मासी देवाज्ञा जाहाली त्या वेळे पासून तुह्मी तुमच्या नांवचे शेतीचे खाते होई पर्यंत ठीक होता. खाते जाहाले पासून तुह्मी तुमचा अधिकार काय आहे हे न समजतां स्थावर व जंगम वगैरे सर्व इस्टेट यांची विल्हेवाट लावण्याच्या विचारांत तुह्मी अहा व कांहीं जंगम जिनगीची अफरातफर केली ह्मणून वगैरे कारणामुळें ही नोटीस देणें भाग झाले तर तुह्मास असे कळविले जाते कीं तुह्मी अमरणांत अन्नवस्त्र घेऊन राहावे. इतकाच अधिकार तुमचा आहे. तर या पलीकडें जाऊं नये व आपला वडीलपणा राखावा असें जाहाले नाहीं तर रिती प्रमाणें तुमच्या बद्दल तजवीज करणे भाग पडेल. व त्या प्रमाणें केली जाईल. हें तुह्मास कळावें ह्मणून दिल्ही नोटीस सही तारीख ४ माहे मार्च सन १८९७ इसवी.

सही
सहीची निशाणी वखर तुकाराम
व सिवराम वल्लद रामजी पा-
टील कुलट राहाणार पुंडे
तालुके अकोट यां-
च्या हातची
असे.

### जाहिरात

सर्वत्र लोकास खाली सही करणार याजकडून असें जाहीर केले जाते कीं आमचे वडील बंध नामे बापुजी हे गेल्या भाद्रपद मासी मैत झाले त्यांची बायको नामे वालंबी हिचा मरे पर्यंत अन्नवस्त्र घेऊन राहावे एवढाच अधिकार आहे. याजकरीतां सर्वांस असे जाहीर करितो कीं आमची वोवर्गी बंधूची स्थावर जंगम इस्टेट वगैरे कोणी आमच्या संमती शिवाय गाहाण खरीदी बक्षीस वगैरे घेऊ नये घेतल्यास कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्थावर जंगम जिनगीवर नाहीं ज्याचा तोच आहे. ह्मणून दिल्ही सही ता० ४।३।९७

सही
सहीची निशाणी वखर तु-
काराम व शिवराम वा॥
रामजी पाटील कुलट
रा॥ पुंड तालुके अको
ट याच्या हातची
असे

---

### मुलांच्या शिक्षणपद्धतिसंबंधानें त्रोटक विचार

( लि. आ. म. )

( नं १ )

अलीकडे सुधारलेल्या देशांत या संबंधानें अत्यंत जारीनें विचार चालू आहेत. हल्लींचीं मुलें ह्मणजे तीस वर्षांनंतरची माणसें. अशीं कीं ज्यांच्या सद्गुणांवर, कार्यक्षमतेवर, आणि उद्योगावर सर्व देशाची उन्नति आणि अवनति हीं अवलंबून आहे तेव्हां ज्या कोणाला देशाचें खरें कल्याण करावयाचें आहे अशा मनुष्याचा विचार सहजच या महत्वाच्या बाबीकडे वळतो. शिवाय ह्मटलें आहे.

बालपणीं बालांची
कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल ॥
घेईल ज्या गुणांला
तो गुण मतिवेष्टनीहि फांकेल ॥ १ ॥

ही झाडाची उपमा लहान मुलाच्या बुद्धीला अत्यंत साजते. कारण हल्लीं आपल्या सुद्धां अनुभवाला येतें, कीं लहानपणीं कांहीं गोष्टी विषयीं जो एखादा आपला ग्रह बनतो तो पुढें विचारांती सुद्धां जातां जात नाहीं. तेव्हां हीही एक बाब लक्षांत घेतली असतां पाश्चात्य पंडितांचें मुलाच्या शिक्षणाकडे इतकें लक्ष लागणें हें यथायोग्य व स्वाभाविक दिसतें.

आतां या संबंधीं विचार करतांनां आह्माला विशेषेंकरून आमच्या इकडील शिक्षणपद्धति संबंधानें बोलावें लागेल. कारण आमचा मुख्य उद्देश, खऱ्या तत्वांनां अनुसरून आमची शिक्षण पद्धति आहे किंवा नाहीं, हें पाहाण्याचा आहे. मुलाच्या आदिज्ञाना संबंधानें विचार केला तर असें आढळून येईल कीं तें विशेषेंकरून कल्पनामय असतें. ह्मणजे प्रत्येक दिसणारी वस्तु त्याला कौतुकास्पद असून त्याची कल्पनाशक्ति जागृत करीत असते. जरा मुलगा जाणता झाला कीं त्याला बहुशः भुता चोरांच्या कादंबरी सारख्या गोष्टी आवडूं लागतात "काउ, काउ" करण्याची वेळ गेली ह्मणजे "बागुलबुवा" येतो, आणि ती वेळ गेली ह्मणजे "त्या लिंबाशीं भूत आहे" अशा गोष्टि सुरू होतात तेव्हां ही मुलाची प्रथमची कल्पना पुढें बनणाऱ्या माणसाच्या वशी उपयोगी पाडतां येईल हा मोठाच प्रश्न आहे.

पाश्चिमात्य देशांतल्या प्राथमिक शिक्षणांत या संबंधीं आपणाला एक मोठा विशेष दिसून येतो. तो हा कीं इयत्तेच्या पुस्तकांत ज्या गोष्टी व कविता धड्याच्या रूपानें घातल्या असतात त्यांत विशेषें करून तद्देशीय वीरांचें, विद्वानांचें किंवा शूर व ममताळु मुलामुलींचें, गौरव केलें असतें. ह्या गोष्टींपासून मुलांच्या मनांत आपल्या लोकांविषयीं मोठा अभिमान उत्पन्न होतो; आणि त्यावेळीं जरी ती दृश्य नसते, तरी अंतःकरणांत त्यांच्या आवडी बरोबर अनुकरणेच्छाही उद्भवते. शिवाय तिकडे मोठमोठी व मोहक चित्रें काढून त्यांत केवळ लहान मुलांकरितां अल्पचरित्रें दिलीं आहेत, अशीं पुस्तकें अगणित सांपडतील. या पासूनही असाच परिणाम दृष्टोत्पत्तीस येतो कीं मुलाच्या मनांत स्वदेश व स्वजन या विषयीं अलौकिक भक्ति राहून जाते. तिकडील अशा रितीच्या असंख्य पुस्तकांत एके ठिकाणीं तरी शिवाजीचें तुकोबाचें, किंवा पहिल्या बाजीरावाचें उदाहरण आलें असेल किंवा नाहीं याची आह्मांला शंका आहे! मत्र गापासून आह्माला आश्चर्य किंवा विषाद कांहींच वाटत नाहीं. खेद होतो तो वरील प्रकारच्या तिकडील शिक्षण पद्धतिकडे पहिल्यानंतर, आमच्या इकडील शिक्षण पद्धतिवर डोळा टाकतांनां होतो.

समारें पन्नास वर्षांपूर्वीं सुप्रसिद्ध मेकॉले साहेब हे आपल्या दिव्य लेखणीनें असें एक वाक्य लिहून गेले कीं "A nation which has no past shall have no future." (ज्या राष्ट्राच्या पूर्वजांनीं अभिमान वाटण्या जोगतीं कृत्यें केलेलीं नाहींत, त्याच्या हातून पुढच्या पिढीनें नांव राखावें असें कांहींच होणार नाहीं. हें मराठी आह्मी वाक्याचें भाषांतर केलें नसून त्यांतला गर्भितार्थ त्यांत यावा अशा यत्नानें केलें आहे. असो; सांगण्याचा मुद्दा हाच कीं पूर्वजांनीं मोठमोठीं कृत्यें केलीं असतील तरच अभिमानानें कांहीं होतें; असें आहे तर आमच्या शिक्षणपद्धतींत हा केवढा बरें फरक अवश्य आहे. रॉबर्ट ब्रूसच्या, धनगराच्या मुलाच्या, वेलिंगटन सारख्या सेनापतीच्या गोष्टीवाचून आमच्या मुलांनां काय बरें फायदा होत असेल. आ-

मच्यांतल्या थोर माणसांचीं त्रोटक चरित्रें सुंदर चित्रासह ज्यांत दिलीं अाहेत अशीं पुस्तकें आमच्यांत नाहींतच नाहींत, पण आमच्यांतल्या खंबीर व थोर अशा माणसांचीं नांवें सुद्धां फार थोड्या मुलांनां माहीत असतील इतकेंच तर काय पण हल्लींची माणसें ज्या शिक्षण पद्धतीवर मोठीं झालीं आहेत तिची योग्यता एका लहानशा गोष्टी वरून स्पष्ट दिसून येते. ती ही कीं अलीकडे प्रसिद्ध होणारीं पुस्तकें, बखरी व "भारतवर्षा" सारखीं मासिकें हीं थोडीशीं वाचल्या नंतर पुष्कळ पदवीधरांच्या तोंडून, "कां हो आमच्यांतही भली बहादर मंडळी होऊन गेली. हा भाग आमच्या पहाण्यांत पूर्वीं कधींच आला नव्हता हो"! असे उद्गार आह्मांस ऐकूं आले. ह्मणजे बिचाऱ्या सद्गृहस्थांनां आह्मी कोणी होतों, याची दादही नाहीं!!

तेव्हां हल्लींच्या शिक्षण पद्धतींत ही एक मोठी बाब कशी चुकली आहे हें स्पष्ट होईल. आमच्यामतें सरकारी शाळेंत जीं पुस्तकें लाविलीं आहेत, त्यांत वरील प्रकारचा बराच फरक होणें इष्ट आहे. व यथाकथंचित जरी आमच्या मंडळीच्या सुचेनेनंतर तसें करण्याची सरकारची इच्छा दिसली नाहीं, तरी नवीन निघालेल्या व निघणाऱ्या खाजगी शाळांत तरी आमच्या मंडळींना ही गोष्ट अंमलांत आणतां येईल. ह्मणजे खऱ्या शौर्याच्या, अभिमानाच्या, ईश्वरभक्तीच्या, सद्वर्तनाऱ्या आमच्यांतील थोरमाणसांच्या गद्यपद्यबद्ध लहान गोष्टी मुलांच्या नजरेंत आणतां येतील. शिवाय सरकारासही ही सुचना करितांना एक विशेष त्यांच्या नजरेस आणण्या सारखा आहे. तो असा कीं, वरील प्रकारचें शिक्षण दिलें असतां इतर गुणाबरोबर मुलांची राजनिष्ठाही ही चांगली वाढेल. आणि राणीच्या येथच्या राज्यावर परचक्र आलें असतां वरील हार्डी खिळलेल्या अभिमानोनें स्वामीसेवा त्यांचे हातून अदृष्टपूर्व होईल!

आणखि कांहीं विचार पुढील खेपेस सादर करीन.

वि. ह. शेवडे.

---

तेल्हारे ता० ४ मार्च सन १८९७ इ.

(आमच्या एका सन्मान्य मित्राकडून)

आपल्या गेल्या अंकीं आपण आकोट तालुक्यांतिल दुष्काळा संबंधानें आपल्या पत्रांत जो उल्लेख केला होता. त्या बद्दल या तालुक्यांतिल लोक आपले फार आभारी आहेत.

स्थानिक पत्रांत अशा प्रकारच्या बातम्या आल्या पासून जो लोकांस उपयोग होतो तितका उपयोग परठिकाणच्या मोठ्या महत्वाच्या बातम्या देऊनही होत नाहीं.

दुष्काळपीडित लोकांची दाद सरकारांत लागावी एतदर्थ पुण्याची सार्वजनिक सभा व पत्रें रात्रंदिवस जसा अव्याहत प्रयत्न करित आहेत, त्याच प्रमाणें आपल्या प्रांतांतील लोकांची दाद लागावी या करितां झटणें हें आपलें ही एक कर्तव्य आहे.

दुष्काळाचा बोभाटा जितका कमी होईल तितका कमी करावा व त्या कामीं जितका खर्च कमी लागेल तितका कमी लावावा, ह्मणून स्टेट सेक्रेटरी पासून तों अगदीं खालच्या दर्ज्याच्या अंमलदारापर्यंत जसे एक सारखे प्रयत्न सुरूं आहेत, त्या प्रमाणें त्याच्या विरुद्ध दिशेनेंही आपले प्रयत्न सुरू असले पाहिजेत; नाहीं तर शेंकडों लोक दुष्काळामुळें मृत्युमुखांत पडून आपलें सरकार ह्मणेल कीं दुष्काळामुळें एकही मनुष्य आमचें राज्यांत उपाशी मेला नाहीं.

दुष्काळा संबधानें आपल्या सरकारचीं सर्व कारस्थानें उजेडांत आणावींत या हेतुनें इंग्लंडांतील कॉंग्रेस कमेटीनें नुकतेंच एक सरक्युलर हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणच्या कॉंग्रेस कमेट्याकडे पाठविलें आहे, व या कमेट्या कडून जी माहिती मिळेल ती इंग्लंडातील सर्व वर्तमान पत्रांकडे प्रसिद्धी करितां पाठविण्याचा या कमेटीचा बेत आहे. अशा प्रसंगीं प्रत्येक राष्ट्रहितचिंतकाचें हें कर्तव्य आहे कीं, त्यानें आपल्या हातून होईल तितका प्रयत्न करून अशी माहिती आपआपल्या कॉंग्रेस कमेट्यास मिळवून द्यावी.

अकोल्या जिल्ह्यातील इतर तालुक्या संबंधानें काय हकीकत आहे हें मजला माहीत नाहीं, परंतु अकोट तालुक्यां संबंधानें माझें ह्मणणें असें आहे कीं, येथें महरगता आहे असें ह्मटल्या पेक्षां दुष्काळ आहे असें ह्मणण्यास बिलकुल हरकत नाहीं. इतर तालुक्या पेक्षां या तालुक्यांत पीक विशेष चांगलें होतें, असें असतां या तालुक्यांत दुष्काळाचा परिणाम विशेष भयंकर कां झाला अशांचीं कारणें शोधीत बसण्यांत सध्यां अर्थ नाहीं. परंतु मोठ्या मजेची गोष्टही कीं सरकारी अमलदार अद्याप दुष्काळ नाहींच ह्मणत आहेत. अकोटांत अनाथगृह स्थापन करण्याची वार्ता आज किती दिवसा पासून ऐकत आहोंत परंतु त्याचा अद्याप पत्ता नाहीं. जिल्हा बोर्डाचे पैशातून तेव्हाच्या नजिक एक काम काढलें होतें, तेथें थोड्या अवकाशांत हजारो मजूर जमा झाले. पुढें पैसा संपल्यामुळें तें काम दाहा बारा दिवसांतच बंद पडलें.

हल्लीं पबलीक वर्क्स खात्यांतून तेल्हाऱ्या पासून अडसूळ पर्यंत रस्त्याचें काम सुरूं केलें आहे. व तेथें एका स्पेशल अशिस्टंट कमिशनरची ही नेमणूक केली आहे. परंतु या कामावर १६०० लोकांपेक्षा अधिक मजूरदार घेतले जात नाहींत, यामुळें गरीब लोक फार घाबरून गेले आहेत. दुसरीकडे धंदा नाहीं, व सरकारी कामावर दुष्काळपीडित लोकांस घेत नाहींत, तेव्हां मरण्याशिवाय या लोकांस दुसरा मार्गच राहिला नाहीं.

जों पर्यंत इतर लोकांकरितां निराळीं कामें सरकारानें काढलीं नाहींत, तोंपर्यंत अमुकच लोक कामावर घेण्याबद्दलचा प्रतिबंध कां कसावा हें आह्मांस समजत नाहीं. कित्येक मजूरदार लोकांस काम करण्याबद्दल परवाने देऊनही त्यांचे पासून ते परत घेऊन त्यास वाटेस लाविलें असें समजतें. आतां या लोकांची वाट कशी व्हावी. फयामीन कोड प्रमाणें अनाथगृहाची जर इकडे स्थापना झाली असती, तर आजपर्यंत चार पाचशें अनाथ दुबळे लोक अन्नास लागले असते व सर्व दुष्काळपीडित लोक जर कामावर लावले असते तर ९००० वर संख्या आजपर्यंत झाली असती.

आमची वऱ्हाडची सार्वजनिक सभा किंवा अकोला कॉंग्रेस सभा, पुण्याचे सार्वजनिक सभे प्रमाणें इकडे जर आपला एखादा हुशार एजंट माहिती मिळविण्या करितां पाठवील तर त्या एजंटा पुढें, ज्या लोकांस खावयास न मिळाल्यामुळें उपाशी मरावें लागतें, असें हजारों लोक या तालुक्यांत आहेत असें त्यांस प्रत्यक्ष दाखवितां येईल.

मजूरदार लोकांस कामावर न घेतांही मजूरदार लोक काम करण्यास मिळत नाहींत अशी सबब लावून दुष्काळच नाहीं, असा सरकारी रिपोर्ट पुढें मागें प्रसिद्ध होण्यास कमी होणार नाहीं. करितां दुष्काळा निमित्त इंग्रजी राज्यांत एकही पुरुष, स्त्री किंवा मूल उपाशी मरू द्यावयाचें नाहीं असें जें आपल्या दयाळू राणी सरकारचें अभिवचन आहे, त्याची स्मृती वारंवार अधिकारी वर्गास देऊन त्यांचें या विरुद्ध घडत असलेलें आचरण त्यांचे पदरांत हडसून खडसून घालावें हें आपलें सध्या कर्तव्य आहे.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती फाल्गुन शुद्ध ९ शके १८१८

---

नामदार सर डेनिस फिटझ प्यांट्रीक के. सी. एस. आय. पंजाबाचे लेफटेनंट गव्हरनर यांस गेल्या शुक्रवारा पासून पेनशन देण्यांत आलें. त्यांच्या उत्तम कारकिर्दी बद्दल व चाकरी बद्दल व्हाईसराय साहेबांनीं निराळा ठराव केला असून त्यांच्या हुद्याचे सर्व मानपान ते बंदरावर आगबोटींत चढे पर्यंत त्यांस देण्यांत येतील असाही हुकूम झाला आहे. नामदार साहेब या प्रांताचे अलिशान रेसिडेंट होते व ते या प्रांतीं चांगले लोकप्रिय होते. ते असतांना हैदराबाद दरबाराची स्थिती चांगली होती. विनाकारण कोणत्या भानगडींत आपण होऊन हात घालून सर्व गोष्टींचा विचका करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. आणि ह्मणूनच हैदराबादचें दरबार त्यांच्या वेळीं सुस्थितींत होतें. साहेब बहादूर पेनशनीच्या कालांत कृतज्ञतेनें या देशाच्या कल्याणार्थ झटतील असें आह्मी मना पासून इच्छितों.

---

मि. एफ एस. बुलक, सिव्हील सरव्हंट, कमिशनर यांच्या सहीनें सर्व प्रांतस्थ लोकांस येत्या शुक्रवारीं उमरावतीस सभेसाठीं बोलावण्यांत आलें आहे. ही सभा दुष्काळा निमित्त भरणार असून तिजमध्यें दुष्काळनिवारणार्थ एक धर्मादाय फंड उभारण्यांत येणार आहे आणि त्याच्या व्यवस्थे साठीं एक प्रांतिक कमिटी नेमण्यांत येणार आहे. अशा सार्वजनिक प्रसंगाला श्रीमान, दयाळू व उदार गृहस्थ अवश्य जातील आणि आपापल्या शक्ती प्रमाणें धर्मार्थ वर्गण्या देतील अशी आह्मास पक्की उमेद आहे.

हा दुष्काळफंड उभारण्याचे हेतु इंडिया सरकारानें पूर्वीं प्रसिद्ध केले आहेत आणि त्या हेतूंला धरून कांहीं नियमित व्यवस्था वऱ्हाड प्रांतीं व्हावी असा अलिशान रेसिडेंट साहेबांचा विचार दिसतो. हे हेतु सरकारी कागदांत मोठ्या खुलाशानें सरळ भाषेंत प्रसिद्ध केले आहेत आणि ते सरकारच्या गोरवाला व थोरपणाला महती देऊन लिहिलेले आहेत. हे हेतू असे:

दुष्काळ जेथें जेथें पडला आहे तेथील लोकांचे जीव वांचविण्याची जबाबदारी सरकार पूर्णपणें ओळखून आहे; आणि सरकारांतून या कामा निमित्त जे प्रयत्न चालू आहेत त्या प्रयत्नांच्या बरोबरीनें व सरकारच्या प्रयत्नांत हात न घालतां किंवा त्यांची समृद्धी न करितां धर्मादाय-फंड उभारण्याचा एक निराळा स्वतंत्र प्रयत्न अगदीं जरूर केला पाहिजे. अशा धर्मादाय फंडा पासूनही पुष्कळ मोठा कार्यभाग व्हावयाचा आहे आणि हा कार्यभाग सरकारी कार्याला जोडगोळी प्रमाणें आहे. निव्वळ उपासाची पाळी नाहीं तथापि त्याच्या खालोखालची दुष्काळाची पीडा व दुःखें दूर करण्यासारखीं किंवा कमी करण्यासारखीं पुष्कळ असतात. खासगी धर्मादायाचा मुख्यत्वें करून खालील बाबींकडे उपयोग केला जाणार आहे:—

(१) सरकारी फंडांतून प्राणधारणेला आवश्यक इतक्या अन्नाची दाद मिळते आणि या शिवाय अन्नाचीं किंवा वस्त्राचीं अल्पस्वल्प सुखसाधनें धर्मादाय फंडांतून दिलीं जातील पण हीं सुखें ह्मातारऱ्याकोताऱ्यांस, दुर्बळांस, इस्पितळांतील रोग्यांस, मुलांस किंवा त्यांच्या सारख्यांसच मिळतील.

सार्वजनिक पैसा खर्चण्याची जबाबदारी मोठी आहे आणि दुष्काळाचा प्रसारही मोठा भयंकर आहे ह्मणून सरकारच्या व्यवस्था नेमक्या व बांधलेल्या अशा आहेत आणि सरकारचा प्रयत्न फक्त जीव वांचविण्याच्या पलिकडे जात नाहीं.

(२) जीं अनाथ पोरकीं मुलें आहेत त्यांच्या रक्षणाकडे धर्मादाय-फंडाचा उपयोग होईल.

दुष्काळांत पुष्कळ मुलें अनाथ पडतात. त्यांचे पालनकर्ते मरण पावतात किंवा देशोधडीला लागतात अशा अर्भकांचें वयांत येई पर्यंत पालनपोषण धर्मादायाच्या रकमेंतून झालें पाहिजे.

(३) सरकारी दुष्काळाच्या कामावर जाण्यापेक्षां उपाशी राहणें बरें अशा निग्रहाच्या गरीब पण मानधन कुटुंबीयांस मदत करण्याकडे या धर्मादायाचा उपयोग होईल. असा धर्म करण्यापूर्वीं सरकारांतून उपासमाऱ्यांत चिरडणाऱ्या लोकांविषयीं पक्की चौकशी केली जाईल.

ज्या लोकांस पडदा किंवा मराठशाला आहे अशा लोकांत बाहेर जाण्याची मनाई मोठी असून तो एक पवित्र कुलाचार बनला आहे. अशा लोकांची खरी दशा सरकारास तर कळावयाची नाहीं पण खासगी रितीनें देखील अशा लोकांचे हाल व यातना नजरेस येणार नाहींत.

(४) दुष्काळाशी सामना करण्यांत ज्यांचें सवस्व हरून गेलें आणि जे निराश्रित बनले आहेत, त्यांस पूर्वस्थितीला आणण्याच्या कामासाठीं धर्मादाय फंडाचा उपयोग होईल.

शेतकरी दुष्काळामुळें इतका घाईला येतो कीं, पुढील वर्षी जमिनीची कष्टमशागत करण्याचें धनबल त्याजपाशीं नसतें आणि त्यामुळें त्याची जमीनही त्याच्या हातांतून जाण्याची वेळ येते. तो अगदीं मोल मजूरदार बनतो. अशा स्थितींत त्याला मदत देऊन त्याची शेती कायम राखून वाडवडिलापासून चालत आलेला त्याचा शेतकीचा धंदा पुढेंही चालविला पाहिजे.

असे चार प्रकारचे हेतु दुष्काळानिमित्त धर्मादाय फंड उभारण्याचे आहेत. हल्लीं विलायतेंत जी इंडियासाठीं वर्गणी गोळा होत आहे तिचा कांहीं भाग या प्रांताच्या वाट्याला येईल. या भागाची व्यवस्थाही येत्या शुक्रवारीं स्थापित होणाऱ्या कमिटी कडे दिली जाईल. ईश्वर कृपेनें ज्या गृहस्थांस श्रीमंती लाभली आहे त्यांनीं त्या कृपे बद्दल उतराई होऊन आपल्या देशबांधवास यथाशक्ति हस्ते परहस्ते वर्गणीच्या रूपानें मदत करावी आणि हें प्रत्यकांचें कर्तव्य आहे असें आम्हांस आतां निराळें कळविण्याची जरूर नाहीं. वरील चारही हेतु फार स्तुत्य आहेत आणि अशा धर्मकृत्याला सर्वजण उदार आश्रय देतीलच आणि मि. बुलक साहेबांच्या या सार्वजनिक प्रयत्नाला यशश्री प्राप्त होईल अशी आमची खात्री आहे.

## The Berar Samachar

MONDAY MARCH 8 1897

The Bubonic plague has been a terrible mystery to all of us. It has been raging furiously more than ever at Bombay. It has been there for the last six months and steadily and rapidly growing with time. Its ravages have been large and terrific in Bombay Karachi and even in Poona in spite of the vigorous measures taken by the authorities there. Various remedies and preventives are being suggested from time to time but almost all most unfortunately faild in either curing or preventing the spread of the epidemic.

The epidemic has been very fickle in its nature. As to its cause Doctors disagree. No one has yet been able to declare it to be contagious. The highest authorities declare it to be otherwise. In the last week the plague mortality (the 'reported' mortality) in Bombay has been variable in the extreme. While one day the reported mortality rises to over 200, another day it falls to nearly 80, and a ray of hope just brightens up our hearts, but the very next day the mortality rises to 118 or so. A pang of disappointment and grief shoots through our hearts and we have simply to resign ourselves to the Merciful Almighty. Again it is no secret to any one that the 'reported' mortality is but a fourth of the real mortality. We cannot say that filthiness alone is the cause of the plague Had it been so the largest number of its victims would have been from among the sweepers and the epidemic would never have found reception on the Malabar hills of Bombay nay even in the Government House.

To add to the grief the preventive measures have been rigorous and oppressive to a degree. The highest possible room has been given to the so—called discretion of the highest as well as the lowest Government officer. The Sanitary Commissioner as well as the harpy of the policeman drawing rupees seven. We do not see the justice of the reason on which sepration is enforced—it as yet the disease is not declared to be contagious. The oppressiveness with which it is enforced is simply intolerable. In Poona the Reay Market people actually rescued a woman from these officers with a marked rebellious spirit and if these authorities persist in their folly we have little doubt that desperate men will not fail to shed blood. The messengers of Death at Kalyan—the army of medical men often frighten people into fever. The highest folly they commit consists in the segregation of suspicious cases. They lodge all such men under the same roof—all the really infected as well as the uninfected. If they really believe that the disease is contagious they must make special arrangements for the segregation, of these suspicious cases. By logding all these together, they practically in many case commit murders since according to their own theory the noninfected will be soon infected in the neighbourhood of the infected. We need not be surprized if this persecution goads any to call for a bloody vengeance. People are dying of starvation, and of the plague. They will therefore little fear death in any aspect.

---

Swami Vivekananda is a great sage of modern times. The mission of his life is to preach the highest truths of Hinduism. He claims nuiversal acceptance of Hinduism in course of time. It is indeed a pleasure to find that we have a grand heritage of spiritual life. Hindu theism promises to wield the destinies of the world. We are only sorry that a number of our people are ignorant of the grandeur of their spiritual excellence. Hinduism is the only religion that is not at a stand—still. It is highly progressive. Swami Vevekananda has graphically stated why Hindu religion is superior to all the other religions. In his lecture at Madras he observed:—

"The great peculiarity of Hindu religion is that it was based on these spiritual truths and laws, and not on the persons who discovered them. If it had taken up the latter position, its merit and demerit would have to become inseparably and intimately associated with the biography of those personages; and, as historical evidence in regard to remote eras of human history is apt to be weak, the spiritual truths inherited from them will also have to suffer to some extent in their hold on men's estimation. Christinity has to stand or fall with Jesus Christ, Mahommedanism with Mahommed, and Buddhism with Buddha. But Hinduism demands a hearing from men and obtains its hold on their allegiance, simply and purely on account of the spiritual truths which it contains and which is necessary for man to know and realise in order that he may become perfect. Of course, we have, and we can not help having, the greatest veneration for the discoverers of those truths; and in this respect we have the great advantage of offering our tribute of homage and love for the great ones of all ages and of all lands, while tha followers of personal religions necessarily have to be intolerant of the claims upon men of all except the particular person of persons whom they accept as the bearers of the divine message. The noble catholicity of Hinduism and its insistence on the harmony of religions and the solidarity of the human race are all due to its superiority in this respect over all the other religions of the world."

---

The grand moral truths of Hinduism have a strong hold on the minds of the people. This religion develops its sphere of spiritual knowledge with the advance of civilization. The Hon'ble Mr. M. G. Ranade has ably synthetized the varied influences on our religion and has eloquently summarized them in the following master—piece of the writer:—

"Alone in all the countries of the world," says Mr. Ranade, "India has had the privilege of witnessing this convergence of historical faith actively at work without losing its own individual characteristics. With her revelation has not ceased at any point of time. The stream has flowed and still continues to flow in the lives and teaching of every saint and prophet of this or of other lands. From the worship of the elements personified Indian Theism or as I have elsewhere called it the Bhagavat Dharm, developed into the worship of the power which rules over the elements. This power then became clothed with ethical and moral grandeur, banishing the old gods and elements into a lower order of beings and Devtas—Deities. The capacities of the human soul next attracted attention and in the Upanishads the divine nature of the soul was first formulated and carried up even to the point of identity. Then came the Buddhists who strengthened the moral side of our nature and substituted for the old animal sacrifices—the sacrifice of the animal in man as the highest form of worship and the only road to salvation. Next followed the aggressive domination of Mahomedan faith which had its own purpose in enforcing the claims of strict monotheism not only in intellectual apprehension but in practical conduct, and now Christian influences are at work. The power of organisation, active hatred of sin, and indignation against worng doing in place of resigned in diffeence, a correct sense of the dignity of man and woman, active philanthropy and a feeling of fraternity, freedom of thought and action, these are Christian virtues which have to be incorporated into the national character, and this work is actively going on in all parts of the country." There is the whole history and the whole tendency of Hinduism in a nutshell. There is not a breath that blows, not a thing that creeps, not a leaf that stris, but has, to the mind of this marvolious man, a significance and an influence for good which may not be ignored."

---

## वऱ्हाड

हवामान—थंडी पहाटेस चांगली पडते पण दिवसा ऊनही अती तापतें. हवा निरोगी आहे असा सर्वजणांचा समज आहे. उष्णमापक यत्रांत पारा ९६ अंशा पासून १०० अंशा पर्यंत चढत उतरत असतो. लोकांचें आरोग्य वाईट नाहीं पण दुष्काळाच्या तडाख्यामुळें गोरगरीबांचा कल्लोळ उसळला आहे.

आकोल्याच्या डिसेपेन्सरी कमिटीचे सभासदांच्या रिकाम्या जागीं क्याप्टन आयव्हर्स व रा. रा. जयकृष्ण बगाजी यांस नेमण्यांत आलें आहे.

सांथीच्या रोगाच्या कायद्या प्रमाणें वऱ्हाडांत खालील स्टेशनावर उतारूंची तपासणी हास्पिटल असिस्टंट कडून होत जाईल. जर कोणी दूषित तापानें आजारी वगैरे दिसला तर त्याला निराळ्या स्वतंत्र ठिकाणीं नेमण्यांत येईल:—मलकापूर, नांदुरा, खामगांव, शेगांव, आकोला, मुर्तीजापूर, बडनेरा आण चांदूर.

गेल्या दिसेंबर महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत १०४८८ माणसें जन्मलीं आणि ६९१४ मरण पावलीं. ह्या महिन्यांत जन्म पुष्कळ झाले पण मृत्यु फार कमी झाले.

रा. रा. विनायक आपाजी काणे तहशीलदार, आकोट, यांची स्वारी नवीन तरमबंदीच्या कांहीं कामानिमित्त मे. डिपुटी कमिशनर साहेबांच्या भेटीला आली आहे.

एका दमगींत २–३ मग अफू सांपडली असून पोलीसची चौकशी जारीनें चालू आहे. बसण्याच्या फळयाखालीं पेटी केली असून त्यांत अफू ठेविली होती. केवढी ही पैशाची हांव व अजब लबाडी !

येत्या शुक्रवारीं उमरावतीस दुष्काळा निमित्त प्रांतिक कमिटी स्थापण्यासाठीं व वर्गण्या गोळा करण्यासाठीं मोठी जाहिरसभा मे० कमिशनर साहेब भरवीत आहेत. बुलक साहेबा सारख्या थोर गृहस्थाच्या निमंत्रणाला आणि लोकहिताच्या कार्याला पुष्कळजण जातील असा समज आहे.

---

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८४ रुपये |
| जवारी | ९५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,,( बनशी ) | १३५ रु० |
| चणे | १२० रु० |
| तेल | ६ रु० मण |
| तूप | ६॥। मण |
| सोनें | २६॥ तोळा |
| चांदी | ८४ |

---

## जाहिरात.

विद्यमान दिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे अकोलें,

जाहीरनामा सर्वत्र लोकांस कळण्याकरितां दिल्हा जात आहे कीं अकोलें जिल्ह्याचा गांज्याचा मक्ता सन १८९७–९८ सालाकरितां नारायण वल्लद सटवाजी राहाणार नाशीक यानें घेतला आहे. त्यानें नियमा प्रमाणें जामीनदार आजपावेतो हाजर केले नाहींत. याजकरितां झालेला हरास रद्द करण्यात आला आहे. सदरहू मक्त्याचा फेर लिलाव सदरहू नारायण वल्लद सटवाजी याचे जबाबदारीवर आमच्या कोर्टांत तारीख १९ मार्च सन १८९७ रोजीं दिवसा बारा वाजतां केला जाणार आहे. करिता ज्यांची घेण्याची मर्जी असेल त्यानीं सदरहू तारखेस हाजर राहून घेण्याची तजवीज ठेवावी. शर्ती मामुल प्रमाणें आहेत. कळावे तारीख ३ माहे मार्च सन १८९७ इसवी. दिपुटी कमिशनर साहेब.

F. W. Prideaux
दिपुटी कमिशनर

## वर्तमानसार.

अग्निपूजक लोक—पामीर प्रदेशांत शोध करण्यासाठीं देनमार्क देशचे दोघे सृष्टि शोधक कांहीं दिवसांपूर्वी गेले होते. त्यांची नांवे एम्. एम्. ओल्यू फसीन आणि फिलिफसीन अशीं होतीं. आजपर्यंत कोणीही युरोपियन ज्या भागांत कधींही गेले नव्हते त्यांत हे गेले होते. हा भाग समुद्राच्या सपाटी पासून १४००० फूट उंचीवर आहे ह्या भागांत कित्येक खुजा रानटी जाती आहेत. त्या अग्निपूजक असून फारच ग्याड आहेत. ह्या भागांतल्या मनुष्यांप्रमाणें इतर प्राणीही खुजे आहेत. त्या प्रदेशांतील गाढवें कुत्र्या एवढीं, आणि शेळ्या मेंढ्या मांजरा एवढ्या आहेत असें त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या हकीकती वरून समजते. सर्व व्यवहाराचे अवश्य साधन जो पैसा तो त्यांना मुळीच माहित नाहीं. त्या भागांतला व्यापार ह्मटला ह्मणजे लोकरीचा आहे. हे लोक इतके ग्याड आहेत कीं, ह्या युरोपियन लोकांना पाहण्याबरोबर ते डोंगरांत पळून जात. ह्या देशांत सांपडणाऱ्या चमत्कारिक वस्तु पैकीं ३०० चिजा कोपनहेगेन येथील सर्वसंग्रहालयांत ठेवण्यासाठीं त्यांनीं आपल्याबरोबर आणिल्या आहेत पांच सहा गाई, किंवा १९ मेंढ्या देऊन बायका विकत घेण्याची चाल ह्या प्रदेशांत आहे.

फिलाडेल फिया (अमेरिका) येथून १३८७२१ बुशल धान्य, आणि ६००० पोतीं गहूं मेसर्स टर्नर मारिसन, आणि कंपनीच्या नांवानें आले, दुसरे जहाज वाट चालत आहे.

गांठीच्या तापाला प्रतिबंधक औषध.

एक अनुभविक, वृद्ध, वैद्यशास्त्रज्ञ आह्मास कळवितात कीं, सहा महिन्यांपेक्षां जुनी नाहीं, अशा काळ्या कुड्याच्या सालीचा अगर मुळांचा काढा रोज ३ वेळां घेण्याचा क्रम ठेविला असतां ग्रंथिज्वराची त्या मनुष्याकडे पहाण्याची छाती होणार नाहीं. कुडयाच्या आंगीं ज्वर, अतिसार, कृमि वगैरे दूर करण्याचा गुण आहे त्यानें रक्त शुद्धीही होते. तोळाभर कुडा घेऊन त्याचा अष्टमांश काढा उतरावा, ह्मणजे आठ वाट्या पाणी घालून एक वाटी ठेवावें. घेण्याचें प्रमाण दर वेळेस दोन चमचे किंवा संध्येच्या सहा पळ्या. हा काढा जितका जुना होईल तितका अधिक गुणावह होतो. वैद्यांनीं विचार करून मतें द्यावीं व लोकांनीं अनुभव पहावा. शु० सू०

मागच्या आठवड्यांतल्या पावसानें पंजाबांतली धारण बरीच स्वस्त झाली असून, कलकत्यासही तांदुळांचा भाव उतरला.

शिंदे सरकारानें चार लक्ष रुपयांचे धान्य दुष्काळ पीडितांसाठीं खरेदी केलें आहे.

स्वामी विवेकानंद हे सहा ६ महिनें हिमालयपर्वतावर राहून तपश्चर्या करणार आहेत.

दर वर्षी ४ लक्ष पौंड किमतीचें केस इंग्लंडांत खपतात.

अमृतबझार पत्रीकेवरून असें कळतें कीं, चालू दुष्काळांत मध्य प्रांतात गेल्या आक्टोबरांत दीड लक्ष माणसें उपासमारानें मेलीं भावनगरी, स्टेट सेक्रेटरी इकडे लक्ष देतील काय?

पत्याळचे महाराजांनीं आपले संस्थानांतील दुष्काळग्रस्तप्रजेस ७४००० मण गहू व २६००० रुपये रोख बक्षीस दिले.

इतके दिवस मद्रास सरकार हिंदुस्थान सरकाराला प्रति वर्षी ८४३००० रुपये देत होते. पण यापुढें त्यानें ३२,५५,००० रुपये दिलेच पाहिजेत असें बड्या लाट साहेबांकडून लिहून गेल्याचें ऐकतों.

बदामी येथील रिलिफ मामलेदार हे फिरतीवर असतांना वाटेंत भरदिवसा त्यांच्यावर कांहीं चोरांनीं हल्ला करून त्यांचे जवळचे सुमारें १५० रुपये नेले व रेकार्ड जाळून टाकले.

हिंदुस्थान सरकारापाशीं हल्लीं १२ कोट रु० शिल्लक आहेत.

महाराणीचे राज्या रोहणास ६० वर्षे झालीं ह्मणून २१ ते २६ जूनपर्यंत मोठा उत्सव होणार आहे.

लंडन शहरांतील लोकांना रोज ४० खंडी मीठ लागतें.

एक नोट तयार करण्यास सरासरी ४ पै खर्च येतो.

जे गोल्ड ह्मणून अमेरिकेन कोट्याधीश आहेत, त्यांची इस्टेट ३५,३३,२५,६२० रुपयांची आहे.

झाडें सकाळीं ४ व ६ वाजावयाच्या दरम्यान इतर वेळांपेक्षां ज्यास्त जलद वाढतात. न्या. सिं०

पार्लमेंटमध्यें झालेल्या राणीच्या भाषणास कॉमन्स लोकांनीं प्रतिकूळ मत दिलें आहे.

एक लाख रुपयांच्या अधेल्या व २० हजार रुपयांच्या पावल्या इतकें नवें नाणें मुंबईच्या टांकशाळेंत गेल्या अठवड्यांत तयार झालें. दुष्काळांत मजुरांस वाटण्यास अडचण पडूं नये या करितां हें पाडेलें आहे. सोन्याचे इंग्रजीडालर ८,५७,००० रुपये किमतीचें विलायतेस पाठविण्या करितां कस्टम खात्याच्या स्वाधीन केले आहेत. टाकशाळेंत सरकारच्या मालकीची ३१,७३००० रुपयांची चांदी शिलक आहे. व ४० लाखाची येणार आहे.

पुणें, करांची फलटण, पालनपूर सुरत, भडोच, चिंचणी, अहमदाबाद, वसई जवळील पापडी वगैरे ठिकाणी ग्रंथिक तापाचा प्रसार होत आहे

पंढरपूर तालुक्यांतील पाटील, कुळकर्णी यांनीं खाजगी मनुष्यांस दुष्काळाची माहिती देऊं नये असा हुकूम सुटल्याची बातमी समजते.

ब्रिटिश पार्लमेंटाची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत तेथें सुमारें २०,००० वर कायदे करण्यांत आले.त्यातील हल्लीं ५,००० कायदे अमलांत आहेत. ह्यां अमलांत असलेल्या पांच हजार ५,००० कायद्यापैकीं ३,००० कायदे तर आमच्या महाराणी सरकारच्या अमलांतच बनलेले आहेत.

गाईचा व कुत्रीचा स्नेह— यादगीर गांवीं एका गृहस्थाच्या घरीं एक गाय आहे. तिचें दूध कुत्री पिते व कुत्रीचें दूध गाईचें वासरूं पितें! हा एक सृष्टीतील अजब चमत्कार होय. ही हकीकत तेथील एक गृहस्थ कळवितात. ईश्वराची करणी अगाध आहे खरी. आ० वृ०

सन १८९८ इसवीचें भविष्य

१ उत्तर व पश्चिमेकडील मुसलमान अधिकाऱ्यांत तंटा होईल. २ काबुलचा अमीर सरकाराशीं विरोध करील; परंतु त्याच्या जिवाला स्वस्थता वाटणार नाहीं. ३ हिंदुमुसलमानांत दंगे होतील, ४ सरकारी राज्य व्यवस्थेंत हिंदुंना कांहीं अधिकार मिळेल. ५ दोन तीन इंग्रज अधिकारी राष्ट्रीय सभेत सामील होतील. ६ ब्रिटिश सरकारास बरीच उपाधी लागेल.७ ब्रह्मदेशांतील अग्नेय देशांत कांहीं हानि पोहोंचेल.

सन १८९९।१९०० इसवीचें भविष्य

वरील प्रमाणें खराब वर्षें मागें शेकडों वर्षांत आलें नाहीं. एका राशीला ८ ग्रह येतील. वरील योग कौरव पांडवाच्या लढाईचे वेळीं आला होता, यावरून वरील वर्षांचें साधारण अनुमान करितां येईल. १ दक्षिण व पश्चिमेकडील देशांत १ व १० अक्टोबरचे दरम्यान एक छोटेंसें शेंडेनक्षत्र दिसेल. २ युरोपांतील सर्वांत मोठा बादशहा जो सर्वांत वृद्ध आहे, ज्यानें सर्वांपेक्षां अधिक कालपर्यंत राज्य केलें आहे, ज्यानें आपल्या पूर्वीच्या बादशहापेक्षां अधिक देशावर व अधिक लोकांवर राज्य केलें व जो १९ व्या शतकांतील उत्तम बादशहा ह्मणून समजला जातो तो मरेल. महाराणी साहेबांच्या मुलास राज्य मिळेल. ४ हिंदुस्थान व इंग्लंड यांचे दरम्यान बडा वाद प्रतिवाद होईल. ५ पश्चिमेकडील व उत्तरेकडील देशाचे राजांत लढाई सुरूं होईल. त्यांत एकाचा पराजय होईल; व त्याचा मुलुख हिंदुस्थान सरकारास मिळेल; व कांहीं रशियास मिळेल; व इंग्लंड व रशिया यांच्यांत तह होईल. ६ उत्तर व पश्चिमेकडील देशांत दुष्काळ पडेल. ७ सन १८९९ चे आगष्टपासून ता० ७ सप्टेंबरपर्यंत अति वृष्टि होईल भूकंप व वादळें वगैरे होतील. ८ हिंदुस्थानांतील दोन राजे मरतील अथवा पदच्युत होतील- ९ हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर व रशियाच्या दक्षिण सरहद्दीवर ता० ७ सप्टेंबर व २५ नवंबर सन १८९९ याचे दरम्यान भयंकर युद्ध प्रसंग होईल; पण सन १९०० चे मे महिन्यां पर्यंत शांति राहील आणि हिंदुस्थान व विलायत सरकार यांना या वेळीं फार गीति पडेल. १० सन १९०० इसवीचे शेवटीं हिंदुस्थान सरकार हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांस कांहीं जहागीर देईल.

भगवान नारायण नावाचा एक माणूस मुंबईस लागून दमण येथें आला तेथें तो मेला. तो मेल्यावर थोड्या दिवसांनीं त्याची तिरडी उचलणारांपैकीं दोघे याच रोगानें मेले त्याची सुश्रुषा करणारी एक बाईही मेली. हें पाहून तिसरा तिरडीवाला भ्याला व बिलीमोरा येथें पळून गेला, पण तेथें गेल्यावर तोही मेला. भगवान नारायण हा ज्या भाड्याच्या गाडींतून वापी येथून दमण येथें आला तो गाडीवालाही वापी येथें मेला. बाहेरून दमण येथें येणारांची आतां कडक तपासणी चालू आहे.

रमजान महिना सुरू झाला व तो खलास होण्या पूर्वी मोपला लोकांचा दंगा पुन्हा सुरू होण्याचा संभव आहे असें ह्मणतात.

मणीपूरच्या हद्दींत हल्ला करणाऱ्या लुशाई लोकांवर इंग्रजसरकारची जी एक टोळी गेली होती ती आपलें काम करून परत येण्यास निघाली. तिणे हल्ला करणाऱ्या पुढाऱ्यांस कैद केलें असून त्यांच्या गावांस आग लाऊन दिली असें सांगतात. गावांस आग लावण्याचा न्याय कोठला?

निगापट्टनच्या गेल्या दंग्यांत तामिल असल्याबद्दल सौथ इंडियन रेलवेच्या १२० नोकरावर खटला झाला. ५ सुटल व बाकीच्यास १ महिन्यापासून २॥ वर्षापर्यंतच्या शिक्षा झाल्या. या शिक्षा झालेल्यात २२ युरोशियन आहेत. कंपनीने कांहीं नवे नियम केले व ते रेल्वे नोकरास नापसंत झाले ह्मणून हा दंगा झाला होता. अ० द०

रेवा संस्थानांत जें दुष्काळाचें एक जंगी काम सुरूं झालें आहे त्याच्यावरील लोकांमध्यें पटकीची सांथ उठून ३ दिवसांत ३५४ मनुष्यें लागलीं आणि १६० मेलीं. ही सांथ पसरूं न देण्याच्या कामीं तें संस्थान योग्य प्रयत्न करीलच आणि त्या कामीं त्यांस हिंदुस्थान सरकारनें सरळ रीतीची मदत करणें देखील रास्त आहे. पण दरबार तें काम करण्याला अयोग्य आहे असें भासवून त्यानें त्या मध्यें हात घालणें हें वावगें आहे. कारण, पटकी झटकन बंद न झाली तर जर तें दरबार दोषी ह्मणावयाचें तर त्याच न्यायानें मुंबईसरकारालाही दोषी कां ह्मणूं नये. पण ‘टाईम्स आफ इंडिया’ पत्रास हा चोख न्याय समजणें शक्य नाहीं त्याचें आश्चर्य कसलें?

आह्मांस लिहिण्यास फार वाईट वाटतें कीं, मुंबईतील माजी सबार्डिनेट जज्ज रा. सा. दिनानाथ आत्माराम दळवी एम. ए. एल. एल. बी यांस साथीच्या तापानें देवाज्ञा झाली. मृत्युसमयीं यांचें वय सुमारें ४५ वर्षांचें होतें. हे गणीत शास्त्रांत मोठे प्रवीण असत. पाश्चात्यगणितशास्त्रकोविद पंडितांना यांनीं आपल्या बुद्धिवैभवानें हात टेकावयास लाविलें होतें. यांच्या सारखा गणितशास्त्रविशारदपंडित आज आमच्यांत राहिला नाहीं, याचें आह्मांस फारच वाईट वाटतें. यांच्या मृत्यूनें त्यांच्या कुटुंबांतील मंडळीस तर दुःख झालें आहेच, परंतु यांच्या ह्या अकालिक मृत्युमुळें सर्व हिंदुस्थानचें मोठें नुकसान झालें आहे. हे सरळ स्वभावाचे व निःपक्षपाती होते. असो: ईश्वर यांच्या आत्म्यास शांति देवो. न्या० सु०

रा. रा. विनायक गोविंद आपटे याजवर पेणेस जो खटला झाला त्याचा निकाल होऊन त्याना एक वर्षाची साधी कैद आणि २०० रु. दंड, दंड न दिल्यास पुन्हां ३ महिन्यांची कैद या प्रमाणें शिक्षा झाली! अपील चालू आहे.

नाशिक येथें सांथीचे तापाच्या सात आठ केसिस झाल्या असें समजतें.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “वऱ्हाडसमाचार” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८
साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास.................... ४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........ १ ६
दुसरे खेपेस ........... १

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ...... ... ...„ 8 as
Single copy ............... ......... as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI | AKOLA MONDAY 15 MARCH 1897 | NO II

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख १५ माहे मार्च सन १८९७ इ० | अंक ११

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवांनें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातीत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवाअधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken Agent

---

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा, व स्टेशन धर्म शाळेचा कर वसूल करण्याचा सन १८९७।९८ सालचे हक्कांचा लिलाव तारीख २३ माहे मार्च सन १८९७ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टौन हालांत हजर राहावें कळावे तारीख २७ माहे २ सन १८९७ इ०

Shankar Govind
Secretary
Akola M. Committee.

---

## नोटीस

नोटीस बेशमी— जानी मर्द सूर्यभान कोकाटे रहाणार मौजे बाभळी तालुके दर्यापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे बाभळी येथील सर्वे नंबर ७३ पैकीं एकरगुंठे १०-३९ आकार रुपये ३८ याचे खाते माझे नावे होते ते शेत तुह्मांस रुपये ५८८ अक्षरी साडेआठवन रुपयास विकत दिले व राजीनामा करून दिल्यावर रुपये द्यावे असें ठरलें होते यावरून आपला राजीनामा व तुमची कबुलायत ता० १६ जानेवारी सन १८९७ इ० रोजीं करून दिले व खातेही तुमचे नोव झाले परंतु त्यावेळीं रुपये दिले नाहींत. मी पुष्कळ वेळ तुह्मांस रुपये मागितले परंतु दिले नाहींत सबब ही नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसांचे आंत रुपये ५८८ व नोटिशीचा खर्च ३-८ असे रुपये ६२ द्यावेत. न दिल्यास तुमचेवर दिवाणीत दावा करणें भाग पडेल कळावें तारीख ६ माहे मार्च सन १८९७ इ०

( सही )

निशाणी पुंजा वल्लद भिवसनजी हाडळे रहाणार बाभळी याचे हातची असें.

---

हल्लीं चालूं असलेल्या सांथीच्या तापाच्या संबंधानें वेदशास्त्र संपन्न रा. रा. कृष्णशास्त्री पुराणीक वैद्य पनवेलकर यांनीं आमच्याकडे खालील औषधोपचार प्रसिद्धीसाठीं पाठविला आहे.:—

ग्रंथिक सन्निपातः ह्या रोगाची सांथ ज्या ज्या ठिकाणीं असेल त्या वस्तीतल्या लोकांनीं आपापलें वर्तन खालीं दर्शविल्या प्रमाणें ठेवावें; तें येणें प्रमाणें:—

" खाणें पिणें व्यवस्थित असावें. ओलसर घरांत राहूं नये. घराला सफेती देऊन आजू बाजूची व मोऱ्यांतील घाण काढून नेहमी स्वच्छता ठेवावी. आंगांत नेहमीं ऊब रहाण्यासाठीं गरम कपडे घालावे. विशेष प्रसंगा शिवाय एरव्ही केव्हांही आंग उघडें ठेवूं नये. परमेश्वरांवर भरंवसा ठेवून नेहमी स्वस्थ अंतकरणानें त्यावें स्मरण करावें. गांवातील सांथीच्या गोष्टी घरीं बोलूं नयेत व मनातूनही होतील तितक्या काढाव्या.

तसेंच सकाळीं विलायती किंवा तुळशीच्या पानांच्या चहांत "महामृत्युंजय" एक गुंज द्यावा. तुळशीचा चहा विलायती चहा प्रमाणेंच करण्याचा; फक्त आधणांत विलायती चहा ऐवजीं ओल्या तुळशीची पानें घालावीं. रात्रीं निजतांना सांथी वरील दोन मासे "चूर्ण" व "वातविध्वंस" हीं औषधें शौच्यास साफ किंवा एक दोन जुलाब करणारींच असून ज्वरनाशक व पाचकही आहेत करितां तीं प्रमाणानें घ्यावींत. थोडीशी तापाची कसर किंवा कपाळ दुखतेसें वाटल्यास अगर असें वाटतांच स्नान अभ्यास, श्रम व स्त्रीसग ही अगदीं वर्ज्य करून सांथीचा आरंभ जाहल्या पासून एक तासाचे आंत औषध पोचलें असता धास्ती बिलकूल नाहीं हें पक्कें समजून खालील उपचार करावे:—

आलेली कसर व दुखणारे डोकें हीं सांथी पासून असोत वा नसोत, असें होत आहे असें कळतांच ताबडतोब दोन गुंजा "महामृत्युंजय" तुळशीच्या चहांत घ्यावा. पुढें तीन तासांनीं "सांधीचे चूर्ण पाव तोळा" तापविलेल्या दोन तीन घोट थंड पाण्याशीं घ्यावें. तसेंच दुखणाऱ्या डोक्यावर सुंठ, सावरशिंग, पांढराचंदन, यांचा थंड पाण्यांत लेप करावा." रोग्याची मांडी व कंबर यांचा संधी आणि कांख यांत सूज येण्याचा सुमार दिसल्यास किंवा ती थोडीशी येऊं लागल्यास त्या ठिकाणी "लेपगोळी" कोंबडीच्या आंड्यांतील सफेत पदार्थ अगर तो न मिळेल तर कढत पाणी यांत उगाळून जाडसा लेप करून वर पिंजलेला कापूस बसवावा. न तो व जळेल इतक्या बेतानें त्यावर कवलाचा तापलेला तुकडा ठेवून त्या योगानें सुजेवर चटके बसतील असे करावें. या प्रमाणें अर्धा तास केल्यावर तीन तासांनीं पहिल लेप ऊन पाण्यानें धुवून कोरडा करून पुन्हा दुसरा लेप देऊन वरील प्रमाणें शेकावें. या प्रमाणें अहोरात्रांत तीन वेळ करावें. ह्मणजे तिसरा लेप पुन्हा तीन तासांनीं देऊन दुसरे दिवशीं सकाळ पर्यंत न धुतां तसाच राहूं द्यावा.

ज्वरांत एक दोन जुलाब होतांच "महामृत्युंजय" व "चूर्ण" देणें बंद करून एक मासा "अगदयोगी" दोन तीन घोट कोमट अगर तापवून थंड जाहलेल्या पाण्यांत घ्यावा ह्मणजे सांधीचा ताप व त्यांतील दाह सुका खोकला, ओकारी, जुलाब, रक्त पडणें हे विकार तात्काळ कमी होतात. ज्वरांत गुचकी ( उचकी ) असेल तर मोराचें एक पीस तुपाचे दिव्यावर जाळून ती राख पिंपळीचें चूर्ण दोन गुंजा, हीं संध्येच्या पळीभर मधांतून वारंवार थोडथोडीं चाटवावी; ह्मणजे उचकी ताबडतोब राहील.

ज्वराचा वेग तीव्र असून मूर्छा येत असल्यास तसेंच शौच्यास साफ होणें इष्ट असल्यास "वातविध्वंस नंबर एक गुंजा दोन" ( मात्रा दोन ) दहा थेंब आल्याचा रस व पाव तोळा मध यांत देणें. शौच्याची जरूर नसेल तर "कालकूट गोळया दोन" आल्याचा रस व मध यांत देणें. कालकुटानें दाह होईल तर "अगदयोग" देणें.

घाम येऊं लागतांच व सुस्ती वाटतांच, व त्या बरोबर हात पाय गार होताहेत अशा वेळीं एक गुंज ( पंचवीस वेढे ) "हेमगर्भ" आल्याचा रस व खडी साखर यांत देणें या योगानें कफ, दम, सुस्ती हीं सर्व जाऊन आंगांत उबारा येईल. फार घाम येऊं लागल्यास भाजलेल्या चण्याचें पीठ, शेणीचें भस्म किंवा ओव्याचें चूर्ण हीं आंगास लावणें.

क्षयी, अशक्त, गर्भिणी, व लहान मुलें अशांना साथी वरील "काढा, चूर्ण, व महामृजंय" हीं देणें. काड्याच्या पुड्यापैकीं एक पुडी पक्का शेर पाण्यांत उकळून ते दहा तोळे उरवून त्यापैकीं निमे दिवसा व निमे रात्रीं देणें.

सांथीचा विकार नसतां "महामृत्युंजय व चूर्ण" वेळीं घेणें. किंचित् ज्वर येतांच वरील औषधें [ महामृत्युंजय व चूर्ण " ] अतीशय ताप येईल तर कालकूट, व विशेष प्रसंगीं हेमगर्भ.

ताप लांबणीवर जाईल तर तशा स्थितीला योग्य अशी मात्रा सकाळीं, दोन प्रहरीं एक वाजतां व सायंकाळीं साहा वाजतां पांच तोळे प्रमाणें काढा व रात्रीं पुन्हा स्थित्यनुरूप मात्रा देणें.

सार्थीत वरील औषधांचा उपयोग करतांना पित्त वाढेल तर अगोदर "अगदयोग" देणें.

वर सांगितलेलीं औषध घेण्याचीं प्रमाणें मोठ्या मनुष्यांचीं होत. हीं औषधें १६ वर्षांचे आंत पाऊणपट, बारा वर्षांचे आंत निमे, आठ वर्षांचे आंत तृतीयांश, पांच वर्षांचे आंत चतुर्थांश, व त्याचें आंत अष्टमांश, घेण्याचे समजावें. फार सशक्त मनुष्यास विशेष प्रसंगीं महामृत्युंजय, वातविध्वंस यांचें प्रमाण दिढीनें वाढविणें. व केव्हां दुप्पट देणें.

पथ्य नेहमीचे अन्नांत विशेषतः दुधाचा उपयोग करणारे व लहान मुलें ह्याना दूध देण्यास अगदीं हरकत नाहीं. सदर दुधांत तितकेंच पाणी घालून तें आटल्यावर दुधाचा उपयोग करणें फार चांगलें. इतर रोग्यांना जुन्या तांदळाची कण्हेरी, साळीच्या लाह्या अगर थोडा गुळ व पाणी घालून त्यांचे पाठ द्यावें.

पिण्याला पाणी द्यावयाचें तें ढकलून त्यांत तापविलेलें सानें, लोखंड. अगर, कोल, किंवा पिंपळाच्या सालीच्या वाळलेल्या खपण्या विस्तवांत लाल करून विझवून साळीच्या लाह्या घालून निववून देणें अशा प्रकारे तयार केलेलें पाणी रोग्यास तापाचे तीव्रतमुळें तहान लागून घसा अगदीं सुकतो तेव्हां दर दहा किंवा पंधरा मिनिटांनीं संधेची पळी अगर लहान चमचाभर दिल्यास अगदीं हरकत नाहीं. असें देण्यानें कांहीं वाईट परिणाम न होतां उलट रोग्यास हुशारीच वाटेल तें नेहमीं देत असावें.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती फाल्गुन शुद्ध १२ शके १८१८

हल्लीं जो दुष्काळ फैलावत चालला आहे त्याच्या विषयीं सरकारास व लोकांस अगदीं बरोबर अशी माहिती नसते आणि लोका संबंधानें काय केलें पाहिजे, त्यांच्या गरजा काय काय आहेत इत्यादि आवश्यक गोष्टीची देखील योग्य कल्पना नसते. या शिवाय इंग्लंडांत जी ब्रिटिश कांग्रेस कमिटी आहे तिचे अध्यक्ष सर वुलियम वेडरबर्न यांच्या मनांतून दुष्काळाच्या माहितीचें सविस्तर पत्रक इंग्लिश लोकांपुढें मांडावयाचें आहे. तेव्हां आमच्या प्रांता संबंधाची माहिती आमची आह्मांस कळावी, सरकारापाशी यो

ग्य दाद मागता यावी आणि विलायतेसही इतर प्रांत बरोबर वऱ्हाडची स्थिती दाखविण्यांत यावी ह्मणून आह्मी आमच्या प्रांतस्थ लोकांस विनंती करितो कीं जर कोणी परोपकारबुद्धीनें खालील प्रकारची माहिती आह्मांस आपापल्या गावा संबंधानें देतील तर आह्मी त्याचे फार आभारी होऊं. ही गोष्ट सार्वजनिक कल्याणाची आहे तेव्हां अशा कार्यास मदत यथास्थित मिळेल अशी आमची खात्री आहे. खालील माहिती जितकी मिळेल तितकी आह्मांस पाहिजे आहे परंतु सर्व माहिती मिळण्या सारखी नसल्यास जी मिळेल ती देण्यांत यावी. सरकारी रिपोर्ट पुष्कळ प्रकारानें सत्यापासून दूर असतात किंवा कांहीं चमत्कारिक गूढ कारणामुळें सरकारास कधीं कधीं खऱ्या गोष्टी कळत देखील नाहींत ह्मणून लोकदृष्टीनें या दुष्काळ प्रकरणाची सर्व माहिती प्रसिद्धीस येईल तर त्यांत सरकारचें व रयतेचें कल्याण आहे. माहितीचा तक्ता पद्धतशीर असावा ह्मणून मोठ्या श्रमानें तयार करविलेला नमुना आमच्याकडे मुंबई प्रेसिडेन्सी असोशिएशन कडून आला तोच आह्मी आमच्या प्रांतस्थ लोकांच्या सोयीसाठीं खालीं छापीत आहों.:—

१ जिल्हा, २ तालुका,
३ शहर किंवा गांव, ४ लोकसंख्या.
५ घरांची किंवा कुटुंबांची संख्या.
६ दोन किंवा अधिक वर्षें दुष्काळांत टिकाव काढणाऱ्या कुटुंबांची संख्या.
७ मुख्य धंदा.
८ सरकारी किंवा खासगी नोकरांची संख्या.
९ केवळ शेतकीवर निर्वाह करणाऱ्या लोकांची संख्या.
१० कर्जबाजारी नसलेल्या कुटुंबांची संख्या.
११ गुरांची संख्या.
१२ चाऱ्याची स्थिति.
१३ खरीफाचीं पिकें होणारी जमीन एकर.
१४ खरीफाच्या पिकांच्या जाती.
१५ खरीफाच्या पिकाची सरासरी आणे.
१६ रबीचें पीक होणारी जमीन
१७ रबीच्या पिकाची सरासरी आणे.
१८ सरकारानें काढलेली खरीफाची सरासरी.
१९ सरासरी कशी काढली तें.
२० इतर वर्षांच्या मानानें ह्या वर्षीं रबीचें पीक होणाऱ्या जमिनीचें प्रमाण.
२१ जुनें शिल्लक धान्य—खंडी, पल्ले किंवा दुसरें माप
२२ यंदा उत्पन्न होणाऱ्या धान्याचा अंदाज— खंडी वगैरे.
२३ नोंवेंबरच्या पहिल्या तारखेपासून बारा महिन्यांस दर माणशीं लागणारे धान्याची सरासरी.
२४ धान्याची सांप्रतची धारण.
२५ दुसऱ्या ठिकाणाहून पैसेवाले धान्य विकत आणतील तें अदमासें खंडी वगैरे.
२६ सरकारानें काढलेल्या कामांचा प्रकार.
२७ कोणतीं कामें अवश्य पाहिजेत.
२८ कामावर असलेल्या माणसांची संख्या.
२९ कामें काढलीं नसल्यास तीं न काढण्याचीं कारणें.
३० शेरा.

या ठिकाणीं गांव सोडून गेलेले, नवे आलेले, दुष्काळानें मरण पावलेले लोक यांची संख्या वगैरे माहिती लिहावी.

माहिती देणार—
गांव—
तालुका—
जिल्हा—

ता० माहे १८९

---

गेल्या अंकीं जाहिर केल्या प्रमाणें गेल्या शुक्रवारीं उमरावतीस मेहरबान बुलक कमिशनर साहेब यांच्या अध्यक्षतेखालीं दुष्काळानिमित्त जाहिर सभा भरली होती. मंडळीचा जमाव मोठा होता. एक प्रांतिक कमिटी स्थापण्यांत आली आणि तिचे अध्यक्ष उमरावतीचे डिपुटी कमिशनर मि० लुकस यांस नेमण्यांत आलें. रा० रा० बंधुजी जनार्दन व रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांस सेक्रेटरीचे जागीं निवडलें आहे. सभेच्या सभेंतच वर्गणीचा आंकडा बारा हजार रुपया पर्यंत पोचला होता ही गोष्ट मोठ्या संतोषाची होय. मि० बुलक यांनीं लोकांस सभेचा उद्देश कळवितांना दुष्काळ पीडितांस धर्म करण्या करितां वर्गणी देणें किती श्रेयस्कर आहे हें स्पष्टपणें सांगितलें. या धर्मकार्यास सर्व प्रांतांतून मदत चांगली मिळेल आणि सरकारच्या प्रयत्नाला दुहेरी मदत होऊन लोकांचे प्राण वांचतील अशी आह्मास पूर्ण उमेद आहे. या प्रांतिक कमिट्याच्या आश्रया खाली जिल्ह्यानिहाय पोटकमिट्या स्थापल्या जाऊन त्यांच्या मार्फतीनें सर्व जमलेल्या वर्गणीचा खर्च स्थल, जरूरी, व पात्रापात्रता हीं पाहून करण्यांत येईल. एकंदरीनें सर्व व्यवस्था पद्धतशीर व समाधानकारक होत आहे यामुळें वर्गणी देणाऱ्यांस मोठें उत्तेजन येईल.

---

उमरावतीस सभेसाठीं जे गेले त्यांनीच वर्गणी द्यावी असा कांहीं अर्थ नाहीं. ज्यांस जेवढी धर्मादाय करण्याची अनुकूलता असेल त्यांनीं या वेळीं दुष्काळाच्या धर्मादाय फंडाला उदार आश्रय द्यावा. परंतु सरकार लोकापाशीं वर्गण्या मागतें तेव्हां लोकांचा आक्षेप सरकारा संबंधानें असा निघतो कीं, सरकार आपलें कर्तव्य नीटसें बजावीत नाहीं आणि सरकारानें आमच्या डोक्यावरील करांचा बोजा कमी केला नाहीं तेव्हां सरकाराच्या मागणीला लोकांनीं तरी कां मान्यता द्यावी. खरोखर घरोघर मातीच्याच चुली आहेत. प्रत्येक सुखवस्तु गृहस्थाला देखील दुष्काळ मोठ्या दुःख सागराप्रमाणें भासतो. त्याच्या खर्चाचीं तोंडें चौहीकडून खुलीं होतात, त्याच्या आप्तमित्रा संबंधानें, आश्रिता संबंधानें आणि इतर ओळखीपाळखीच्या संबंधानें सर्व बाजूंनीं त्याच्या वर खर्चीचा मारा चालू असतो. सरकारांत वर्गणी भरली तरी देखील त्याच्यावरील लोकांच्या मागण्या कांहीं कमी होत नाहींत. शेत पिको अगर न पीको त्याला शेतसारा भरावा लागतो. सरकारांतून कोणत्याच करांची माफी होत नाहीं. कोट्याधीश सरकार देखील आपल्या खर्चाच्या संबंधानें बेसुमारानें वागतें. कर्जबजारी नादाराच्या स्थितीजवळ सरकाराची स्थिती आहे तेव्हां अशा सरकाराला लोकांच्या जवळ वर्गणी मागण्याचा तरी हक्क पोंचतो असें आह्मास वाटत नाहीं. सरकार विश्वकुटुंबीय आहे पण त्मास आपल्या विश्वांतील कुटुंबांचा प्रतिपाळ केला पाहिजे आणि या कर्तव्याला सरकार जागें नाहीं तों पर्यंत त्यांच्या आरोळीला लोक देखील बधिर बनतील अशी मोठी भिती आहे.

परंतु वरील आक्षेप खरा पण घातुक आहे. दुष्काळा सारख्या संकटाच्या वळीं प्रत्येकानें आपले कर्तव्य बजवावें. आणि ही ज्याची त्याची माणुसकी आहे. आपलें उदाहरण दुसऱ्यास दाखवून लाजवावें हा उत्तम मार्ग होय. सरकार कोठें चुकत असेल तर आपल्या वर्तनानें सरकारास चुकी दर्शविली पाहिजे.

---

वऱ्हाड प्रांतांत देखील दुष्काळाचें स्वरूप भयंकर आहे. प्रांतांत सर्वत्र चार आठ आणे सरासरीनें पीक आलें आहे तेव्हां असा दुष्काळ पडेल असें प्रथम वाटलें नव्हतें. खरीपाचीं पिकें कोठें कोठें अगदींच आलीं नाहींत व कोठें कोठें रब्बीचे पेरे देखील नव्हते असा प्रकार होता तथापि तो तुरळक असून बहुतेक ठिकाणीं थोडथोडीं दोन्ही किंवा एक एक पीक तरी साधलें होतें. पण हल्लींची लोकांची दैना पाहिली ह्मणजे सर्व देखावा हृदयद्रावक आहे. ही संकटवेळा ओढवेल असें प्रथम अनुमानही नव्हतें. सध्यां भिकारी झुंडी झुंडीनें दृष्टीस पडतात, मोलामजूरीच्या दुष्काळा कामावर मुंग्याप्रमाणें लोकांचा थवा गर्दी करीत असतो, आणि आंधळे, पांगळे व थोटे ईश्वरावर हवाला ठेऊन दिवस कंठित आहेत. सुखवस्तु असे लोक थोडे आहेत. हल्लीं अन्नार्थ मोलमजूरी धुंडणारे लोक खालच्या वर्गांतले फार आहेत. त्यांची शेतीभती नसते, किंवा पुंजीही नसते. सुकाळांत ते किरकोळ मोलमजूरीवर पोट भरून टुमटुमीत दिसतात. पण सध्यांचा दिवस मोठा कठीण आला आहे आणि ईश्वर कसा निभाव लावील याच्या चिंतेनेंत व काळजींत लोक मरून चूर आहेत.

हजारो लोक बेरोजगारी असून उपासमाऱ्यामुळें गायावायीं करीत फिरत असतात. ही प्रत्यक्ष अनुभवाची गोष्ट आहे. ज्यांस ईश्वराच्या कृपेनें ओली कोरडी भाकर मिळत आहे किंवा जे खाऊन पिऊन सुखी आहेत त्यांचें अंतःकरण आपल्या गांवच्या किंवा परगांवच्या लोकांचे हाल व अपेष्टा पाहून फाटून जातें. जो तो आपापल्या परीनें फिकिरींत आहे तेव्हां कोणाचें दुःख कोणी सांगू नये परंतु प्रत्येकानें आपल्या दिलाशीं खात्री करून जी होईल ती मदत दुसऱ्यास करावी. तेल्हाऱ्याच्या जुन्या, अनुभवी व उदार गृहस्थांनीं आपापल्या डोळ्या समोरील दुष्काळाचें चित्र दाखविलें तेव्हां या पत्राच्या लेखकास मोठा खेद व विस्मय वाटला. आकोट तालुका चांगला पिकला तरी ही दुर्दशा आहे! प्रत्येक स्थळाचे लोक गांवांगांवाहून अशाच प्रकारच्या खबरा देत आहेत तेव्हां अशा स्थितींत व्यक्तिमात्राची मदत लोकांस मोठीशी कमाची नाहीं. कांहीं तरी सरकारी तजवीज झाली पाहिजे आमच्या स्थानिक सरकारास या तजविजी संबंधानें कांहीं प्रश्न असूं नये. सरकार कुचराई करीत नाहीं असें असलें तथापि सरकार आपलें कर्तव्य बरोबर बजावीत नाहीं असें दुःखानें ह्मणावें लागतें.

सरकारी दुष्काळानिमित्त उभारलेलीं कामें अगदीं निपुरीं आहेत. ज्या ठिकाणीं दोन दोन हजार लोकांस धंदा पाहिजे तेथें कोठें ६००।७०० लोकांची निभावणी होते. अशा अल्पकामानें कांहीं निभणार नाहीं. अकोला—इंगोली रेलवे काढण्याचें काम सुरू होईल किंवा तसेंच एखादें भक्कम काम निघेल तर लोकांच्या प्राणधारणेची सोय होईल! अकोल्या सारख्या शहरीं देखील अद्याप अनाथगृह स्थापण्यांत आलें नाहीं हें अत्यत शोचनीय होय सर्व कामें ढिलाईनें व दिरंगाईनें चालू आहेत. एकट्या दुकट्या अधिकाऱ्याच्या हातून सर्व कामाची उठावणी होत नाहीं. अशा कार्याला अलिशान रेसिडेंट साहेबा पासून पूर्णपणें पाठबळ मिळालें पाहिजे. आमच्या या लेखानें सरकारास विशेष जागृतो येईल तर आह्मी सरकारचे मोठे आभारी होऊं.

---

# The Berar Samachar

MONDAY MARCH 15 1897

The Victorian era is conspicuous for a number of blessings to India. The moral advancement of the nation is the first and foremost of them. It may well be quoted as the soundest triumph and glory of the British rule in India. But what strikes us most is the manner in which men of Mr. Lee Warner's type express it with their *honored* authority on Indian topics. India is as old as any of the first nations on the face of the earth. She has a proud and glorious past to rest upon. But just as every nation has its bad days India had to pass through a critical period of foreign invasions of the most ruinous nature before she could settle down in the calm peace and safety of the British Raj. Then begun an era of revival and this is the Victorian era. The nation shows signs of development in all departments of civilization. But this onward march of progress was an uphill battle with this nation. Every thing that was old and time —honored was being sweept away in the face of the firm and secure foundations of an European system of Government. The whole nation is passing through the last stage of transition. It is the out—come of the anglo cising influences at work. The *Savants* question the sterling utility and wisdom of the growing change in the moral atmosphere.

If India prospers in moral advancement she has paid very dearly for it. Besides the moral advancement as painted by Mr. Lee Warner is not an unmixed evil. The East is reported to be very indifferent to change and most conservative. With all its tendencies to conservatism India has admirably adapted herself to the *foreign*

influences around her. She can vie with any nation in Europe in this respect but she has lost touch with all that was grand in her own history. Every institution good or bad, is supplanted by one of modern system of the Anglo—Indians. Individual liberty asserts predominance over social compacts of a long standing. An active trade thrives well in regard to all other countries. Political freedom is more a watchword of the present day. Administrative disabilities are removed in the most formal, though unpractical, official manner. Different races and caeeds are welded into one nationality. But we see at the battom of all this a growing degeneration of the Indian people. The martial spirit of the people is dying away as a natural result of the present laws and regulations. The energies of the people are crippled to an enormous extent and if this continues a long time enough the people will sink down into a state of serfdom and will be extinct as a nation unless some agency averts this immionent danger.

The cost of our moral advancement is the total loss of our material prosperity. The nation is poor and bankrupt. It has no staying power to withstand the drain of her material wealth running into England. The material state of a native is a nation. If so, India is going to see its last. We hope such a day will not come! But this is hope against hope unless and until our *benign* rulers see the *dreamy* side of the English Raj.

Lord Roberts is an authority in military matters. As long as force and not right is the dominant factor in human affairs it is patent to all that the British army and Navy should be of the highest water—mark. He moreover insists in the following para on the importance of having trained soldiers:—

"But our Army was small, dangerously small, for the services it might be called upon to perform, all the more need, then, for its being in a high state of efficiency. It was no good insisting upon officers passing examinations and going through the drudgery of the barrack square, route marching, &c., unless they were given opportunies for learning the higher and more important part of their profession by attending camps of exercise. It was no good providing the most powerful guns and the most accurate shooting rifles unless those who were to use them were given sufficient practice to ensure their being able to manipulate them with skill and precision. In short, it was no use deceiving ourselves by thinking that the defence of this great Empire could be entrusted to an army numbering less than three-quarters of a million unless every man was an efficient soldier. Camps of exercise, ammunition,, ranges, and regimental institutes commodious enough to enable the class of men it was desired to attract to the ranks to spend their leisure hours in a rational manner, of course cost money, and it was for the country to decide whether the expense was worth incurring. In conclusion, Lord Roberts said the suggestions he had ventured to offer referred more directly to the regular troops, but in the matter of training they were equally applicable to the Reserve Forces whose efficiency we could not afford to neglect. With regard to the Navy, he could only say he trusted that the interest lately taken by the country in that splendid Service would never cease, and that we should never lose sight of the fact that our very existence depended on our being able to assert our supremacy at sea."

If so, is it not advisable that the Indian people should be enrolled as volunteers to enrich the British army with new loyal recruits.

### Ourselves

Our subscribers will, we hope, allow us the usual Holi holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these days there will be no paper issued on the 22nd. current.

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत थंडी विशेष होती आणि पुन्हां हिंवाळ्यांस प्रारंभ होत आहे असें वाटलें. ऊनही कडक असतें. पाण्याचा बोभाट पुष्कळ ठिकाणाहून ऐकूं येतो. साधारणपणें सार्वजनिक आरोग्य बरें आहे पण गोरगरीब उपासमाऱ्यामुळें थकत चालले आहेत.

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचा चालू सालचा समारंभ येत्या शुक्रवारीं व शनिवारीं होणार आहे. दोन दिवस सालाबादच्या पद्धती प्रमाणें खेळ, गायन, सभा व व्याख्यानें होतील. पहिले दिवशीं दोन प्रहरीं रा० रा० यशवंतराव देशपांडे व प्रल्हादराव जोग यांचीं व्याख्यानें होणार असून रात्रौ 'बाजी देशपांडे' हें नाटकही होईल. दुसरें दिवशीं संध्याकाळीं राजश्री गणपवराव खापर्डे यांचें व्याख्यान होईल.

या आठवड्यांत एक दोन फ्याक्टरींत आगीं लागल्या होत्या पण त्या लवकर विझविण्यांत आल्यामुळें मोठेंसें नुकसान झालें नाहीं. यदा पाण्याची टंचाई आहे तेव्हां सर्वांनीं मोठ्या हुशारीनें उन्हाळा घालविला पाहिजे

नळाचे पाणी बरोबर मिळत आणि नदीचें पाणी नीट बंदोबस्त नसल्यामुळें पिण्या लायक नाहीं. लोकांचे मोठे हाल आहेत!

वऱ्हाड प्रांतांत रेलवेच्या मार्गानें धान्य वं डाळी मिळून गेल्या फेब्रवारी महिन्यांत बाहेरून ३३४०० मण धान्य आलें व प्रांतांतून १९०० मण बाहेर गेलें.

सुटी— हुताशनीच्या सणा निमित्त मामूल वहिवाटी प्रमाणें तारीख २२ मार्चचा अंक निघणार नाहीं. आमचे वाचक ही सुटी आनंदानें मान्य करितील.

अलिकडे चोऱ्या दरवडे फार पडूं लागले आहेत. येत्या ७ वे तारखसे नांदुरा पोलिस-स्टेशन सरकलमध्यें बडी गांवीं मोठा डाका पडला. खेड्यापाड्यांतून लोक उपाशी मरत आहेत काय होईल तें कळत नाहीं!

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर, जज्ज, स्मालकाज कोर्ट आकोला यांची बदली बडनेऱ्यास झाल्यामुळें त्यांच्या जागेचा चार्ज घेण्यासाठीं रा० रा० हरिहर काशिनाथ पाटील, क्लार्क आफ कोर्ट डिपुटी कमिशनर उमरावती यांस आक्टींग एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर नेमून आकोल्यास धाडत आहेत.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८४ रुपये |
| जवारी | ९५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,,( बनशी ) | १३५ रु० |
| चणे | १२० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ६॥। मण |
| सोनें | २६॥ तोळा |
| चांदी | ८४ |

### नोटीस

वेदमूर्ती रा. रा. जनंदभट वीन रामभट घाग राहणार अकोलें यांसः—

नोटीस देणार रामकृष्ण भट बीन सांभ भट राहणार उगवें तालुके व जिल्हे अकोलें याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझी बायको व माझा मुलगा हा तुमचे येथें मरण पावला तेव्हां माझे मुलाचे आंगावरील दागीने हे तुमचे येथें आहेत ते तुह्मी मजला अद्याप पर्यंत परत दिले नाहींत. मी आपल्यास मागितले असतां तुह्मी नाहीं ह्मणून सांगतां याजकरितां मजला नोटीस देणें भाग पडलें तर आतां खाली लिहिलेले यादीप्रमाणें सोन्या चांदीचे व कापड वगैरे

१ मुलाचे कानातील सोन्याच्या बाळ्या मोत्यासमेत नग २ अजमास सोनें मासे ३

२ मुलाचे पायातील तोडे चांदीचे वजन तोळे ३० नग २

३ बायकोच्या पायातील जोडवी चांदीची वजन तोळे १२ चे

४ नथ सोन्याची मोतीसमेत किंमत रुपये ७५ पाऊणशाची

५ पुतळ्या गळ्यांतील सोन्याच्या नग २

६ मुद्या सोन्याच्यां नग ३ तीन हातातील यात दोन मुद्या दोन दोन तोळ्याच्या व एक मुदी एक तोळ्याची, मिळून सोनें तोळें ५

७ पायातील चांदीचीं फुलें नग दोन वजन तोळें चार ४

कापड

८ पीतांबर नग २ दोन व चोळी सवळ्याची १ एक

एणेंप्रमाणें सदर्हू सर्व जिनसा व दुसरें तुह्मी आह्मी काशीस गेलों तेव्हां तुह्मी माझ्या नांवानें रुपये ७५ चा पुर्जा रा. रा. हरी नारायण काळे राहणार अकोलें याचें कर्ज काढलें व पुर्जा माझ्या नांवाचा केला आहे त्या पुर्जाचे रुपये पाऊणशें तुह्मी परभारें घेतलेत त्या रुपयाबद्दल माझे मागें तगादा आहे तर तुह्मी ते रुपये पाऊणशें ७५ देऊन माझ्या मागचा तगादा दूर करावा त रुपये मी कांहीं देवाल नाहीं. हें आपणास कळावे. आतां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी आह्मास आमचे मुलाचे व कुटुंबाचे आंगावरील वर लिहिलेले यादी प्रमाणें सर्व डागिने व कापड वगैरे देऊन निकाल करावा. असें केलें नाहीं तर रिती प्रमाणें आपणावर फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासह सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. कळावें, तारीख १३।३।९७.इसवी.

सही

रामकृष्ण विन सांभट राहणार

उगवें दस्तुर खुद्द.

### नमुना [ जी ]

नादारी मुकदमा नंबर ८ सन १८९७

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे आकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येतें कीं, जमनादास वा। चुनीलाल गुजराथी राहणार खामगांव हा नादारी आहे असा आज तारीख ६ माहे ३ सन १८९७ इसवी रोजी ठराव झाला आहे आणि तारीख १० माह ४ सन १८९७ हा दिवस नादारीचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जीचा निकाल करण्याकरितां नेमला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तकरार सांगणें असेल ते त्याबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केला पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्मा करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आट आण्याचे स्टांपावर अर्ज करून यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्याबद्दचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशीअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील कळावें तारीख ९।३।१८९७ इसवी.

| | रुपये |
|---|---|
| १ लक्ष्मणदास माहीदास मालक शेवाराम माहीदास राहणार खामगांव | १९५० |
| २. जसराज श्रीराम मारवाडी राहणार खामगांव | ८७०८२ |
| ३ मेघःश्याम मुऱ्हारी राहणार खामगांव | ३३५।।।– |
| ४ श्रीराम शाळीग्राम मारवाडी राहणार खामगांव | ४७१८१५८३ |
| ५ माहीदास इश्वरदास व० खेमचंद राहणार खामगांव | २२५ |
| ६ विठलदास वलभदास दुकान एवले | २८६॥ |
| ७ बापु बाळाजी साबनें राहणार खामगांव | १६६॥≈ |
| ८ विठोबा वल्लद एकोबा राहणार खामगांव | १०९ |
| ९ दुलीचंद ओंकारदास मालक शामलाल राहाणार खामगांव | ३६८१८६ |
| १० रुखबदास सर्वइराम राहणार खामगांव | २६०० |
| ११ नारायण सिताराम लाला खत्री खामगांव | ८०० |

एकून ७८४७८२८६

V. N. Dandekar
Judge
Bankruptcy Cour
Akola District

## वर्तमानसार.

नडियादेस कोणी पांच सहा बैरागी आले असून, तेथील भोळे लोक त्यांस पांचपांडव व सहांवा श्रीकृष्ण असें समजतात. व ते त्या सहांच्या नादीं भारी लागले आहेत. अविद्येच्या बाजारांत हे असे प्रकार आढळावयाचेच.

भयंकर अग्निप्रलय!—राजवाड्याची रक्षा! ह्मैसूर येथून आलेल्या तारेरूवन कळते कीं, तेथें गेल्या रविवारीं सकाळीं राजवाड्याला व त्याचे मधल्या चौकांत जो मोठा थोरला लग्नमंडप उभारला होता त्याला आग लागून तो सर्व भाग जळून खाक झाला! मोठ्या मुष्किलीनें राजवाड्यांतली माणसें व इतर मोलवान् सामानसुमान आणि जुनें सिंहासन मात्र बचावलें. आग विझविण्याला बंब किंवा पाण्याच्या गाड्यांचा वगैरे पुरवठा बंगलोराहून आणवी पर्यंत कोट्यावधि रु. चें नुकसान झालें. लग्नमंडपांत व राजवाड्यांत माणसें मात्र बचावलीं, बराच वेळ राजवाडा जळतच होता. एका बाईचे केस उदविणें चाललें असतांना ठिणगी उडून न कळत मंडप पेटला.

जहानगिर बादशहाचे कारकिर्दींत ह्मणजे १७ वे शतकांत आग्र्यास सध्यां चोहोंकडे पसरलेला सांथीचा ग्रंथिविसर्पज्वर फार वाढला होता व त्या वेळीं तेथील बहुत लोकांचा नाश झाला. ही सांथ सडलेल्या उंदरांपासूनच निघाली होती अशी त्या वेळीं सुद्धां लोकांस माहिती झाली, असा इतिहास सापडतो.

इ० स० १८!२ सालीं बडोदें व अमदाबाद येथें हल्लीं चालू असलेलीं ग्रंथिविसर्प ज्वराची साथ सुरू होती. व त्या रोगानें बडोद्यास ५००० आणि अमदाबादेस एक लाख माणूस मेलें. प्रतें नेण्यास बायका वाहक होत होत्या. सर्व प्रेतास जाळण्याला लांकडें मिळेनात तेव्हां कित्येक घरें पाडून त्या इमारती लांकडांनीं शवें दहन करण्यांत आली. असा अमदावादचा इतिहास सापडतो!

भवडावणी—आस्ट्रियाचे बादशाहाचा युवराज रूडॉल्फ ह्याणें आत्महत्या करून घेतली ही गोष्ट सुप्रसिद्ध असतां, थोडे दिवसां पासून अशी बातमी व्हिएन्ना राजधानींत प्रसिद्ध झाला आहे कीं कोणा एकानें आस्ट्रियाचे बादशाहाला एक पत्र पाठवून "अडीच लाख फ्रांकेन्स ( नाणीं ) तुह्मी मला द्याल तर मी युवराजाचा अपघातमृत्युचे संबंधानें असलेला सर्व गुप्त पत्रव्यवहार अप्रसिद्ध ठेवीन; नाहीं तर तो प्रसिद्ध करून युवराजाच्या अपघातमृत्यूला तुह्मी स्वतः कसकसे कारण आहांत तें आणि इतर अनेक गोष्टी बाहेर प्रसिद्ध करून सर्व जगांत तुमचा दुर्लौकिक करीन," असें कळविलें आहे. ह्या भवडावणीच्या पत्राप्रमाणें सदर बादशाहानें काय केलें तें अजून समजलें नाहीं.

सांथीचा प्रसार या प्रांतीं सर्वत्र झाल्यानें माहीची पंढरपूरची यात्रा जशी बंद झाली तशीच रायगडची शिवजयंतीचीही यात्रा बंद होऊन मेळे व सनातनधर्मपरिषद् ह्यांना सुद्धां आडकाठी येईल असा संभव आहे.

मुंबई येथील चंद्रबागेंतल्या बंगल्यास आग लागून तो बंगला जगदीश्वर प्रेस व नेटिव्ह इन्स्टिट्यूशनचें सामान सर्व जळून गेलें. नुकसानी एकंदर अजमासें चार लक्षांची झाली. या जंगी आगीचें कारण समजलें नाहीं. दी० बं०

सतिापूरचे डेप्यूटी कलेक्टर मि. सिद्धेश्वर नारायण यांच्यावर काम चालून ३ वर्ष सक्त मजूरीची कैद व ८००० रु० दंड झाल्या मुळें डे. साहेबांनीं ज्यूडीसियल कमिशनर साहेबाकडे अपील केलें आहे.

जगांत अत्यंत मौल्यवान तरवार ह्मटली ह्मणजे श्री. गायकवाड सरकाराजवळ आहे तिच्या म्यानेला व मुठीला हिरे आणि पांचा. लाविल्या असून तिची किंमत दोन लक्ष वीस हजार पौंड आहे. इराणच्या शहाजवळ एक दहा हजार पौंड किंमतीची तरवार आहे इंग्लंडातील अति मौल्यवान तरवार ह्मटली ह्मणजे इजिप्शिअन लोकांनीं लॉर्ड बुईल्ले याला नजर केलेली. तिचा किंमत दोन हजार पौंड आहे.

पंजाब प्रांताचे लेफ्टनेंट गव्हरनर सर डेनिस फिट्झपॅट्रिक हे नुकतेंच नोकरी सोडून स्वदेशीं गेले. जातां जातां त्यांनीं एक अत्यंत स्तुत्य व सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांस अनुकरणीय असें कृत्य केलें आहे पंजाब प्रांतातील सर्व वृत्तपत्रकर्त्यांस सरकारी कागदपत्र गुप्त नसतील ते पहावयास मिळावे ह्मणून त्यांनीं एक 'पॉलिटिकल लायब्ररी' स्थापन केली आहे व त्या ठिकाणीं सर्व सरकारी कागद ठेवण्यांत येणार आहेत. इतर ठिकाणचे अधिकारी यांचें अनुकरण करतील काय? न्या० सु०

क्रीटच्या रेटिमो व क्यांडियाच्या सरहद्दीजवळ शुक्रवार व शनिवार अशी दोन दिवस टर्की व ग्रीसच्या लष्करांत मोठी मारामारी झाली. क्रीटच्या गव्हरनरानें मुसलमान लोकांस शस्त्रें पुरविलीं होतीं कनेडियास मुसलमान लोकांनीं व रेटिमो येथें ख्रिश्चियन लोकांनीं प्रथम लढाईस सुरुवात केली होती या झटापटींत दोन्ही पक्षाचे मिळून पुष्कळ लोक मरण पावले होते.

टर्कीच्या ताब्यांतील क्रीट बेटावर ग्रीसेनें सैन्य पाठविलें ह्मणून रशियन सरकारनें ग्रीसला अशी सूचना पाठविली आहे कीं तीन दिवसांच्या आंत आपलें सैन्य क्रीटमधून परत न्या; असें न झाल्यास आह्माला सक्त उपाय योजावे लागतील, अशा गप्पा लंडन शहरांत चालल्या आहेत.

लंडनहून आलेल्या तारेवरून समजतें कीं, रशिया किंवा दुसऱ्या कोणत्याही बड्या राष्ट्रानें ग्रीसला अद्याप कोणत्याही प्रकारचा सक्तीचा निरोप पाठविला नाहीं. जर्मनी, रशिया आणि आस्त्रिया ह्यांचें असें ठरतें आहे कीं, ग्रीसनें जर क्रीट बेटांतून आपलें सैन्य काढून घेतलें नाहीं तर त्यांच्याबद्दल सक्त उपाय योजावे. ग्रीसच्या बंदरांना वेढाही घालण्यांत यावा, अशा मतलबाचा निरोप ग्रीस सरकाराकडे पाठवावा. दुसऱ्या कित्येक राष्ट्रांचा असा विचार आहे कीं ग्रीसला असा कडक निरोप न पाठवितां मृदु भाषणें सांगितलीं असतांहीं तो ऐकण्यासारखा आहे. ह्मणून त्याला असा कडक निरोप पाठवूं नये. अद्याप कशा प्रकारचा निरोप पाठवावा हें नक्कीं ठरलें नाहीं,

यूरोपांतील बड्या राष्ट्रांकडून टर्कीच्या सुलतानाकडे व ग्रीस सरकारांकडे एकाच अर्थाचा खलिता गेला आहे ह्यांत क्रीटचे स्वातंत्र्य कबूल केलें असून तें टर्कीच्या ताब्यांत राहील असें ठरविलें आहे. सात दिवसांच्या आंत क्रीटबेटांतून आपलें सैन्य ग्रीसनें काढून घ्यावें असाही मजकूर त्यांत आहे.

गेल्या मंगळवारीं लार्ड लोकांच्या सभेंत एका प्रश्नाला उत्तर देतानां लार्ड सालिसबरी ह्मणाले कीं टर्कीनें क्रीटबेटांतून आपलें सैन्य काढून घ्यावें हें जें इंग्लंडचें ह्मणणें आहे, ह्याला यूरोपांतील बड्या राष्ट्रांचें अनुमोदन नाहीं.

परराष्ट्र खात्याचे प्रधान मि० करझन् ह्यांनीं एका प्रश्नाला उत्तर देतानां असें ह्मटलें कीं, युरोपांतील बड्या राष्ट्रांचें हल्लीं जें धोरण आहे त्यावरून क्रीट बेट ग्रीसेच्या राज्यांत जोडलें जाईल असें वाटत नाहीं.

क्रीटबेटांतील मुख्य बंदर केनया येथें तुर्क सरकारची जी फौज होती तिनें बंड करून आपल्या अंमलदाराला ठार मारिलें परराष्ट्रांतील आरमारांतील लोकांनीं त्यांच्यावर तोफा सोडल्यावर ते शरण आले.

केनडीया प्रांतांत बंडखोरांनीं कनडा गांव व त्यांच्या जवळचा किल्ला हस्तगत करून घेतला. तीन हजार लोकांना त्यांनीं कैद केलें आहे. ह्यांत तीनशे तर तुर्क लष्करी शिपाई आहेत.

आथेन्स येथें लढाईच्या संबंधानें अतिशय चळवळ सुरू झाली आहे.

ह्याचदिवशीं सायंकाळीं आथेन्सच्या राजमहालांतील अंगणाजवळ पुष्कळ लोक जमा होऊन 'लढाई करा, लढाई करा' असा त्यांनीं कल्लोळ केला.

क्राऊनप्रीन्स यांनीं सज्ज्यांतून राजातर्फे त्यांच्या आवेशकारक वर्तनाबद्दल शाबासकी देऊन शांत होण्या विषयीं सूचविलें.

ग्रीसमध्यें या लढाईसाठीं नवीन सेनापति नेमण्यांत आला आहे व त्यांनीं लष्करांतील सर्व अमलदारांस जागृत रहाण्याबद्दलचें सर्क्युलर काढल्याचें समजतें. युद्धाच्या ठिकाणीं विशेष तोफा पाठविण्याची तयारी फार ज्यारीनें चालू आहे.

सर्व युरोपीयन राष्ट्रांचें ह्मणणें ग्रीसला बिलकूल अनुकूळ पडणार नाहीं असें दिसतें.

हाऊस आफ कामन्सच्या सरचार्ल्स डिल्के हर्बर्ट वगैरे १०० सभासदांकडून ग्रीसच्या राजास, क्रीटमध्यें सुधारणा करण्याकरितां सैन्य पाठविण्यासंबंधीं लंडनहून तार गेली आहे.

कलकत्यास जो दुष्काळ फंड उभारला आहे त्यांत ९०००००० लक्षावर रक्कम भरली गेली आहे.

कराचीस २४ तासांत मरकीनें ३८ मनुष्यें लागलीं व २९ मरण पावलीं.

इंग्लंडच्या आरमारावरील मुख्य मि० गोस यांनीं दरखास्त केल्या प्रमाणें येत्या सालीं त्या आरमारांत १४ जहाज, ४ मनावर व ६००० मनुष्यें अधीक वाढविण्यांत येणार आहे.

हिंदुस्थानांतिल दुष्काळ पीडित लोकांस मदत करण्याकरितां विलायतेस जो फंड उभारला आहे. त्यांत गेल्या सोमवारपर्यंत ३,९००० पौंड ह्मणजे ५९०४०००० रुपये भरले गेले आहेत.

हिंदुस्थानच्या जमाखर्चाच्या तपासणीकरितां नेमलेल्या बादशाही कमिशनपुढें हिंदुस्थानचे माजी सेनापती लार्ड राबर्टस यांची जबानी झाली. त्यानें आपल्या जबानींत सांगितलें कीं, व्हाईसरायाच्या कौन्सलात लष्करी लोकांचें बळ असावें तसें नाहीं. व इंग्लंडच्या संरक्षणाकरितां जेव्हां जेव्हां हिंदुस्थान सरकारा जवळ मदत मागण्याचा प्रसंग येईल तेव्हां तेव्हां त्याचा खर्च इंग्लंडनें आपल्या तिजोरीतून दिला पाहिजे. त्यांनीं विशेष असें सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील लष्कर चांगलें तरतरीत आहे, पण त्यांत इंग्लिश आफिसरांचा भरणा करण्याची जरूर आहे.

हिंदुस्थानांतील दुष्काळ फंडास मदत जो तो आपापल्या शक्ती व इच्छेप्रमाणें करीत आहे अशा प्रसंगीं लंडन येथील इस्टर्वीनें हाटेल मधील सुस्वरूप ('बारमेड') एका कामकरी मडमेनें असें जाहीर केलें आहे कीं कोणी एक शिलिंग दिला असतां ती एक मुका देण्यास तयार आहे, व अशा मुक्यांची जी रकम एकत्र होईल ती दुष्काळफंडास मदत द्यावयाची. ही स्त्री चांगली देखणी आहे व तिनें वरील जाहीरात प्रसिद्ध केल्यापासून १९ गुलजारांनीं तिचे मुके घेऊन तिला एकेक शिलींग दिला व त्या उदार बाईनें ते सर्व शिलिंग दुष्काळफंडास दिले. स. वि.

निजाम सरकारचे राज्यांत ह्या सांथीनें प्रवेश केला नाहीं असें दिसतें. वाडि स्टेशनावर मुंबईहून गेलेला एक उतारू मेल्यामुळें त्या सरकारानें उतारूं करितां फारच कडक नियम केल्याचे समजतें

दुष्काळी कामवरील लोकांस पोटभर अन्न मिळत नसून कामाची सक्ति होते यांजबद्दल अधिकाऱ्यांनीं विचार करावयास पाहिजे.

सस्पिंड—सारा माफ करा अशी विनंती करण्यासाठीं खानदेशांतील कांहीं पाटील इतर गांवकऱ्यांबरोबर कलेक्टराकडे आले होते, ह्मणून त्यांस सस्पिंड करण्यांत आले आहे.

गेल्या पांचव्या तारखेस ह्मसूर प्रांतांत काकन कोट नांवाच्या भागांत ६० हत्तींचा एक कळप धरण्यांत आला. न्या० सिं०

सर डेव्हिट फिझ्पॅट्रिक पंजाबचे लेफ० गव्हर्नर यांची नेमणूक स्टेट सेक्रेटरीचे कौन्सलांत झाली.

तिजोरी लुटली—ह्मैसूर सरकारची तीर्थहळ्ळी येथील तालुका तिजोरी गेल्या शनिवारीं दोनशें हत्यारबंद बदमाश लोकांनीं भर दोन प्रहरीं लुटून १९ हजार रुपये नेल्याची खबर आली आहे. स० शो०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास................... ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........ ८१ ८६
दुसरे खेपेस ............ ८१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ...... ... ....„ 8 as
Single copy ................. ......... as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI | AKOLA MONDAY 29 MARCH 1897 | NO 12

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख २९ माहे मार्च सन १८९७ इ० | अंक १२

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवाअधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken
Agent

## नोटीस

नोटीस गोविंद रामचंद्र कुळकर्णी मौजे पिंपळगांव तालुके जळगांव जिल्हे अकोले यास मी खाली सही करणार अशी नोटीस देतो कीं तुह्मास मी माझे दुकानावर नौकर ठेविले होतें व कुलमुकत्यार पत्र देऊन नोकरी सुरू केली होती त्यास आता तुह्मास आह्मी दोन महिन्या पासून नौकरी वरून दूर केले आहे त्यास तुह्मी या दोन महिन्यांत माझे तर्फे कोठें सही करून देऊन पैसा वगैरे घेतला असेल तर त्याचा जबाबदार मी नसोन तुह्मी अहा व तो पैसा मजला कबूल नाहीं व माझे तर्फे कोर्टांत वगैरे सही केली असेल तेही या दोन महिन्यांतील मजला कबूल नाहीं या नोटीसिनें तुमचे मुकत्यारपत्र रद्द केलें आहे नोटीस तुह्मास दिल्ही सही तारीख १९।३।९७ इसवी.

सही
सिवरतन प्रतापचंद मारवाडी
दस्तूर खुद राहणार
पिंपळगांव

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य १२ शके १८१८

[ये]ण्या ७ वे तारखेस येथील लायब्ररीची जनरल सभा भरली होती त्यावेळीं वार्षिक हकीकतीचा रिपोर्ट मंजूर करण्यांत आला. लायब्ररीची अभिरुची लोकास कितपत आहे या संबंधानें रा. रा. केशव गोविंद दामले बी. ए. एल. एल. बी सेक्रेटरी यांनीं मोठ्या मार्मिकतेनें रिपोर्टांत उल्लेख केला आहे. ते ह्मणतात कीं:—

"( २० ) वाचण्यास नेलेलीं पुस्तकें:— एप्रिल पासून तो दिसेंबर अखेर ९ महिन्यांत एकंदर १४५४ पुस्तकें वाचण्यास गेलीं. वरील ६ वें कोष्टकांत दर्शविलेंच आहे कीं एकंदर वाचकांची संख्या ८८ आहे त्या मानानें इसमवार पुस्तकांची संख्या १६.०९ येते. हीं पुस्तकें नऊ महिन्यांत नेलीं असल्या कारणानें दरमहा इसमवार १.०८ पुस्तकांची संख्या येते. १४५४ पुस्तकें नऊ महिन्यांत वाचण्यास गेल्या मुळें दररोज लायब्ररींत सरासरीनें ६ पुस्तकें वाचण्यास जातात व ज्या अर्थीं चवथ्या वर्गाचेच वर्गणीदार पुस्तकें फार वाचण्यास नेतात त्या अर्थीं रोज पुस्तकें नेणारांची संख्या सरासरीनें ४ किंवा पांच असेत. त्या मानानें पाहतां १० इसमांस १ एक इसम रोज पुस्तकें वाचण्यास नेतो असें होतें. वर्तमानपत्रें वाचण्यास रोज ५० पासून ७५ पर्यंत इसम असतात तेव्हां उघड आहे कीं वर्तमान पत्रें वाचण्याकडे मंडळीचा कल फार आहे. १५० इसमांत फक्त ८८ जणांनींच पुस्तकें वाचण्यास नेलेलीं आढळतात. तेव्हां ६२ इसमांस लायब्ररींतील १०५८ पुस्तका पैकी एकही पुस्तक वाचण्यास नेण्याची इच्छा झाली नाहीं. पुस्तकें वाचण्यास नेणारे गृहस्थ पहिल्या वर्गांत फक्त २ च आहेत. दुसरे वर्गांत १२ आहेत, तिसरे वर्गांत २ व चवथे वर्गांत ७२ आहेत.

वस्तुतः पहिले व दुसरे वर्गांतील गृहस्थाकडे पुस्तकें ज्यास्त वाचण्यास पाहिजेत कारण ज्यास्त शिकलेले व मोठे लोक या वर्गांतच आहेत. परंतु वर्तमानपत्रांतील बातम्या वाचण्या पलीकडे त्यांस यांत महत्व वाटत नाहीं अगर गोडी लागत नाहीं. यांत कोणत्या प्रकारचीं पुस्तकें प्रायः वाचण्यास जातात हें पाहिलें ह्मणजे तर मनाची स्थिती फारच असमाधानकारक होते. ६ व्या कोष्टकावरून सहज लक्ष्यांत येईल कीं, जीं पुस्तकें फार वेळा वाचण्यास गेलीं आहेत तीं लोकप्रिय आहेत. इंग्रजी पुस्तकें बहुत करून फार वेळा वाचण्यास जात नाहींत. तीन किंवा चार वेळा वाचण्यास गेलीं अशीं फक्त ११-१२ च इंग्रजी पुस्तकें आहेत. कांहीं मराठी पुस्तकें तर फारच वेळां गेलेलीं आहेत. या फार वेळा वाचण्यास गेलेल्या पुस्तकांचीं नांवें व त्यांतील आशय पाहतां तात्काळ आढळून येईल कीं, कल्पित कादंबऱ्या, विषयप्रधान नाटकें व मनोरंजक गोष्टी वाचण्याची लोकांना विशेष आवड आहे. आधींच मराठींत शास्त्रीय, नैतिक व ऐतिहासिक पुस्तकांचा भरणा फार अल्प आहे. ज्यास्त ज्ञान ह्मणून खरेखर मानतात तें सर्व इंग्रजी भाषेंतच आहे. व इंग्रजी पुस्तकें वाचण्याची गोडी लोकांस नाहीं. तेव्हां अर्थांत या लायब्ररी पासून खरी ज्ञानवृद्धि अद्याप झाली नाहीं. असाच प्रकार चालू राहिल्यास ज्ञानप्राप्ति अगर ज्ञानप्रसार होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. लायब्ररीचे नियम करितांना लायब्ररीचे ४ चार उद्देश वर्णिले आहेत (१) "ज्ञानाचा प्रसार करणें" (२) "दळणवळण वाढविणें" (३) "शिक्षण वाढविणें" (४) करमणूक करणें" हे होत आज मित्तीस लायब्ररीच्या उपयोगाची वर सांगितलेली जी माहिती आपणास अवगत आहे त्या वरून स्पष्ट दिसेल कीं सांप्रत या संस्थे पासून ज्ञानप्रसार होत नाहीं करितां लायब्ररीचा मुख्य उद्देश तर अद्याप सफळ होत नाहीं. दळणवळण वाढण्यास एका स्थळीं वाचण्यास येण्यापलीकडे दूसरें साधन लायब्ररींत असल्याचें आढळत नाहीं. इतक्याच गोष्टी वरून दळणवळण कितपत वाढेल याची शंका आहे. अंशतः तरी दळणवळण वाढण्याचा संभव आहे हे खरें.

परंतु हें दळण वळण अति बेताबाताचेंच असणार व इतक्या दळण वळणानें फायदा ह्मणण्या सारखा कांहीं नाहीं. करितां हा उद्देश सिद्धीस जात नाहीं. तिसऱ्या उद्देशा संबंधानें ज्या अर्थीं ज्ञानप्राप्तीचाच अभाव आहे त्या अर्थीं शिक्षण या शद्बास सार्थकता येत नाहीं. हल्लीं ज्या प्रकारचें ज्ञान लोकांत वाचन मार्गानें पसरत आहे तेंच वाढविण्याची व त्याचेंच शिक्षण देण्याची इच्छा असल्यास मग गोष्ट निराळी.

" खरें ज्ञान व खरें शिक्षण " मिळण्यास व वाढविण्यास स्थित्यंतर झालें पाहिजे. चवथा उद्देश " करमणूक ". हा उद्देश सर्व थैव सफळ होत आहे. या वरून हें उघड आहे कीं, आज लायब्ररीची योग्यता येथील लोकांत करमणुकीचे स्थानापलीकडे नाहीं. अशा संस्थेचा उपयोग इतके निकृष्ट प्रकारचा असावा हें बरोबर नाहीं. उभ्या वर्षांत येथें काय तीं पांच व्याख्यानें झालीं. त्यांतून ३ तीन तर प्रसंगवशात् कारणानिमित्त येथें आलेल्या गृहस्थांनीं आपण होऊन दिलेलीं होतीं. तीं खेरीज करून बाकीची दोनच काय तीं येथील गृहस्थांनीं दिली. त्या दोहोंतही एका व्याख्यानास श्रोतृसमूह ५०-४० पर्यंत असून दुसऱ्यास १०-१५ होता. या बाबतींत लोकांची फार उदासीनता आहे. एकंदर १७ गृहस्थास व्याख्यानें देण्याविषयीं अनेक वेळा विनंती केली. पैकी एका गृहस्थानें विनंतीस मान देऊन व्याख्यान दिलें. ही स्थिति बदलणें अवश्य आहे व ही स्थिति सुधारण्यास झटलें पाहिजे. तरी सुधारणा कशी कोणत्या मार्गानें करावी व ती कितपत साध्य आहे नगर होईल याबद्दल विचार करणें व अखेर ठरेल त्या प्रमाणें गोष्टी अमलांत आणणें हें फार महत्वाचें काम आहे तरी या गोष्टीचा पूर्ण विचार येथील मंडळी करतील अशी आशा आहे."

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर हे आज सहा वर्षे आकोल्यास होते. त्यांची बदली बडनेरा कोर्टावर झाल्यामुळें आकोल्याच्या किंबहुना आकोला जिल्ह्याच्या लोकांस फार वाईट वाटलें. ६।७ वर्षांच्या सहवासानें ते फार लोकप्रिय झाले होते त्यामुळें त्यांची बदली कोणास सुखावह वाटली नाहीं. राजश्री तात्या साहेबा सारखे भले थोर गृहस्थ बदलीच्या जागीं जात होते ह्मणून त्यांच्या सन्मानार्थ येथें पानसुपाऱ्यांची व मेजवान्यांची गर्दी उडाली होती. असें उत्कट प्रेमदर्शन विरळा घडतें आणि तें ज्या गृहस्था संबंधानें झालें त्या गृहस्थाचे सद्गुण मंडळी त्यांच्या पश्चात् सोल्लासानें व विरहोद्वेगानें आठवीत असतात. येथील व्यापारी मंडळीनें राजश्री तात्या साहेब यांस नेटिव जिनिंगच्या कचेरींत पानसुपारी दिली तेव्हां कित्येकांनीं साहेब बहादूरांची थोरवी प्रेमळ पण मुग्ध भाषेंत गाईली. येथील लायब्ररीच्या समारंभाच्या वेळीं रावसाहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन डायरेक्टर हे बोलले कीं राजश्री तात्या साहेब जवळ जवळ १८ वर्षे वऱ्हाडांत सरकारी नोकरीच्या संबंधानें आहेत बहुतेक सर्व प्रांतभर यांनीं काम केलें आहे. स्नेहसंबंधानें लोकांना आपलेंसें करून ते सर्वांस प्रिय आहेत. सार्वजनिक कामांत व मुख्यत्वें करून क्लबाच्या कामांत त्यांच्या बदलीमुळें आमचा पायच मोडल्या सारखा वाटतो. सरकारी नोकरीचा पेषा आहे तेव्हां सरकारच्या सवडी प्रमाणें आनंदानें वागलेंच पाहिजे. तथापि जवळच्या ठिकाणीं बदली असल्यामुळें त्यांच्या भेटीचा लाभ वारंवार होईल. आपणास जें वियोगदुःख होतें तेंच त्यांच्या मित्रत्वाची व सुस्वभावाची साक्ष देत आहे. त्या नंतर रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत हे बोलले कीं सिव्हिल जज्जाच्या कोर्टाची स्थापना झाल्या नंतर आकोल्याच्या कोर्टावर पहिले जज्ज आबर्ड साहेब होते. पुढें मे. यातीनखा, डेव्हीस, इत्यादि नंतर दांडेकर हे जज्ज होऊन गेले आणि हल्लीं शेख इस्माल साहेब आहेत. सिव्हील जज्जचें कोर्ट ह्मणजे अव्वल दिवाणीचें उच्च प्रतीचें वरिष्ठ कोर्ट होय. आज पर्यंतचे सर्वच जज्ज चांगले होऊन गेले. अत्यंत प्रामाणिकपणा हा गुण मोठा दुर्मिळ आहे. हा गुण आवश्यक व साहजिकसा वाटतो पण एव-

हे मोठाले अधिकार असून प्रामाणिकपणा ठेवणें ह्मणजे केवढी मोठी गोष्ट आहे याचा अर्थ पक्षेपणीं वाहिवाटींतल्या लेकांस ठाऊक आहे. हा दुर्मिळ गुण राजश्री दांडेकर यांच्या मध्यें असून ते फार सहनशील आहेत. त्यांस उद्देशून मि. अजिजुद्दीन ह्मणत असत कीं, यांच्या सारखा माझा गोड स्वभाव असता तर मी फार उच्च पदवीला चढलों असतों. पक्षकारांच्या गोष्टी पूर्णपणें व अखेर निकालापावेतों ऐकून घेण्याचा यांस कंटाळा नाहीं. हाच गुण मे. ऑबर्ड साहेबामध्यें विशेष दिसतो. हे आपल्या मधील पुढारी आहेत आणि यांचें खानगी वर्तन पायाशुद्ध आहे. जातीधर्माची नड नसूनही यांस तंबाखू, विडी किंवा सुपारीचें खांड याचें देखील व्यसन नाहीं. चवथा गुण यांच्या आंगचा मनमिळाऊपणा होय. श्रीमंत असो आणि गरीब असो, कोणाला शंका वाटत नसे, जो तो आपलें हृद्‍गत मोकळेपणानें यांच्यापाशीं सांगत असे. बापाच्या वळणावर मुलें जातात हा नियम यांच्या चेहऱ्यास किंवा बाह्यांगासच लागू नाहीं तर यांच्या अंगीं वडील राव बहादूर नारायण भाईसाहेब यांचे सद्‍गुणही पूर्णपणें वसत आहेत. या घराण्यांतले दोन थोर पुरुष या प्रांतास चांगले लाभले तसेंच आणखी कांहीं पुरुष या घराण्यांतून आह्मास मिळोत हीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. मित्रसमाजाची आदितवार रात्रीं मेजवानी झाली तेव्हां रा. रा. नारायण काशिनाथ दांते हे इंग्रजींत बोलले कीं, राजश्री तात्या साहेब यांनीं आपल्या मनमिळाऊपणानें व भारदस्तपणानें मित्र समाजाला सध्यांचें अभिनंदनीय स्वरूप आणून दिलें. त्यांच्याच वडिलांच्या वेळीं क्लबाची स्थापना झाली आणि ती आपल्या वाडिलांची कृति राजश्री तात्यासाहेब यांनीं अगदीं पूर्णतेस पोंचवून ही संस्था चिरस्थायी केली. राजश्री दांडेकर यांनीं मंडळीचे आभार मानतांना कळविलें कीं कांहीं वर्षांपूर्वी या क्लबाला राजद्रोही सभा असे एक जुने युरोपियन डिपुटि कमिशनर ह्मणत असत. हा भयंकर आरोप आतां टळला आहे आणि तेव्हापासून सर्व भले डिपुटि कमिशनर या क्लबाचे सभासद होत गेले.

एकंदर, पानसुपारी सारख्या संपदा गुणलुब्ध असतात आणि त्या संपदांनीं आपली विजयमाला राजश्री तात्यासाहेब दांडेकर यांच्या गळ्यांत अर्पण केली ही गोष्ट संतोषाची असून इतरत्र मनन करण्यासारखी व कित्ता घेण्यासारखी आहे.

---

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचा ११ वा वार्षिक समारंभ यंदा उमरावतीस भरला होता. अंदाज ३०० सभासद या वार्षिक मेळ्या निमित्त जमले होते. तारीख १९ व २० मार्च या दोन दिवशीं हा समारंभ होता. पहिले दिवशीं रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी बी. ए. एल. एल. बी. यांनीं स्वागत मंडळीचे तर्फे सर्व एकत्र जमलेल्या सभासदांचें स्वागत केलें. मंडळीचें अभिनंदन करितांना ते ह्मणाले कीं लांबवरचे गृहस्थ आपला अमोल वेळ व पैसा खर्चून येथवर आले आणि पुष्कळ मंडळी या समाजा विषयीं आपली इतकी काळजी दर्शवितात या वरून हें पक्कें वाटतें कीं हा समाज जसा ८।१० वर्षें चालला आहे तसाच पुढेंही चांगला चालेल. मनुष्यस्वभावाचीं जीं चार पांच अंगें आहेत त्या पैकीं सामाजिक अंग या समाजामध्यें प्राधान्य आहे. आपण परस्परामध्यें स्नेहभाव व प्रेम दोन दिवस वाढवितो हें कांहीं थोडें नाहीं. राष्ट्रीय सभेमध्यें सामाजिक व औद्योगिक विषय निघत नाहींत ह्मणून जसा कित्येकांचा आक्षेप असतो त्याच प्रमाणें या समाजांत कांहीं अन्य उपयुक्त विषय निघत नाहींत ह्मणून कित्येकांचा आक्षेप आहे पण तो चुकीचा आहे. आपल्या समाजाची परिव्याप्ती मोठी नसून नियमित आहे स्वागत करण्या विषयी आमच्या मनाची इच्छा व आर्तता या मध्यें कांहीं कमीपणा नाहीं तथापि कारवाई मध्यें जर उणेपणा दिसला तर तो न मानतां आपण सर्व गोड करून घ्याल अशी आह्मास उमेद आहे. नंतर रा. रा. नारायण गोविंद केतकर यांनीं सूचना आणिली व सर्वांनीं तिला अनुमोदन दिल्यावरून रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल. एल. बी. यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें. समाजाच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा पूर्व वृतांत अध्यक्षांनीं सांगितला. अशा समाजा पासून होणारी स्नेहवृद्धी, दळणवळण, इत्यादि नानाविध फायदे सांगून त्यांनीं चिरस्थायीपणा विषयी आपली बळकट आशा दर्शविली. रा. रा. लक्ष्मणराव महाजन व मि. एदलजी बहिमनजी दस्तूर या उभय गृहस्थांच्या मृत्यू संबंधानें खेद प्रदर्शित करण्यांत आला. रा. रा. केशवराव दामले यांनीं गतवर्षाचा रिपोर्ट लिहिला होता तो पसार करण्यांत आला.

दोन दिवस सर्व सभासदांचा वेळ कसा मौजेंत गेला हें कळलें देखील नाहीं. हुताशनीचा सण कशा उत्तम प्रकारच्या करमणुकेंत घालवावा ही गोष्ट या समाजा पासून सर्व हिंदुस्थान देशानें कित्ता घेण्यासारखी आहे. दोन दिवसांची व्यवस्था उमरावतीच्या मंडळीनें मोठि नामी ठेविली होती. कांहीं कांहीं गोष्टींत पाहिल्या दिवसापेक्षां दुसऱ्या दिवशीं मोठि वर्णनीय टापटीप ठेविली होती. एवढा मोठा ३५० गृहस्थांचा समूह होता तरी त्यांची सर्व संधानें इतकीं संभाळून ठेविलीं होतीं कीं मंडळीस करमणुकीच्या नानाविध तऱ्हामुळें कशी ती फुरसत ठाऊक नव्हती. मेजवानीचे बेत चांगले होते. लान टेनिस, क्रिकेट वगैरे खेळ चालूच होते. गप्पा, गायन, वादविवाद इत्यादिमध्यें सर्वेजण दंग होते. समाजाच्या कांहीं उमरावतीकर सभासदांनीं ‘ बाजी देशपांडे ’ या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. नाटक नामी झालें. या नाटकाच्या तयारीला प्रयास फार लागतात तथापि त्यास न जुमानतां मोठ्या प्रयासानें सर्व जुळवाजुळव व योजना उत्कृष्ठ झाली होती. रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या तालमींत नाटक तयार झालें होतें. पैशाच्या अडचणीमुळें नाटकाला टिकिटें लाविलीं होतीं आणि ही व्यवस्था पहिलीच व निरुपायाची असल्यामुळें बंदोबस्त नीटसा राहिला नाहीं तरी मंडळीनें परिणाम गोड करून सोडला. या समाजांत कित्येक गृहस्थ व्याख्यान देण्याविषयीं उत्सुक होते पण वेळेच्या अडचणीमुळें पुष्कळ गोष्टींस संक्षेप देण्यांत आला. रा. रा. यशवंत गोविंद देशपांडे अंजनसिंगीकर बी. ए. यांनीं हिंदुधर्माच्या पूर्व व प्रस्तुत स्वरूपा विषयीं योग्य विवेचन इंग्रजींत केलें. फर्ग्युसन कालेजचे प्रोफेसर धोंडो केशव कर्वे यांनीं ‘ परोपकार किंवा आत्मयज्ञ ’ करण्याचा मनोनिग्रह व दृढसंकल्प करावा अशा विषयीं थोडासा उपदेश केला. अखेरच्या दिवशीं रा. रा. गोपाळ वामन बापट यांनीं समाजाचें विसर्जन केलें त्यावेळीं त्यांनीं दोन दिवसांची हकीकत सांगून, कांहीं ठळक ठळक चुका दाखवून आणि नंतर परस्परावर प्रेम व लोभ ठेवण्या विषयीं मोठ्या आसक्तीनें कळवून सर्व मंडळीस निरोप दिला. स्वभावतः राजश्री गोपाळराव गोड स्वभावाचे असल्यामुळें त्यांनीं दोन दिवसांचीं कामें मोठ्या कुशलतेनें सिद्धीस नेलीं. यंदा वर्गणी पुष्कळ जमली होती आणि नाटकाचें उत्पन्न ही २७१ रुपये झाल्यामुळें मागील नाटकांचा खर्च सर्व निघून आला. यंदा समाजाकडून दुष्काळानें पीडलेल्या गोरगरीबांस खिचडी वगैरे वाटण्यांत आली हें धर्मकृत्य फार नामी झालें. पुढील वर्षाकरितां समाजाच्या खालील अधिकाऱ्यांची नेमणुका करण्यांत आल्या आहेतः---

| | |
|---|---|
| रा० रा० | हुद्दा |
| केशव गोविंद दामले बी. ए. एल. एल. बी. | जनरल सेक्रेटरी. |
| बळीराम मेघश्याम पिंपळे | जाईंट सेक्रेटरी |
| बाळकृष्ण मोरेश्वर साठे. रामचंद्र विष्णु महाजनी बी. ए. | १२ व्या समाजाचे सेक्रेटरी. |

---

गेल्या १८वे तारखेस मि. बुलक कमिशनर साहेब यांच्या अध्यक्षेत खालीं आकोला जिल्ह्यांतील प्रमुख गृहस्थांची दुष्काळा निमित्त सभा भरली होती. सभेला व्यापारी, वकील, अधिकारि वगैरे निरनिराळ्या धंद्याचे लोक जमले होते. खामगांव व तेल्हारा या भागाकडील पुष्कळजण आले होते. आकोटकडील मंडळी बरीच होती. उमरावतीस जी दुष्काळ निवारणार्थ प्रांतिक मुख्य कमिटी नेमिली आहे तिच्या खालीं या जिल्ह्याची पोट कमिटि या सभत नेमण्यांत आली. प्रारंभीं मे. कमिशनर साहेबांनीं इंग्रजींत कळविलें कीं मेळघाटाच्या भागांत व आकोलें जिल्ह्यांत दुष्काळाची व्याप्ती मोठी आहे. सरकार आपल्या प्रजेचे प्राण रक्षण करण्याविषयीं तत्पर व जबाबदार आहे आणि सरकार दुष्काळ निमित्त रिलीफ कामें व अनाथगृहें जरूरीच्या मानानें काढीत आहेत परंतु सरकारी व्यवस्थेंत ज्यांस मदत मिळणार नाहीं असा प्रजावर्गही मोठा आहे; त्यांच्या निमित्तानें व सरकारच्या व्यवस्थेला मदतनीस अशी दुसरी खासगी व्यवस्था धर्मादायफंड उभारून करण्यांत येणार आहे. विलायतेंत ७० लक्ष रुपयावर हा फंड उभारण्यांत आला आहे. या फंडांतून वऱ्हाडप्रांताला ४२ हजार रुपये मिळावे ह्मणून कमिशनर साहेबाकडून कलकत्याच्या मुख्य सभेला लिहून गेलें आहे. आकोला जिल्ह्यांत दुष्काळाचें पाऊल फार पुढें आहे ह्मणून तेल्हारा अडसूळ रस्ता, शहानूर नदीचें पात्र फिरविण्याचें काम, एरंडाचा तलाव, खामगांवच्या जनुना तलावाची दुरुस्ती इत्यादि कामें सरकारातून या जिल्ह्यांतच काढण्यांत आलीं आहेत आणि कारंजा व दारव्हा यांच्या दरम्यान नवीन २२ वीस मैल सडकेचें काम सुरूं होत आहे. या कामा निमित्त १ लक्ष १० हजार रुपये खर्च होणार आहेत. सरकार सर्व तऱ्हेनें काळजी घेत आहे तथापि खासगी धर्मादाय फंडाची जरूरि सरकारी मदत न पोचणाऱ्या लोकांस मोठी आहे ह्मणून श्रीमान लोकांनीं यथाशक्ति वर्गणी अवश्य द्यावी अशी मि. बुलक यांनीं सभेस जमलेल्या मंडळीस विनंती केली. राव साहेब देवराव विनायक यांनीं मे. कमिशनर साहेबांच्या भाषणाचा आशय मराठींत कळविला. त्यांनीं आपल्या भाषणांत धर्मादाय फंडाचे चतुर्विध उद्देश स्पष्टतेनें सांगितले. गेल्या अंकीं ते आह्मी प्रसिद्ध केलेच आहेत. नंतर वर्गणीचे आंकडे टाकण्यास सुरवात झाली. खुद्द डिपुटी कमिशनर मि० मीडो यांनीं ५०० रुपये, क्याप्टन मारिस व राव साहेब देवराव विनायक यांनीं प्रत्येकी ३०० रुपये, मेसर्स गालोवे व बमनशा ऑर्देसर यांनीं २०० रुपये आणि इतर मंडळींनीं आपापल्या शक्ती प्रमाणें आकडे टाकले तेव्हां सुमार ३॥ हजार रुपये वर्गणी जमली. रा. रा. देवराव जयकृष्ण व विनायक आप्पाजी काणे या उभय गृहस्थांनीं आपापल्या परिचयांतल्या मंडळीचीं मनें मोठ्या युक्तीनें वळवून त्यांच्या कडून या दुष्काळाच्या धर्मादायाकडे चांगली वर्गणी देवविली.

सध्यां या जिल्ह्यासाठीं एक २२ ग्रहस्थांची व्यवस्थापक कमिटी नेमिली आहे त्यांत मुख्य वर्किंग कमिटी खालील प्रमाणें आहे.

| | |
|---|---|
| मिस्टर | हुद्दा |
| मीडो साहेब | अध्यक्ष |
| देवराव विनायक-शेख इस्मायल | सेक्रेटरी |
| सिलिमखान दत्तात्रय विष्णु | सभासद. |

---

पुण्याच्या सार्वजनिक सभेला सरकारास अर्ज पाठविण्याचा अधिकार नाहीं असा मुंबई सरकारानें हुकूम फर्मावला आहे. हा हुकूम लार्ड सांडहर्स्ट साहेबांच्या कारकिर्दींत बाहेर आला ही त्यांच्या इतर लौकिकांतली विषमताच होय. पुण्याची सार्वजनिक सभा फार जुनी, वजनदार, व राजमान्य आहे पण या संस्थेवर असा हल्ला पडला हें पाहून सर्व देश हळहळेल. अपराध इतकाच कीं सभेचे मुखत्यार रा. रा. एकसंबेकर यांनीं धारवाड विजापूरकडे एका सभेच्या निमंत्रण पत्रिके मध्यें लोकवार्ते वरून सरकारचा उदारपणा दर्शविणारा मजकूर लिहिला आणि तो मजकूर लिहिल्याबद्दल सार्वजनिक सभेनें दुःख प्रदर्शित केलें नाहीं. दुष्काळामुळें ६ आणे पीकास साऱ्याची माफी व १२ आणे पीकास साऱ्याची वर्षभराची तहकुबी देण्याविषयीं कलेक्टराचा हुकूम आहे ह्मणून लोकवार्ता प्रसिद्ध केली होती. माफी किंवा तहकुबी रयतेनें मागितली तरी ती देणें किंवा

न देणें सरकारच्या हातींच होतें. रयतेचे अर्ज पुष्कळ आले असते असें गृहीत घेतलें तरी वरील लोकवार्ते प्रमाणें मागणी देखील आमच्या मतें या दुष्काळाच्या वर्षी कांहीं गैरवाजवी नव्हती.

सार्वजनिक सभा जनपदहितकर्त्री असल्यामुळें सरकारच्या द्वेषास पात्र झाली यांत कांहीं नवल नाहीं. तिच्या मुखत्याराच्या चुकीबद्दल जर तिला अधिकारभ्रष्ट केले तर मुंबई सरकारा सारखा आंधळेपणा किंवा डोळेझांकी कोठेंच नाहीं असें ह्मणावें लागतें. सार्वजनिक सभा सर्व लोकांची आहे व असा अपमान निरर्थक करण्यांत आला ह्मणजे लोकांचा अपमान झाला असें आह्मी समजतो. केसरी' कर्त्यांनीं ह्मटल्या प्रमाणें लोकमत प्रदर्शित करण्याचें काम सार्वजनिक सभेकडून सरकार काढूं शकत नाहीं आणि अर्ज करण्याचा अधिकार बंद होण्या सारखा नाहीं. अर्ज करण्यांत कांहीं अपराध घडत नाहीं. अर्जाचा विचार साकार करो अथवा न करो, सभेनें आपलीं विचारमौक्तिकें जगापुढें मांडण्याचा क्रम चालूं ठेवावा आणि अखेर सत्याचाच विजय होईल ह्मणून स्वस्थ राहावें. आपला उद्योग व प्रयत्न चालूं ठेवावा हीच पुण्याच्या सार्वजनिक सभेस आमची विनंती आहे. निराशेनें किंवा उदासीनतेनें आपल्या सोज्वल व विमल कृतीला विसरूं नये. सार्वजानिक सभेला लोकमताचें पाठबल आहे तो पर्यंत सरकारी पक्षपाताला, अन्यायाला किंवा निंदेला भिण्याचें कांहीं कारण नाहीं एकंदरीनें सावजानक सभे विषयीचा मुंबई सरकारचा ठराव अगदीं चुकीचा आहे.

## The Berar Samachar

MONDAY MARCH 29 1897

The financial Statement for 1897-98 is most disheartening, It declares that the State has no funds to meet the disasters and misfortunes of the current year. Its full hope lies in its large borrowing powers. The credit of India is proclaimed from house—tops by responsible statesmen in England and in it centers the strength and stability of the finances of the nation. We are very sorry because the State is forced to supplement its resources by new loans. Loans have become the watchword of the present statesmanship. It is a short,—sighted and narrow view of the national situation. We confess we miss the real aim in securing the financial equilibrium. No loans will mend matters. They turn all order and arrangements upside down. The errors of the past are more or less responsible for the *hopeless* and dismal prospect of the next year. They multiply in course of time and become difficult of detection. Want of prudence and foresight is the signal characteristic of the British administration. Sir J. Westland is indeed an able financier but his hands are restrained in so far as he has to provide for the multiferious items of expenditure: His budget shows a careful insight into all matters and his figures enable us to arrive at the same conclusions at which he arrives in his able and learned budget. The Congress—leaders have hit at the right causes of the degradation of the Indian Exchequer. Mr. Dadabhoy Navoroji has convinced the British people that their Government are to thank themselves for the present position. The drain on India's wealth is immense, the administration is costly and the Indian people are crushed to an unbearable extent. It is real wisdom to bring down expenses within the limits of the availale revenues. The largest Government in the world is that of India and it is a pity that it should not be able to provide for one bad year after a full period of some 20 good years. It is proposed to raise up loans for *four* crores of rupees if the present wants remain the same and the next season be of a good harvest. We give below the main features of the budget that Sir J. Westland has summarized in the following paras:—

"The main feature of the Revised Estimate for 1896—97 is the loss of Revenue and the Expenditure due to famine. Expenditure on Famine Relief is estimated at Rx. 1,891,000, in addition to Rx. 75,000 provided in Budget on account of Bundelkhand famine in the earlier part of the year. Loss of Revenue is estimated as follows: Land Revenue, Rx 2,394,000 Salt, Rx. 262,000; Other Principal Heads, Rx. 374,000; Railway Net Earnings Rx. 1,234,000; total, Rx. 4,264,000. Army Expenditure is increased, Rx. 196,000, by high prices due to scarcity. There is gain in Irrigation of Rx 270,000. Total of figures directly attributable to famine and scarcity, Rx 6,081,000, of which Rx. 574,000 is charged on Provincial Balances and Rx. 5,507,000 falls on Imperial Account. The Revised Estimate accordingly closs with deficit Rx. 1,987,000, being Rx. 2,450,000 worse than Budget, being the Rx. 5,507,000 just mentioned and Rx. 419,000 loss on Opium account *less* Rx. 1329,000 improvement on Exchange due to better rates, Rx. 474,000 Protective Railways transferred to Capital Account, Rx. 608,000 Savings on army Estimates (excluding the Rx. 196,000 excess expenditure already mentioned), and Rx. 1,065,000 improvements under other numerous heads.

The exchange realised during the year has been 14·46*d*. against 13·75*d* taken in last year's Estimates; and in framing the Budget Estimates of 1897—98 the same rate of 14·46*d*. has been taken withou[illegible] alteration.

The Budget Es[illegible]nates, 1897—98, work out to a defic[illegible] of Rx. 2,464,000. Compared with [illegible]udget, 1896—97, Exchange is better by Rx. 1,360,000; Land Revenue worse, Rx. 447,000 and Railway Earnings worse, Rx. 917,000—both due to Famine; Opium worse, Rx. 1,139,000, owing to lose prices; Army expenditure in India less by Rx. 511000, as last year included a special mobilisation expenditure.

The Famine Relief Expenditure provided for in Budget is Rx. 3,641,000. Total Famine Relief Expenditure, both years, Rx. 5,607,000, but much depends on future prospects as to weather and crops. This is independent of about Rx. 800,000 advances to ryots.

The Statement announces continuation of programme of Railway Expenditure in accordance with policy explained last March. Rx. 8,758,000 have been spent in 1896—97, and Rx. 10,130,000 will be spent in 1897—98, besides Rx. 2,470,000 and Rx. 3,284,000 spent by Branch Line and other Companies not under direct guarantee."

## वऱ्हाड

हवामान—दिवसा उष्णता विशेष होते आणि रात्रौ थंडीही बरी पडते. उष्णमाफक यंत्रांत पारा १०० व ६२ या दोन अंशांतील अंतरामध्यें चढत उतरत असतो. पाण्याविषयीं हाकाटी पुष्कळ ठिकाणाहून ऐकूं येते. दुष्काळामुळें गोरगरिबांचें आरोग्य असमाधानकारक व चिंतावह आहे.

वऱ्हाडांत २२ हाय कोर्ट वकील आणि १०० दुसऱ्या दर्जाचे वकील मिळून १२२ वकील आहेत.

रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि० कमि० यांनीं बडनेरा येथील कोर्टाचा चार्ज गेल्या सोमवारीं घेतला.

रा० रा० हरीहर काशीनाथ पाटील एक्स्ट्रा असि० कमिशनर हे उमरावतीहून आकोल्यास आले आणि ते आकोल्याच्या सबार्डिनेट कोर्टाचें काम गेल्या सोमवार पासून पाहूं लागले.

मि० अब्दूल अजीझ नायब तहशीलदार आकोला यांस एरंडा येथील तलावाच्या कामावर मुख्य आफिसर नेमल्यामुळें येथील जागीं रा. रा. लक्ष्मण विश्वनाथ दांडेकर यांस आर्क्टिंग नायब तहशीलदार नेमिलें.

वाशिम मुनसिपालिटीनें आपल्या हद्दींतील इमारतीच्या मानानें सर्व इमारतीवर एक हलालखोरीचा कर आणि गाड्या, घोडे यांवर दुसरा एक कर असे दोन कर येत्या एप्रिल पासून बसविले आहेत.

मि० ए० वुलियमस सेक्रेटरी वऱ्हाड यांची बढती येत्या मे महिन्यांत क्वेटा येथें पोलिटिकल एजंटचे जागीं होणार आहे.

मि० सिंक्लेर माजी जेलर यांस अखेर कामावरून बडतर्फ केलें.

येथील असिष्टंट जेलरचे जागीं मि. पांडुरंग रामचंद्र अडगांवकर यांची नेमणूक झाली हें कळविण्यास आह्मास आनंद वाटतो.

डाक्टर रेली साहेब हे लवकर रजेवर जाणार असून ह्यांच्या सिव्हील सर्जनचे जागीं डाक्टर मारिसन यांस नेमण्यांत आलें.

मि० आवर्ड साहेब जुडिशिअल कमिशनर हे येत्या एप्रिलच्या अखेरीस रजेवर जाणार आहेत असें ह्मणतात.

खालील आक्टींग नेमणुका सध्यां उमरावतीस झाल्या आहेत:---

| रा० रा० | हुद्दा. |
|---|---|
| पांडुरंगराव भगत | क्लार्क आफ कोर्ट निसबत डिपुटी कमिशनर. |
| नीळकंठराव देशपांडे | डेपुटी क्लार्क आफ कोर्ट |
| वासुदेवराव परांजपे | स्मालकाजचे क्लार्क आफ कोर्ट. |

दुष्काळ रिलिफ कामाकडेस नायब तहसिलदार यांच्या नेमणुकी झाल्या मुळें त्यांचे जागीं आकोले जिल्ह्या करितां नवीन चार स्पेशल नायब तहसिलदार नेमण्यांत आले आहेत. आतां दुष्काळाचे कामाकडेस क्यापटन ऐव्हर्स, मि. शामराव, मि. देवराव जयकृष्ण व लेफटनेंट मारिस सा० हे अधिकारी होते ते आप आपले कामावर परत आले. दुष्काळा निमित्त आणखी कामें नवीन निघालीं पाहिजेत.

आह्मांस लिहिण्यास फार आनंद वाटतो कीं अखेर रा. रा. गोपाळ विश्वनाथ टोकेकर यांचीच येथील जेलरची जागीं कायमची नेमणूक करण्यांत आली. मि. गोपाळराव हे आपलें काम उत्सुकतेनें, तत्परतेनें, काळजी पूर्वक, व प्रामाणिकपणानें करितात ह्मणूनच त्यांची नेमणूक अधिकाऱ्यांनीं अकोल्या सारख्या मोठ्या जेलावर मुद्दाम केली आहे. हा जेल स्थापन होऊन आज सरासरी ४० वर्षे झालीं. ह्या मुदतींत नेटिव्ह जेलर ह्मणून कोणीच नेमला गेला नव्हता परंतु मि. टोकेकर यांणीं आपल्या कर्तबगारीनें, कौशल्यानें व बुद्धिमत्तेनें जेलर सारख्या जबाबदारीच्या जागेस नेटिव्ह लोक फार लायख आहेत असें अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणून दिलें. मि. टोकेकर हे जेल खात्यांत सुमारें १०।१२ वर्षांपासून आहेत व त्यांस या खात्याचे कामाची पूर्ण माहिती आहे. डाक्टर रॅली सारख्या अति कडक अंमलदाराकडून जेलर सारख्या जबाबदारीचे जागीं नेटिव्हाची शिफारस होणें दुरापस्तच होतें परंतु नेटिव्हच अशा जागेस फार लायख आहे असें मि. गोपाळराव यांणीं सिद्ध करून दाखविलें. असो, झालेली नेमणूक सर्व लोकांस फार योग्य वाटत आहे. मि. टोकेकर हे आपले काम उत्तम रीतीनें व प्रामाणिक पणानें बजावून अधिक लोकप्रिय होतील अशी आह्मांस बळकट आहे.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८८ रुपये |
| जवारी | १०१ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,,( बनशी ) | १३९ रु० |
| चणे | १२० रु० |
| तेल | ६। ८० मण |
| तूप | ६।॥ मण |
| सोनें | २६॥ तोळा |
| चांदी | ८९ |

### नोटीस.

सिवराम वल्लद रामजी गावंडे वस्ती राजगांव तालुके अकोट यांस

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार असून लग्न होण्यास सुमारे १९ वर्षे झालीं आहेत. हल्लीं पांच वर्षां पासून मी आपले घरी राहत असून माझे बापानीं मजला दोन चार वेळा तुमचे घरी आणून घातले असतां त्याजबद्दलची पंचाईत होऊन तुह्मी मजला नांदवीत नाहींत व फारकती मागितली असतां तीही देत नाहींत याजकरितां मजला नांदविणें असल्यास माझे पांच वर्षांचा आन्नवस्त्राचा झालेला खर्च रुपये २५० शे ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत रुपये देऊन मजला घेऊन जावें. तसे तुह्मी न केल्यास हीच फारकती समजून दुसरा घरठाव केला जाईल व नोटिसीचा खर्चे ही तुमचेपासून घेतला जाईल कळावें. तारीख २५।३। ९७ इसवी.

सही

यशवदा मर्द सिवराम निशानी चागडी हातची असे.

## वर्तमानसार.

सुरत जवळ रांदेर ह्मणून गांव आहे. तेथे गेल्या १ तारखेस तेथील आरब नाखुदा चा मुलगा ग्रंथिक तापानें मरण पावला. ह्या मुलास मरकी लागू पडतांच इस्पितळांत नेण्यांत आले होते. तो मेल्यावर त्याची आप्त मंडळी तेथें गेली. त्यावेळीं पोलीसांनीं ह्या प्रेतास शहरांत न नेतां बाहेरच्या बाहेर कबरस्थानांत नेण्याबद्दल सूचना दिली. व फक्त १६ मनुष्यास प्रेताचा पुढील विधी करण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणें त्या लोकांनीं प्रेत उचललें. पण रस्त्यास लागतांच दुसरे शेंकडोंशें मुसलमानांच्या टोळ्या खांदा देण्याच्या निमित्तानें त्यांस जाऊन मिळाल्या. तसें न करण्याबद्दल पोलिसनी त्यांस सांगितलें, पण तिकडे त्यांनीं लक्ष न देतां उलट पोलीसावर दगडांचा मारा सुरूं केला, आणि प्रेतास शहराबाहेरील कबरस्थानांत न नेतां शहरांतील आपल्या मसिदींत नेलें. पोलीसनी ह्यावेळीं सावधगिरी करून त्या लोकांस घेरलें. त्यावेळीं त्यांनीं पोलिसावर धोंडे वगैरेचा बराच मारा केला पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ! पोलीसनी पुढारी अशा १२ इसमांस पकडून बिळ्या ठोकतांच बाकीची मंडळी पळून गेली, व शेवटीं तें प्रेत आठ जणांकडून शहराबाहेरील कबरस्थानांत नेऊन पुरण्यांत आलें. ह्या दंग्यामुळें सर्व गांवांत अस्वस्थता उत्पन्न होऊन, बाजार वगैरे एक दिवस बंद पडला होता. तेथील कलेक्टरनें तार करून येथील कांपांतील पलटणीच्या दोन तुकड्या तात्काळ मागवून घेतल्या.

ठाण्याजवळ वरसोवा ह्मणून गांव आहे तेथें मोठा दंगा होऊन तेथील मच्छीमार लोकांनीं तेथील मामलेदार, असि. कलेक्टर मि. हडसन व हॉस्पिटल असिस्टन्ट मि. गानशास्त्रस यांस पुष्कळ मार दिला. त्यांत मामलतदारास सर्वांत विशेष मार पडला व मि. हडसन यांची हनवटी चिरली गेली, ही दंग्याची बातमी लाईट हाऊसचे क्याप्टन यांस समजतांच ते ४० गोऱ्या लोकांची तुकडी घेऊन तेथें गेले. त्यास पाहतांच बंडखोर मच्छीमार होड्यांत बसून झपाट्यानें पलिकडे निघून गेले. त्यांवर बंदुका सोडल्या, पण त्यापासून त्यांस कांहीं इजा झाली नाहीं. तथापि ह्या बंडखोरांपैकीं ४० मनुष्यांस पकडलें आहे. ह्या दंगा होण्याचें कारण असें सांगतात कीं, कांहीं लबाड लोकांनीं अशी एक खोटी अफवा उठविली होती कीं, 'सरकार पाण्यांत विष घालून मनुष्यांस मारतें–' ह्या बातमीपासून तेथील लोकांचा ग्रह तेथील सरकारी अधिकाऱ्यांच्या विरुद्ध झाला होता. गेल्या रविवारीं हे लोक समुद्रकांठीं प्रार्थनेकरितां ह्मणून एकत्र झाले असतां तेथील मामलेदारांनीं त्यांस विखरून जाण्याबद्दल सांगितलें पण त्यांचें ह्मणणें न ऐकतां त्या लोकांनीं सरकारी नोकरांवर एकदम हल्ला केला. असें ह्मणतात कीं, ह्या सरकारी अधिकाऱ्यांस ठार मारण्याचा त्या लोकांनीं विचार केला होता, परंतु तो त्यांचा विचार शेवटास जाऊं शकला नाहीं. तिकडे तिकडे अस्वस्थतेशिवाय हल्लीं दुसऱ्या गोष्टी ऐकण्यांत येत नाहीं. ! ! !

फेंच डाक्तर मो. हेनरी डी. पारविल यांनीं मरकीच्या संबंधानें हल्लींच एक निबंध प्रसिद्ध केला आहे. ते ह्मणतात कीं, ज्या लोकांस हा रोग लागू पडतो तो एक पासून ३ दिवसांचें आंत मरतो. सहाव्या शतकांत ह्या रोगाचा प्रसार युरोपांत झाला होता व इ. स. १३४८ मध्यें ह्या रोगानीं पुष्कळ लोक मेले होते. एशिया मधून तो उत्पन्न होऊन इटलि, स्पेन व फ्रान्स येथें त्याचा प्रवेश झाला होता इ. स. १६६५ व १६६८ मध्यें त्याचा प्रादुर्भाव लंडनास झाला व शेवटीं १७२१ मध्यें मार्सेल्स मध्यें त्याचा परिणाम इतका भयंकर झाला कीं त्यानें पुष्कळ कुटुंबांचा ग्रास घेतला. १७९८ पासून १८०१ पावेतों व त्या नंतर १८३५ मध्यें त्याचीं चिन्हें इजिप्त मध्यें दिसलीं होतीं परंतु तेथील फ्रेंच डाक्तर डेसेजेन्टेस यांनीं पुष्कळ मनुष्यें ह्या रोगापासून मुक्त केलीं होतीं, त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें हा रोग हिम्मतवान लोकांपेक्षां भित्र्या मनुष्यावर लागू पडतो व अशा प्रकारचीं त्यांनीं पुष्कळ उदाहरणें पाहिलीं होतीं.

अक्कलकोट संस्थानांत एक विधवेनें टाकून दिलेला मुलगा तेथील राणी साहेबांनीं आणून त्याची बरदास्त ठेवून त्याचें नांव अवधडराव उर्फ जंगली राजे ठेविलें आहे.

रजपूत राजे जुबिलीचे स्मरणार्थ बनारस येथें रजपूत कॉलेज व आयुर्वेदिक कॉलेज स्थापन करीत आहेत.

कलकत्ता येथील बाबूचंद्र विनोद यांनीं देशी दिवे तयार केले आहेत, यांत धूर निघत नाहीं. तेलही कमी जळतें, किंमतीही विलायतीपेक्षां कमी आहे.

बुचाचें लांकूड समुद्राचे पोटांत २०० फूट खोल बुडविलें तर तें पुनः वर तरंगून येऊं शकत नाहीं, इतके त्याजवर वरच्या पाण्याचें वजन पडतें, असें अनुभवसिद्ध झालें आहेत.

कोणती धातु किती वजन सहन करिते ? एक चौरस इंच जाडीचा लोखंडाचा तुकडा ४९१ मणाचें ओझें सहन करितो आणि तेवढा पितळेचा तुकडा ४४९ मण वजनाचा बोजा तोलून धरूं शकतो.

रूटर कंपनीचें औदार्य–पृथ्वीवर सर्व वर्तमानपत्रकर्त्यांस बातमीच्या तारा पाठविणारी रूटर कंपनी हिणें हिंदुस्थानांतील दुष्काळसंबंधाच्या एकंदर बातम्या अवघ्या पृथ्वीवरील प्रसिद्ध वर्तमानपत्रांना मोफत पाठवावयाचें ठरविलें आहे. हिंदुस्थान देशाचे संबंधानें सदर कंपनीनें हे केवढें औदार्य दाखविलें आहे ह्याबद्दल सदर कंपनीची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे.

ज्ञा. च.

ब्रह्मदेशाकारितां वेगळा ले० गव्हरनर व वेगळें कायदेकौसल करण्याचें ठरलें. मे महिन्यापासून अमलांत येणार. सर फ्रामर हे ले. गव्हरनर होणार.

बऱ्हाणपूर शहरांत पाण्याचा पुरवठा करण्याकरतां कासिमबजारची महाराणी सरनोमाई यांणीं २, २०, ००० रुपये सरकारच्या स्वाधीन धर्मार्थ ह्मणून केले !

ग्रीक लोकांच्या विरुद्ध असणाऱ्या टर्क लोकांचे आह्मी संरक्षण करतों हें ह्मणणें खोटें असून रक्तपात होऊं नये इतकेंच आमचें ह्मणणें आहे असें कानिया येथील परकीय सरदारांनीं प्रसिद्ध केलें आहे.

निझामसरकारची जमाबंदी गहाण लाऊन विलायतेस कर्ज काढण्यांत येत आहे कीं काय व काढण्यांत येत असेल तर त्याबद्दल स्टेट सेक्रेटरीची मंजुरी घेतली आहे कीं नाहीं आणि घेतली नसेल तर तें कर्ज काढणें गैरफायदा होईल कीं नाहीं ? असा एक प्रश्न ता. १९ रोजीं मि० मांक यांणीं केला व त्यांस उत्तर देतांना स्टेट सेक्रेटरी लार्ड जार्ज हामिलटन ह्मणाले कीं, असें कर्ज काढित असल्याचें मला कांहीं कळलेलें नाहीं व हिंदुस्थानसरकारानें त्याबद्दल स्टेट सेक्रेटरीची मंजूरी मागितली नाहीं. तिसऱ्या जार्जचा कायदा ३७, बाब १४२ कलम २८. प्रमाणें हिंदुस्थानांतल्या कोणा संस्थानिकास असें कर्ज काढण्यास स्टेट सेक्रेटरी किंवा गव्हरनरजनरल यांची आगाऊ मंजुरी पाहिजे आणि तशा मंजुरीवाचून कोणी तसें कर्ज काढील तर तो कर्जरोखा रद्द व बातल होईल. [ यावरून हिंदुस्थानच्या राजांस बादशाही सरकारच्या सल्ल्यावांचून कर्ज काढता येत नाहीं, ह्मणजे नेटिव राजांचीं राज्यें ही त्या राजांची मिळकत नसून ती मिळकत बादशाही सरकारची आहे असें होतें व तें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे ]

युरोपियन साहेबानें तो ज्या बगिच्यांत काम करीत होता त्या बगीच्यांतीलच काम करणारी एक शुद्रीण आपल्या बंगल्यांत आपलें प्रिय पात्र करून ठेविली होती. त्या शुद्रिणीच्या संबंधांत राहून एक अकरा वर्षांची मुलगी त्या बाईच्या हाताखालीं किरकोळ कामें त्या बगल्यांत राहूनच करीत असे, व रात्रीं ते साहेब आणि ती बाई ज्या कोठडींत पलंगावर निजत होते त्याच कोठडींत ही मुलगीही एका बाजूस जमिनीवर निजत असे. एका प्रसंगीं ती बाई कोठें गेली होती व रात्रीं ती मुलगीच एकटी साहेबांच्या कोठडींत निजली होती. त्यावेळेस साहेबांनीं त्या मुलीवर आपली रात्र गुजराण करण्याचा विचार करून तीस पलंगावर घेतलें आणि तिच्याशीं जबरीचा संभोग केला, तिच्या गुह्यांगावाटे रक्तस्राव चालले व ती मोठ्यानें ओरडूं लागली. तिचें ओरडणें बाहेर निजणाऱ्या चौकीदारानें ऐकिलें व ते कांहीं बोभाट करील असें अनुमान करून साहेबांनीं त्या मुलीनें ओरडूं नये ह्मणून तिच्या तोंडांत पांघुरणाचा बोळा घातला, आणि अशा रीतीनें तिच्याशीं जबरीचा संभोग केला. फौजदारी झाली. साहेबांनीं केलेलें कृत्य कबूल करून याबद्दल त्या मुलीची संमती होती असा जबाब दिला. पुढें तिचें वय अकरा वर्षांचें असून ती अशा प्रकारचें कृत्य करण्यास योग्य नव्हती असा मुद्दा निघाल्यावर साहेबांनीं एका गोऱ्या डाक्तराचें सर्टिफिकिट दाखल केलें कीं, त्या दिवशीं ती बारा वर्षांपेक्षां कमी वयाची नव्हती. पुराव्याचा विचार निघाला त्यावेळेस तो चौकीदार अशा ठिकाणीं निजला होता कीं, त्यास त्या मुलीच्या आरोळ्या ऐकूं जाणें अशक्य होतें असें साहेबांनीं स्थापित केलें. तात्पर्य अशा रीतीनें बचावाचा पुरावा साहेबांनीं दिल्यावरून युरोपियन ज्युरींनीं हा जबरीचा संभोग होत नाहीं असें ठरवून साहेबास निर्दोषी ठरवून सोडून दिलें–हा.

अ० द०

बड्या राजांच्या मुखत्यारांनीं सर्वांनी मिळून टर्की सरकारास असें कळविलें आहे कीं, तुह्मी आपली वेगळाल्या ठिकाणची फौज काढून मोठाल्या शहरांत जमा करा आणि गव्हरनराच्या रक्षणार्थ मात्र थोडी फौज कायम ठेवा.

फ्रेंच, रशियन व इंग्लिश वकील, आपापल्या गलबतावर गेले व तेथून इग्रज वकील सगळ्यांनीं मिळून ९०० फौज बरोबर घेऊन बंडखोरांनीं अडकवून ठेवलेल्या ९, ००० टर्क लोकांस सांडविण्याचें बोलणें करण्यास कानो येथें गेला.

क्रिटन लोक व टर्क यांची लढाई होऊन दोन्ही पक्षांचे पुष्कळ मेले.

तुह्मी आपली फौज माघारी आणाल तर आह्मी आपली माघारी आणू असें ग्रीसनें टर्कीस कळविलें.

बंडखोरांनीं ता. ६ रोजीं कानियाच्या भोंवतालच्या टर्की फौजेवर हल्ला केला.

इंग्लंडचे पुष्कळ लोक आपण होऊनच ग्रीसच्या फौजेस जाऊन मिळत आहेत–

क्रीट सोडण्याची आमच्यावर सक्ती न करतां तें बेट ग्रीसला जोडा; तें जुलमी मुसलमानांच्या स्वाधीन करूं; आह्मी आपली फौज बाहेर काढण्यास तयार नाहीं; त्या बेटांत कशा प्रकारची राज्यव्यवस्था असावी हें ठरविण्याचें काम त्या बेटांतल्या लोकांवरच ठेवा असा ग्रीसनें बड्या राजांस जबाब दिला.

कानिया येथें जे ग्रीसचे वर्तमान पत्रकर्ते व इतर लोक आहेत त्यांणीं क्रीट बेटांतून निघून जावें असें बड्या राज्यांच्या वकिलांनीं ग्रीसवकिलास कळविलें.

तुमच्या ह्मणण्याचें तत्व कबूल आहे पण त्याबद्दल जास्त विचार झाला पाहिजे असें टर्कीनें बड्या राजांस उत्तर दिलें.

इंग्लंडच्या लोकांचें मत ग्रीसच्या तर्फेचें असून पुष्कळ इंग्रजलोक व्हालेंटीयर होऊन जात आहेत.

बडे राजे ग्रीसला कमाविण्यास तयार नाहींत असें त्यांच्या चाललेल्या बोलाचालीवरून दिसतें.

जर्मनी आपलें आरमार वाढवीत असून त्याकरतां ९०, ००, ००० पौंड खर्च करण्यास तयार झाली आहे. आपलें आरमार वाढविल्यावाचून आपली योग्यता कायम राहणार नाहीं असें जर्मनीस वाटत आहे.

इंग्लंडच्या आरमार खात्यांत गेल्या ६ वर्षांत २६,००० लोक जास्त झाले व या शिवाय कांहीं रिझर्व ह्मणून करण्याचा बेत आहे.

सियामचा राजा येत्या जूनांत विलायतेस जाणार असून इंग्लंडच्या रीतिभातीची माहिती करून घेण्याकरतां एक वर्ष तेथेंच राहणार आहे.

रशिया सर्वियन लोकांस हत्यारें देत आहे आणि सर्विया आपल्या सर्व लोकांस कवाइतीवर बसवीत आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.